

# युरोप-कवडसे

मनीषा दीक्षित

या पुस्तकाच्या लेखिका व प्रकाशक मा. मनीषा दीक्षित यांनी या पुस्तकाच्या ई वितरणाची विनामूल्य परवानगी दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण त्यांना **9850503530** या क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

# युरोप-कवड्से

मनीषा दीक्षित

# युरोप-कवडसे

मनीषा दीक्षित
मो. ९८५०५०३५३०
५, विनायक अपार्टमेंट, प्रभात रस्ता, गल्ली क्र.११
पुणे ४११००४.
maneesha.dikshit@gmail.com

**कॉपीराइट्स : सौ. मनीषा दीक्षित**

**मुखपृष्ठ :** सुप्रिया जोगदेव

**अक्षरजुळणी** : स्नॅप आर्ट्स, पुणे

**मुद्रितशोधन :** शुभांगी भिडे

**मुद्रणस्थळ :** स्टार कॉपिअर्स, पुणे

**प्रकाशन दिनांक :** ९ एप्रिल २०२४ (गुढीपाडवा)

# मनोगत

परदेश-प्रवास ही काही आता नवलाईची गोष्ट राहिली नाही. तरी प्रत्येक आईला जसे तिच्या बाळाचे अप्रूप असते, तसे प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या परीने परदेश-प्रवासाची अपूर्वाई असते. युनायटेड किंगडमचा (U K) प्रवास घडला तो माझी मुलगी मयुरी कंपनीच्या प्रोजेक्टसाठी तिथे वास्तव्यास होती म्हणून. तिथे गेल्यावर विविध स्थळांना भेटी दिल्या. निसर्गाचं अपरिमित सौंदर्य व अद्भुतता अनुभवताना जे मनात आले, जे विचारतरंग उमटले ते सांगावे, लिहावे असे वाटले.

हे प्रवासवर्णन लिहिताना त्या त्या स्थळाची माहिती लिहिली आहे, ती प्रवास करणाऱ्यांना उपयोगी ठरावी व स्थळाचा महिमा माहीत व्हावा या हेतूने. प्रवासात निसर्गाची विविध रूपं तर पाहायला मिळतातच आणि त्यात माणसांचे आलेले अनुभव भर घालतात. हे अनुभव वैयक्तिक स्वभावानुसारही घेतले जातात. तेही लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. एकाच वेळी बाहेरून व अंतर्मनातून प्रवास घडत राहतो व आपण समृद्ध होत जातो. रोजच्या जगण्यातील एकसुरीपणातून व ताणतणावांतून मुक्तीचा मार्ग प्रवासामुळे मिळतो. निसर्गाचं विशाल रूप पाहताना माणसाची क्षुद्रता लक्षात येते व साक्षात्कार घडतो.

परदेशात कामानिमित्त गेलेली भारतीय तरुण पिढी कशी राहते, त्यांना कुठल्या समस्यांना सामोरे जावे लागते व ती कशी स्वकष्टाने त्यावर मात करतात, हेही यूकेमधील वास्तव्यात पाहायला मिळाले. हे सारे लिहिण्याच्या ओघात

आले आहे.

हा प्रवास जर वाचकांना शब्दातून अनुभवता आला, तर हे लिहिल्याचा खटाटोप सार्थकी लागला असे म्हणता येईल.

पुस्तक निर्मितीसाठी ज्येष्ठ कवयित्री आसावरी काकडे यांनी मोलाचे सहकार्य केले. युरोपच्या प्रवासातच टिपलेलं छायाचित्र मुखपृष्ठावर सुप्रिया जोगदेवांनी कलात्मकरीत्या घेतलं आहे. अक्षरजुळणीचं काम त्यांनी आत्मीयतेनं केलं आहे. प्रुफे तपासण्याचे काम शुभांगी भिडे यांनी तत्परतेने केले. 'ई साहित्य प्रतिष्ठान'च्या श्री. सुनील सामंत यांनी अगत्यानं या पुस्तकाच्या ई-आवृत्तीची निर्मिती केली.

'साप्ताहिक सकाळ'ने यातील लेखाला पूर्वप्रसिध्दी दिली. या सर्वांना मनापासून धन्यवाद देते.

**मनीषा दीक्षित**

विनायक अपार्टमेंट

प्रभात रस्ता, गल्ली क्र.११

पुणे-४११००४

मोबाईल नं. ९८५०५०३५३०

maneesha.dikshit@gmail.com

# अनुक्रम


| | |
|---|---|
| १. इंग्लंडच्या दिशेने.. | ०७ |
| २. ऑक्सफर्ड | ११ |
| ३. लंडन | १५ |
| ४. सुंदर पँगबोर्न | २९ |
| ५. ब्रिस्टल बाथ | ३२ |
| ६. कार्डिफ | ३८ |
| ७. स्ट्रॅटफोर्ड | ४१ |
| ८. विंडसर कॅसल | ४५ |
| ९. डोव्हर व्हाईट क्लिफ्स | ४८ |
| १०. स्कॉटलंड | ५० |
| ११. पुन्हा लंडन | ६५ |
| १२. फ्रान्स-पॅरीस | ६९ |
| १३. बेल्जियम | ७७ |
| १४. नेदरलँड | ८० |
| १५. जर्मनी-कोलन | ८२ |
| १६. जर्मनी | ८५ |
| १७. स्वित्झर्लंड | ८७ |
| १८. ‘युंगफ्राऊ’ शिखर | ९० |
| १९. लिचेस्टाईन | ९२ |
| २०. म्युनिच | ९४ |
| २१. ऑस्ट्रिया | ९६ |
| २२. व्हेनिस | ९९ |
| २३. फ्लॉरेन्स | १०२ |
| २४. इटली-रोम | १०५ |
| २५. व्हॅटिकन सिटी | १०८ |

लंडन आय



# इंग्लंडच्या दिशेने..

**१४** मार्च २०११ .... हा तो दिवस, ज्या दिवशी मी निघाले लंडनला जायला. मुलाने गल्फ एअरलाईनचं ऑनलाईन बुकिंग आधीच करून ठेवलं होतं. पहाटे ५.५५ ची फ्लाईट होती. ६ तास एअरपोर्टवर काढले! अन् इथून पुढे प्रवास.

पुढला दोन-अडीच महिन्यांचाच काय तो काळ, पण उत्फुल्ल ओसंडून जगणं म्हणजे काय ते समजलं याच काळात. प्रत्येक दिवस नावीन्यपूर्ण. प्रत्येक दिवसाची नजाकत न्यारी. जगण्याला रंगीबेरंगी पंख फुटताना पाहिले, तेही याच काळात. निसर्गातल्या सुंदरतेने नाचत सांगितलं, आयुष्य सुंदर आहे !

विमानाचा वाटेत बहारीनला स्टॉप होता. अहाहा ! आखाताचे पाणी ! प्रेमाने हळुवार गोंजारावे अशा लाटा. बहारीन किती सुंदर दिसले उतरताना ! बसकी नव्हेत, की ताडमाड उंचही नव्हेत अशी प्रमाणशीर घरे. रस्त्यांच्या बाजूला गुलाबी रेती अन् त्यात डोलणारी सडपातळ खजुरीची झाडे ! रेगस्तानही इतके सुंदर दिसू शकते तर !

बहारीनला विमान धावपट्टीवर मध्येच थांबले. विमानातून टर्मिनलला नेणाऱ्या बसमध्ये बसताना कसला भन्नाट वारा लागला. वाटलं, सामानासकट आपणही उडून जातो की काय !... सिक्युरिटी चेकचा सोपस्कार पार पडल्यावर बोर्डिंगपास दाखवून गेटवर जाऊन थांबले. तिकिटावर त्याच विमानाचे नाव आहे ना हे नक्की करून घेतले. एकटीने प्रवास करायचा म्हटल्यावर ही जास्तीची काळजी घ्यायला

आपले आपण शिकतो ! तिथल्या घड्याळाप्रमाणे माझे घड्याळ लावून घेतले. अजून तीन तास अवकाश होता !

माझ्यासारखीच एक मुलाकडे जाणारी आई भेटली. आम्ही म्हटले, 'चला विमानतळावर विंडो शॉपिंग तर करू!' खजूर अन् ड्रायफ्रुट्सनी दुकाने भरली होती. बहारीनचे चलन हातात तर नव्हते. एका दुकानात पौंडामध्ये बॉक्सची किंमत विचारली तर तिने कॅलक्युलेटरवर उलटे लिहीत सांगितली '९पौंड १६औंस.' म्हणजे लिहिताना आधी १६औंस व नंतर ९पौंड अशी लिहिली !

सगळ्यात आवडली ती तिथे लावलेली बहारिनी चित्रकारांची चित्रे. गडद रंग अन् नाजूक नक्षीकामाचा वापर केलेली. तिथल्या घरांच्या रचनाही त्यातून स्पष्ट होत होत्या. एक लावलेले म्युरलही सुंदर होते. आणि तिथे फिरताना डोक्याला काळा रुमाल बांधलेल्या बहारिनी तरुणी सदा बहार ! नितळ गोरीपान कांती, नीटस नाकडोळे. बहारिनी बहार सौंदर्य.

३ तास संपले. पुढल्या G 003 विमानात खिडकीशी जागा मिळाली. पायलट प्रथम बहारिनी भाषेत काहीतरी बोलला. जे काहीच समजलं नाही. वाटलं, कुठे कशी जन्मते एखादी भाषा? कशी ठरवली जाते लिपी अन बोलली जाते वर्षानुवर्षे काळाच्या पटावर? खिडकीतून बाहेर निळे आभाळ दिसतेय अन् त्यात पांढरे पांढरे ढगांचे पुंजके. हीच का आदीअंत नसणारी एकमेव भाषा....अनेक भाषांना जन्म देणारी. आपण चित्रे पाहिली मघाशी. गुलाबी रेतीवर, खजुराच्या झाडांवर, तरुणींवर सुचल्याही असतील कवींना बहारिनी कविता. वाचल्या पाहिजेत एकदा. नंतर पायलटने इंग्लिशमध्ये अनाउन्समेंट केली बहारिनी टोनवर आणि पटले एक जागतिक भाषा का हवी ते.

इथून पुढे झाला ६–८ तासांचा प्रवास. लोकल घड्याळ अन् मनगटावरचे घड्याळ यांचा काहीच ताळमेळ बसेना. कधी, कधी पोचणार? अन् एकदाचा आम्हा प्रवाशांना इमिग्रेशन फॉर्म दिला गेला. तो भरला. विमान टर्मिनल चारला वेळेवर लागले. माझ्या घड्याळाशी त्याचा सुतराम संबंध नव्हता. थंब प्रिंट व यायचे कारण विचारले. लगेच बॅग कलेक्ट केली. सर्व सामान ट्रॉलीवर घालून अरायव्हलच्या ठिकाणी "WH Smith' दुकानाशी येऊन थांबले, मयूरीची वाट बघत.

माझ्या घड्याळात साडेसहा वाजले, वाटले मयू अजून कशी नाही आली. पाहिले तर तिथले घड्याळ ३.३७ दाखवत होते .... इतर प्रवाशांची मजा बघत

होते. समोर एक जोडपे होते. त्यांचे बाळ बाबागाडीत अन् बाजूला ट्रॉलीवर मोठ्या दोन-तीन बॅगा. त्या तरुणीने बाळाच्या वडिलांचे चुंबन घेतले अन् पर्समधून सिगारेटचे पाकीट काढून दिले. त्यांचे काही बोलणे झाले असावे. तो गेटमधून बाहेर गेला. बिडी शिलगावून आला असावा. हिने आपला कोट काढून त्याच्या हाती दिला अन् काही बोलली असावी. ती टॉयलेट रूममध्ये निघून गेली. थोड्या वेळाने ती आल्यावर त्याने तो कोट तिला अलगद चढवताना तिचे केस हळुवार उचलून बाहेर ठेवले. अन् ते प्रेमळ कुटुंब कोण जाणे कुठे निघून गेले!

मयूरी आली. मिठी मारून म्हणाली, ''कश्शी आलीस!'' बाहेर येऊन दुसऱ्या टर्मिनलला जाऊन तेथून लंडन रेडींग अशी बस केली. रस्ते, बाजूची झाडी अगदी कोलंबसमध्ये आलोयत असे वाटले. खरेच, कुठेही फिरताना आपल्या मनाचा पूल जोडलेला असतो आपल्या माणसांशी म्हणून तर तुलना करता करता गौरीची आठवण झाली. रेडींगच्या बस स्टॉपवरून टॅक्सी केली. टॅक्सी पुरातन काळातली! पण चांगली चालली ! घरी पोचलो तर त्या अपार्टमेंटमधले सगळे शेजारी बाहेर आले. ओळख करून दिली. माझ्या बॅगा उचलून दुसऱ्या मजल्यावर आणून दिल्या. या आदरातिथ्याने मी भारावले. वाटेत घरी फोन झाला होताच. मयूरीने वरणभात लावला. साटोरी अन् वरणभात खाऊन कधी झोप लागली कळले नाही ....

...आज हे लिहिताना आठवणींतून पुन्हा मी तो प्रवास करतेय. तारा झंकारतायत, सूर आळवले जातायत... आतल्या आत ....

गंमत पाहा, आता मी प्रवासातली वही चाळतेय म्हणून तर मला आठवतंय, रेडींगला असताना मयू दूध आणायची ५ पौंडाला एक लिटर. तेव्हा एका पौंडाची किंमत होती ७० रु. एकदा तिने पिझ्झा मागवला, तेव्हा १५ पौंड मोजले ! परत पोट भरलं नाही ते नाहीच. मग ठरवलं, आता पोटपूजेसाठी मेरे हातही सलामत. नंतरच्या तिथल्या वास्तव्यात तिचे कितीतरी मित्रमैत्रिणी आईच्या हातचं जेवण जेवून गेले. परदेशात गेल्यावर तर घरच्या जेवणाची किंमत (value) जास्त समजते. माँके हातका खाना !

दुसऱ्या दिवशी जाग आल्यावर पाहिले तर बाहेर धुके दिसत होते. लाल कौलारू दुमजली घरे. त्यांच्या सुबक खिडक्या, त्यांवर सोडलेले पडदे. अरुंद रस्ता होता तो. एका साईडला गाड्या पार्क केलेल्या दिसत होत्या. म्हणजे गल्ली

क्र.११ U.K. म्हणायला हरकत नाही !

'ऑल इन वन' खोली होती ती. स्वयंपाकाची जागा आवरली. कुठे काय आहे–नाही पाहिले. नुसती साबुदाण्याची खिचडीच तर टाकायची होती, मयूच्या आवडीची. तोपर्यंत वेळच वेळ हातात होता. जेट लॅगच्या दुष्टचक्रात अडकायचे नाही म्हणून जागेच राहायचे ठरवले होते.

..माझ्याबरोबर होता, मला आवडणारा एकांत. रवींद्रनाथ टागोरांची 'गीतांजली' वाचली ती याच काळात. कवितांची एवढी आवड, पण नोबेल प्राइज मिळालेली गीतांजली वाचायला वयाची ५७ वर्षे उलटावी लागली ! वेळ मिळाला नाही की काढता आला नाही ? एकटे असताना तुम्ही विचार करू लागता. स्वत:च्या अंतरंगात डोकावू लागता. सगळे शोध, चित्रे, काव्य एकांताचेच तर उत्सव ...तर गीतांजलीच्या वाचनानं भारावलेले दिवस होते ते. खरंच आत्मानंद देणारं संगीत, उत्तम चित्र, श्रेष्ठ कविता यांच्या आस्वादानं काय मिळतं, हे कुणाला सांगता आलंय ?

मयू संध्याकाळी आल्यावर चालतच टाऊनसेंटरला गेलो. रस्ते एवढे मोठे नाहीत. आपल्यासारख्याच गाड्या. लेफ्ट हँड ड्राइव्ह. चालणारे थोडे. मधूनमधून चौक. टाऊनसेंटरला जाताना सडपातळ नदी लागली. थेम्सचे पाणी असावे. तिच्या काठावर रेस्टॉरंट्स दिसली. संध्याकाळ मजेत घालवीत बाहेर उघड्यावरही लोक मजेत पहुडले होते. कुठल्याही USमधल्या मॉलसारखाच हाही मॉल, थोडा लहान असेल. चालतच घरी परतायचे ठरवले. जाताना गल्लीच्या कोपऱ्यावर नाजूक पेपरी पांढऱ्या फुलांनी संपूर्ण झाड डवरलेले पाहिले होते. आता ते अंधारात बुडून गेले होते .......

***




# ऑक्सफर्ड

गुगलवर ऑक्सफर्ड सर्च करून ठेवले. बरोबर नेण्याकरिता पोळीभाजी पॅक करून घेतली. ऑक्सफर्ड ! लहानपणी शाळेत असताना कुणी थोर लोक ऑक्सफर्डला शिकून आल्याचे वाचले होते. स्वप्नवत निमुळत्या मनोऱ्यांची ही नगरी. इंग्लंडच्या आग्नेय भागात असलेली सर्वांत जुनी, आजही तितकीच महत्त्वपूर्ण. गाड्या बनवण्याचे येथे कारखाने असल्यामुळे तिला इंडस्ट्रियल सिटी असेही म्हणतात. येथे सॅक्सॉन्स (Saxons) राहत होते, तेव्हा 'ऑक्साफोर्डा' (Oxanfoorda) म्हणून ओळखले जाई. येथील पहिले कॉलेज १२४९ साली सुरू झाले होते.

सकाळी लवकर उठून आवरून चालतच रेल्वेस्टेशनला गेलो. पौंडात टॅक्सी करून पैसे उडवणे परवडणारे नव्हते! शिवाय मॉर्निंग वॉक अनायसेच घडला! मयूने ऑक्सफर्डला जाणारे तिकीट काढले, प्रत्येकी ७.५० पौंडाला. रेल्वेस्टेशन लहानच पण स्वच्छ. तिकिटाप्रमाणे प्लॅटफॉर्मला जाऊन रेल्वेमध्ये बसलो. रेल्वे लहान, चकाचक. बसल्यावर थोड्या वेळाने अनाउन्समेंट झाली की, तांत्रिक अडचणींमुळे ही ट्रेन धावू शकत नाही. अमुकअमुक प्लॅटफॉर्मवरून सुटेल! तर येथेही असे होऊ शकते! धापा टाकत ट्रेन गाठली, नंतर मात्र ती पिसासारखी धावली !..... उतरल्यावर बाहेरच हॉप ऑन हॉप ऑफ बसचे तिकीट काढले, प्रत्येकी १४. ५० पौंडाला. या बसने आम्ही कुठेही उतरून

कुठेही चढू शकणार होतो. मॅप व स्थळांची माहिती असलेले एक पॅम्प्लेटही आम्हाला दिले.

२८ कॉलेजेस मिळून ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी होते. येथे कॉलेजचा उल्लेख करताना कॉलेज हा शब्द वापरत नाहीत. नुसतेच पहिले नाव घेतात. अपवाद फक्त न्यू कॉलेज. मॅगडेलन् कॉलेजला 'मॉडलन' असं लाडकं नाव दिलय. आम्ही प्रथम ख्राईस्ट चर्च कॅथेड्रलला गेलो. (Christ Church Cathedral ) हे एक कॉलेज आहे. सर्व इमारती पिवळसर क्रिमी रंगाच्या आहेत . त्यांचे आकाशात गेलेले उंच निमुळते होत गेलेले मनोरे, त्यावरचे नक्षीकाम, कमानी लक्ष वेधून घेतात. ही सर्व विद्यामंदिरे स्वप्नवत, भव्य वाटतात. Trinity college, Merton college, Christ church cathedral, All Soul's college Quad, अशी कॉलेजेस आहेत .

नंतर आम्ही "Church of st. Mary Virgin" ला गेलो. चर्च असे हे प्रथमच पाहिले. उंच मोठ्या काचेच्या खिडक्यांच्या तावदानांवर येशूच्या आयुष्यातील प्रसंग रंगवलेले आहेत. तिथेच आतून वर १२७ पायऱ्या चढून गेलो. टॉवरवरून देखावा फार सुंदर दिसत होता. तेथील तळमजल्यावरील दुकानातून सोव्हेनियर घेतले.

त्याच्या जवळच मागच्या बाजूला 'Radcliffe' आहे. सर्व नैसर्गिक घटकांपासून बनवलेली ही एक गोलघुमटासारखी इमारत आहे. वरचा घुमट ब्रासपासून बनवलेला आहे. इतक्या जुन्या काळी अशी वास्तू बनवली, हे एक आश्चर्यच. पण तिथे आत जायला बंदी होती. त्याच्या जवळच 'बोडलियन लायब्ररी' (Bodleian Library) आहे. आम्ही दुपारी चारच्या टूरचे ४.५० पौंडाचे तिकीट काढले. इथे प्रत्येक ठिकाणी गेले, की आत जाऊन बघायचे तिकीट काढावे लागते. अजून हातात वेळ होता, तोपर्यंत बोटॅनिकल गार्डन बघायचे ठरवले; तिथेही तिकीट पडलेच ३.५० पौंडाचे. तिथे आर्टिफिशीयल क्लायमेट तयार करून केलेली ग्रीनहाऊसेस होती. झाडे बघायला मजा आली, पण तसे ग्रीनहाऊस लहानच वाटले.

हे गार्डन थेम्सच्या काठाला आहे. नदीच्या पाण्याला बोटी लागलेल्या होत्या आणि बोटी फिरवत कोणी चाललेही होते. तेथून या नदीवरचा सर्वांत जुना पूल (Magda-Len bridge) दिसला. तो जसाच्या तसा आजही उभा आहे. त्यावरून वाहतूकही चालू आहे! तिथे १६८३ मध्ये स्थापन झालेले ('Ashmolean

Musium of Art and Archaeology') आहे. पण ते पाहिले नाही. मोठी म्युझियम्स आम्ही लंडनमध्ये बघणार  होतो. आम्ही ओपन बसमधून राईड घेतली. गाईड माहिती सांगत होता. एका विद्यापीठाच्या इमारतीवर धातूचा हत्ती होता. त्याने सांगितले की भारतीय भाषांतील व संस्कृतमधील ग्रंथ येथे जतन केले आहेत. हे भारतातूनच नेले आहेत, हे सांगणे न लगे! चार वाजायच्या थोडे आधी आम्ही बोडलियन लायब्ररीच्या स्टॉपला उतरलो. ही इ.स.१६०२ मध्ये स्थापन झालेली आहे जिला English Gothic Architectureचा उत्कृष्ट नमूना म्हणता येईल. छताला गोलसर गुंठने (ribled vault ), कमानी  केलेले नक्षीकाम आहे. हे सर्व दगडाचे व लाकडी आहे. छताला ४५५ bosses आहेत. या प्रत्येकाला विशिष्ट अर्थ आहे. या तळमजल्यावरील लायब्ररीला 'The Divinity School' असेही म्हणतात. वरच्या मजल्यावर गेलो. या भागाला 'Duke Humfrey's Library' असे म्हणतात. लायब्ररी पाहून अवाक झालो. रशियन , जपानी .... अशा अनेक भाषांतले ग्रंथ अतिशय काळजीपूर्वक जपून ठेवले आहेत. त्याकरिता त्यांनी खूप मेहनत घेतली आहे. ग्रंथांपुढेच आडवे बेंच वाचण्यासाठी ठेवले आहेत. ही लायब्ररी रेफरन्स ओन्ली लायब्ररी आहे. यामधील पुस्तके medieval periodपासून खूप जुनी आहेत. ही पुस्तके तेथेच बसून वाचावी लागतात. हॅरी पॉटर या सिनेमाचे शुटींग येथेच झाले होते. महत्त्वपूर्ण हस्तलिखिते जतन केलेली आहेत. Thomas Bodley (१५४५-१६१३ ) याने ही जतन केली. हे भव्य ज्ञानाने संपन्न दालन पाहून आपण अवाक होतो.

Panoramio, Pitt-Rivers Museum, Ashmolean Museum आम्ही पाहिली नाहीत. एकतर प्रत्येक ठिकाणी बघायला तिकीट काढा आणि अशी म्युझियम्स आम्ही लंडनमध्ये बघणार होतो. शेवटची बस पाच वाजता सुटून रेल्वेस्टेशनला सोडणार होती. तोपर्यंत फिरून घेतले. रेल्वेने वीस मिनिटांत रेडींगला पोचलो. बाजूचे दृश्य आपल्या एक्सप्रेस हायवेसारखे वाटले. स्टेशनवरून चालतच घरी पोचलो. मनाच्या अनुभवाच्या विश्वात ऑक्सफर्डने आपली ठळक नोंद केली.

आज रविवार. आरामात उठलो. उठल्यावर आठवले आज होळी. मयू म्हणाली, 'पुरणपोळी करता येईल?' आधी पोहे टाकले आणि एकीकडे डाळ शिजत लावली. बारा वाजेपर्यंत कढी-भात, भाजी, पुरणपोळ्या स्वयंपाक

झालासुध्दा. मन इतकं हलकफुलकं होतं, की त्या उत्साहाच्या भरात पुरणावरणाचा स्वयंपाक आटोपलासुध्दा. माझ्याही नकळत मला जाणवले, अरेच्या, कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन इतका महत्त्वाचा असतो तर !... भारतातून आलेल्या त्या अपार्टमेंटमधील मुलांनी कुंकूच कालवून एकमेकांना लावले. अंघोळ करून जेवण केले अन् दुपारी एक वाजताच फिरायला बाहेर पडलो. थेम्स नदीच्या काठाकाठाने. एका बाजूला घरांची बॅकयार्ड्स होती. मधूनमधून माणसे दिसत होती. नदीवर पूल होते. या रस्त्यालाच लागून टेस्को मॉल आहे. तेथून घरी फोन केला. भाज्या व इतर खरेदी केली. मध्ये जरा थांबून बेंचवर बसून घरी आलो..

आज रेडींगला येऊन आठवडा होईल. योगासनं करून ई सकाळ वाचला. दुपारी मयू जेवायला घरी येई. तिच्या बरोबरच लायब्ररीत गेले, तिचं कार्ड दाखवून. ही लायब्ररी तिच्या ऑफीसजवळच होती. तिथेच टेबलावर बसून काही लिहिलं. ऑफीस संपल्यावर ओरॅकल मॉलमधून मागे गेलो. एका इटालियन हॉटेलमध्ये गार्लिक ब्रेड आणि तिरामसू खाल्ले .

... आठवडा चालू झाला की भरपूर एकांत मिळे. ऑफीसला जाताना स्कर्ट, जॅकेट, केसांना ब्रुच, डोक्यावर ऐटबाज हॅट असं मुलीचं रूप मी बघत राही. आत्मविश्वास, कुठल्याही परिस्थितीला सामोरं जाण्याची आणि त्यातून मार्ग काढण्याची वृत्ती तिला परक्या देशात उपयोगी आली.

इथे येण्यापूर्वी तिचा इंटरव्ह्यू झाला होता, तेव्हा कंपनीच्या मॅनेजरने विचारले होते...If I call u to join in the chilly winter; do you have any objection ? तेव्हा हसत हसत तिने उत्तर दिलं होतं .. Then it will give me a chance for shopping winter clothes ! या उत्तरावर त्या कंपनीचा मॅनेजर Mr. Sean खूश झाला होता .

..रेल्वेस्टेशनच्या जवळच एक बाग होती. त्याच्या बाजूला चर्च दिसत होते आणि त्याला लागून होती, एक मोठी पडकी पुरातन काळातील भिंत. ती तशीच जतन करून ठेवलीय. बागेत डॅफोडील्स फुललेली दिसत होती. सिंहाचा एक मोठा पुतळा दिसत होता. बाग तशी फार मोठी नव्हती.

इथे मुख्य रस्त्यावरून सायकलवरून जाणारी माणसे दिसतात. सायकल हे सहज वापरले जाणारे वाहन. या सायकलला पुढे चार दिवे असतात. त्यामुळे गाड्यांच्या गर्दीतूनही त्या ओळखता येतात. सायकलस्वाराला फ्ल्युरोसंट पोपटी रंगाचे जॅकेट आणि हेल्मेट वापरणे सक्तीचे असते.

***

# लंडन

लंडन बघायची अपार उत्सुकता लागून राहिली होती. रोमन काळापासून अस्तित्वात असलेली, २००० वर्षांचा इतिहास जतन केलेली ही नगरी. ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता असे म्हणतात. त्या ब्रिटनची ४०० वर्षांपासूनची ही राजधानी. रोमनांचा पाडाव झाल्यावर खऱ्या अर्थाने लंडन शहराची वाढ झाली. शहराचे दोन भाग 'सिटी ऑफ लंडन' व दुसरा 'वेस्टमिस्टर..' मयूरीची मैत्रीण सुकन्या राज बॅनर्जी हिच्याकडे शनि-रविवारच्या सुट्टीला जायचे ठरले. राज मूळचा बंगाली. त्याचे वडील कलकत्त्याचे. तो बॉर्न अँड ब्रॉट अप इन लंडन. सुकन्याचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमधून झालेले. नुकतेच लग्न होऊन ती इथे आली होती. शुक्रवारी आम्ही त्यांच्याकडे जाऊ, तेव्हा त्यांचेही जेवण घेऊन येऊ असे सांगितले होते. म्हणजे ऑफीस मधून आल्यावर तिलाही काही करायला लागू नये. आईच्या हातचं जेवण मिळणार म्हणून तीही खूष झाली. शिरा, मटारउसळ, पोळीभाजी, डालतडका सगळं पॅक करून बॅगेत ठेवलं. शुक्रवारी संध्याकाळी ७.३० वाजता ट्रेन होती, रेडींग टू ईलिंग ब्रॉड वे. घरातून ६.३०ला निघालो. चालतचालत रेल्वेस्टेशनला जायचे होते ना! हिथ्रो विमानतळाच्या एका बाजूला रेडींग आहे तर दुसऱ्या बाजूला लंडन. रेडींगपासून लंडनला जायला साधारणपणे ४५ मि. लागतात.

मला आवडतो प्रवास करायला. लहानपणी बैलगाडीतून केलेला प्रवासही आठवतो. फाट्यावर बसने सोडल्यावर खाचखळग्यातून बैलगाडी जाताना ते बसल्या जागेवरून उडणं ! आजूबाजूची शेतं निवांत बघत .. तर प्रवास करावा जवळ लांब कसाही ... प्रवास करताना आपण नुसतेच आपल्या जागेवर स्थानापन्न होत नाही, तर एका अर्थाने आपण आपल्या जागेवर येऊन बसतो. विश्वाच्या अफाट पसाऱ्यात आपलं अस्तित्व किती नगण्य आहे, याची जाणीव होते. कुठल्याही कामाधामाचा ससेमिरा मागे नसतो. नवे अनुभव मोकळेपणानं कुठल्याही दडपणाशिवाय स्वीकारता येतात. बाहेर होणारे बदल आतलेही दरवाजे उघडू पाहतात. आपल्याही नकळत आपली दृष्टी विस्तारते.

...सुकन्या अन् राज न्यायला आले होते. सुकन्याचे घर छान आहे. टुमदार तीन मजली बंगला. डिनर झाल्यावर त्यांच्या गप्पा चालल्या होत्या ..

सकाळी जाग आली, ती कर्णमधुर रवींद्र–संगीताने. राजकडे रवींद्रनाथ टागोरांच्या गाण्यांच्या सीडीज होत्या. बंगाली मला समजत नव्हते. पण ऐकायला इतके गोड लागले ! सकाळी उठून आम्ही चहा करून घेतला. सुकन्याच्या स्वयंपाकघरातच डेस्कटॉप होता. त्यावरून शोधून राजने टू फॉर वन तिकीटे काढून दिली. आणि पूर्ण दिवसाचं ट्यूबरेल्वेचं तिकीट, ज्यामुळे आम्ही कुठेही उतरून कुठेही चढू शकणार होतो. काही सुचना दिल्या. हेवी ब्रेकफास्ट करून, फूल गियरअप होऊन निघालो, लंडन देखने ! माझ्या आवडीची मस्त पावसाळी ढगाळ हवा होती. थंडी होतीच. स्टेशनवर अगदी तुरळक माणसे दिसत होती. ट्यूबने जाण्याचा पहिलाच अनुभव. ट्रेनमध्ये व्यवस्थित मॅप होता. आणि now next stop is so.. so.. अशी अनाऊन्समेंट चालली होती. उतरताना Mind the gap bet. platform & train अशीही !

एके ठिकाणी जमिनीवर एक जण मांडी घालून बसला होता. वाटले, हा कसा माझ्यासारखा दिसतोय आपल्याच तंद्रीत! ...तर तो भिकारी होता! मग दिसली त्याच्या पुढ्यात नाणी टाकलेली. माझ्या मनात चमकून गेले, मीही भीकच तर मागते आहे की सुंदराची, मंगलाची.. पुढे असे व्हायोलीन वाजवणारे बरेच जण दिसले. गोरेगोमटे ठीकठाक कपडे घातलेले. त्यांना भिकारी कसे म्हणावे !

वॉटर्लू स्टेशन आले . बाहेर पडून थोडे चालत गेल्यावर दिसला प्रचंड मोठ्ठा आकाशपाळणा. हेच ते **'लंडन आय'**. जगातील सर्वांत मोठे निरीक्षण चक्र. हे

३५० अंश ३० मिनिटांत एक फेरी पूर्ण करते. याला ३२ कॅप्सूल असून एका कॅप्सूलमध्ये २५ व्यक्ती मावू शकतात. या कॅप्सूल डोळ्यांच्या आकाराच्या असतात. आम्ही एका केबिनमध्ये बसलो. इतक्या उंचीवर गेलो तरी पोटातले पाणी जराही हलले नाही! खाली दृष्य लाजवाब दिसत होते . थेम्स नदी, तिच्या पात्रात सळसळणाऱ्या लाटा,.... लंडन ब्रीज, टॉवर ब्रीज, बिग बेन..असे बरेच. ते आता आम्ही बघणार होतो .

खाली पाहिल्यावर वारुळातून आलेल्या मुंग्यांसारखी माणसे दिसत होती. हातात झेंडे घेऊन प्रोटेस्टंट्स चालले होते. सॅलरी कट वगैरेंसाठी त्यांच्या काही डिमांड्स होत्या; पण तोंडातून शब्द काढीत नव्हते. भलामोठा मोर्चा शांतपणे नदीच्या काठाने चालला होता. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून तो कुठल्या वेळेला कुठून जाणार, याचा रूट आधीच लोकांना माहिती करून दिला होता.

नदीकाठाने झाडेही दिसत होती, आपल्या निष्पर्ण हातांनी येऊ घातलेल्या स्प्रिंगला जणू ये ये म्हणत होती.... नंतर बोटीने निघालो. बोट कसली पाण्यावरचे विमानच जणू ते ! पुलाखालून नदी ओलांडून गेलो.. एकूणच आज कसे अन् किती कोनांनी पाहू असे होऊन गेले होते.. चार वर्षांपूर्वी यू. एस.ला जाताना विमान लंडनला थांबले होते, तेव्हा विमान उतरताना ब्रीज, थेम्स नदी दिसली होती ....आज लंडन बघायचा योग आला. सोव्हेनियर शॉपमध्ये एक उगाचच राउंड घेतली. बाहेर कट्टे होते अन् मोठी मोकळी जागा. तिथेच बसून आणलेली पोळीभाजी खाल्ली अन् चालत निघालो, 'टॉवर ऑफ लंडन' पहायला.

**टॉवर ऑफ लंडन** हा अकराव्या शतकातील राजा विल्यमचा राजवाडा होता. नंतर त्याचा तुरुंग झाला. हा इ.स. १०८०मध्ये बांधलेला आहे. आता भव्य म्युझियममध्ये रूपांतर केले आहे. पुरातन वस्तू जतन करण्याचे इंग्रजांचे प्रेम हे बघताना दिसून येते. एक पडकी भिंत तशीच ठेवलीय, हटके शोभा यावी म्हणून. बाहेर खंदक दिसले, ज्यात आता पाणी नाहीय पण हिरवळ दिसली. हा किल्ला नदीच्या काठापासून जवळ आहे.. सारे लंडन शहर नदीच्या या नाहीतर त्या काठावर गच्च वसलेले आहे. आपली पुरातन शैली मिरवीत टच्च उमललेल्या वास्तुपाकळ्यांनी गगनाला भिडत... आठव्या हेन्रीच्या काळातले पोशाख घालून येथे गार्ड निश्चल पुतळ्यासारखे उभे असतात, उंच पिसांची टोपी मिरवत. पूर्वीच्या राजांचे सहावा-सातवा-आठवा हेन्री, थॉमस वुल्झ, पहिला जेम्स, एडवर्ड पहिला-दुसरा-तिसरा...यांचे वेष, त्यांची सिंहासने, सोन्याची भांडी एक ना दोन; किती




म्हणून सांगावे सर्व जतन केलेय. सगळ्यात कळस म्हणजे त्यांचे मुकुट ! आज निर्जीव वाटणाऱ्या या वस्तूंना कितीदा झाले असतील स्पर्श जिवंत सळसळीत रक्तांचे. मेंदूतून स्फुरणाऱ्या भन्नाट कल्पनांनी यांवरील हिरेमाणके अधिकच प्रकाश फाकीत असणार! या सर्व वस्तूंखाली त्यांचा इतिहासही लिहिला आहे. एका मुकुटावरचा हिरा लखलखीत, तेज:पुंज प्रकाशकिरणे फाकीत होता; अन् तो होता आमच्या भारतातून आणलेला कोहिनूर हिरा ! कोहिनूर हिरा १०५.६० कॅरट वजनाचा असून त्याचा अर्थ प्रकाशाचा मुकुट असा होतो. आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील एका खाणीतून कोहिनूर हिरा मिळाला होता. याचा इतिहास इ.स. १३०४पर्यंत मागे जातो. आधी हा मुगल सम्राट बाबरच्या मुकुटात विराजमान होता त्यानंतर तो महाराणा रणजितसिंगाकडे गेला. ब्रिटिशांशी झालेल्या युध्दात ईस्ट इं. कंपनीने खंडणी म्हणून बळकावला व नंतर व्हिक्टोरिया राणीला इ.स. १८५०मध्ये भेट म्हणून दिला. तेव्हापासून तो टॉवर ऑफ लंडनमध्ये आहे. या कोहिनूर हिऱ्याचा पुढला इतिहास काय असेल कोण जाणे ! जगातील सर्वांत मोठा आफ्रिकन हिरा येथे आहे. या अमूल्य वस्तू बघण्यासाठी सरकता प्लॅटफॉर्म होता आणि अर्थातच कडेकोट बंदोबस्त होता. फोटोग्राफी करण्यास मनाई होती. दुसऱ्या दालनात लहानशी डॉक्युमेंटरी लावली होती. त्यावेळचे राजाराणी, त्यांची

आपापसातील युद्धे वगैरेंची.

दुसऱ्या भागातील म्युझियममध्ये पूर्वीच्या तलवारी, ढाली, तोफ, चिलखते, शिरस्त्राणे, धातूचे घोडे मांडले होते.. या टॉवर ऑफ लंडनचे ट्रेटर्स गेट भल्यामोठ्या गजांचे आहे.

थेम्सच्या काठाने फिरताना दिसला लंडन ब्रीज. खरे तर हा साधा ब्रीज आहे. आज मला माझ्या नातीची आठवण न येती तरच नवल ! रोज आय पॅडवर गाणं वाजायचंच 'London bridge is falling down..falling down My fair lady !.....' तर प्रत्यक्ष या ओळी उलगडताना दिसणार होत्या. पलीकडे युगानुयुगे दिमाखात उभा आहे, तो टॉवर ऑफ ब्रीज. त्यावरची कलाकुसर लाजवाब. दोन्ही बाजूला झेपावणारे उंच मनोरे जणू सांगतात, 'आकाशा, तुझी अथांगता पाण्यात बघ! म्हणूनच जणूकाही यावरचे नक्षीकामही निळ्या रंगाचे. क्रिमी रंगाच्या दगडीकामावर हा निळा रंग लक्ष वेधून घेत होता. आश्चर्यचकित करणारे त्याचे सौंदर्य बघत होते, तो अजून मोठा आश्चर्याचा धक्का बसला. हा ठरावीक वेळेला बोटी जाण्या-येण्याच्या वेळी उघडतो अन् बंद होतो ! तो बनवणाऱ्या इंजिनीयरला मी सलाम ठोकला ! मोठे आव्हान, सौंदर्य याने उघडे केले आहे. थेम्सच्या काठाने त्याच्या आजूबाजूने चालताना, पापण्यांची उघडझाप करताना तो निमीषभरही मिटू नये, असेच वाटत होते.

भलीमोठी थेम्स दुसऱ्या एका ब्रीजवरून क्रॉस करून गेलो. पलीकडे होती, 'टेट्स गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट'. वाटले, पाहून तर घेऊ, पुन्हा थोडेच कोण येणार आहे. एकदोन दालने पाहिली; पण वाटेत घेतलेले गरम कॅरॅमल दाणे जास्त आवडले !

.. खरे सांगायचे तर इंग्लंडमध्ये फिरताना भावना संमिश्र होत्या. आपल्याला पारतंत्र्यात ठेवणाऱ्या गोऱ्या साहेबाचा हा देश. इंग्लंडमधल्या 'Gray's Inn' मध्ये सावरकरांनी बॅरिस्टरीचे शिक्षण घेतले होते. 'Vermlam Building' असे त्या बिल्डिंगचे नांव. शाळेत शिकलेला स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आठवत होता. आता परिमाणे बदलली. याच गोऱ्या साहेबाचे पान संगणक क्षेत्रात बाजी मारणाऱ्या आपल्या सावळ्या मुलांमुलींखेरीज हलत नाही! आपल्या भारतीयांची नांवे त्यांच्या ऑफीसमधल्या डेस्कवर मिळालेल्या स्टारसह जेव्हा झळकताना दिसतात, तेव्हा ऊर अभिमानाने भरून येतो.

तर येतानाचा द्राविडी प्राणायाम पुन्हा करून ट्यूबबाईंना महत्त्वपूर्ण दिवसाची सफर घडवल्याबद्दल दुवा दिला. सुकन्याकडे येताच सोफ्यावर बसकण मारली. पाय साधे नव्हे, तारस्वरात बोलू लागले होते ! जेवून, To start the next day mind to sleep well म्हणून झोपी गेले !

रात्रभर गाढ झोप झाल्यावर सकाळी उठल्यावर लक्षात आले, कालची तंगडतोड विसरून आपले पाय पुन्हा ताज्यातवान्या दिवसाला सामोरे जायला गियरअप झालेत ! त्यात सुकन्याने ब्रेकफास्टला तिरामिसूही खायला घातलेय!... सुकन्याच्या डायनिंग रूममधील व इतरही काही कपाटांची दारं मला उघडीच दिसली. मला वाटले चुकून उघडी राहिली असतील, तर ती म्हणाली,''मावशी, ही दारे बंद उघड करण्यात थोडा तरी वेळ जातोच. घरी आम्ही दोघेच. कोणी येत जात नाही !......'' तेव्हा आता मॉलमधल्या दरवाजांसारखी ऑटोमॅटिक उघडबंद होणारी घरातील कपाटांची दारे बसवली गेली, तर आश्चर्य वाटायला नको!! ..ब्रंच करून साडेअकराला बाहेर पडलो. राजने दिलेल्या सर्व डायरेक्शन्स, सूचना जवळ होत्या आणि एक दिवसाचा ट्यूबचा पास. **'हाईड पार्क'** कॉर्नरला उतरून चालत निघालो. तो एकदम हिरवळीवर धातूच्या सात-आठ काळ्या पट्ट्या उभारलेल्या दिसल्या. खाली लिहिले होते की, कोणीतरी उष्ण प्रदेशातील झाडे येथे आणली होती, पण ती इथल्या थंडीत मेली. त्यांच्या स्मरणार्थ या पट्ट्या! मला मनोमन त्या निसर्गप्रेमीची आस्था कळून आली. जरा पुढे गेल्यावर डाव्या बाजूला हिरवळ पसरलेली दिसली. मधूनमधून काही झाडे. हा हाईड पार्क मधून जाणारा रस्ता होता. कुठेच लपायला जागा नाही म्हणून की काय, पिवळ्या फुलांचा एक वाफा मात्र हसत होता. मधूनमधून थोडी माणसे दिसत होती. कोणीही भाषणे झोडित नव्हते किंवा ऐकायला कुणी तयार नसावे. पु.लं. त्या 'अपूर्वाईतल्या' अपूर्वाईने कात टाकली की काय !

भाषणस्वातंत्र्याचे प्रतीक बनलेला हा हाईड पार्क. याचा एक विशिष्ट कोपरा 'स्पीकर्स कॉर्नर' म्हणून ओळखला जातो. रविवारी ठेवलेल्या स्टँडवर उभे राहून कोणीही भाषण करू शकतो. नेपोलियनचे वॉटर्लू करणाऱ्या ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या सत्कारार्थ एक स्मारक येथे दिसते.

चालत जरा पुढे गेल्यावर आहे, **'बकिंगहॅम पॅलेस'** म्हणजे राणीचे निवासस्थान. दरवाजे, खिडक्या बंद होत्या. आत कोणी राहतेय की नाही? काहीच हालचाल दिसत नाहीये. वाटले, कोण जाणे एखाद्या खिडकीतून पडदा

बाजूस सारून राणी बघतही असेल, आज कोणकोण मेहमान आलेत ते. त्या दरवाजांवरचे सोनेरी नक्षीकाम, गज यांचे फोटो काढले. आत भलेमोठे आवार दिसत होते आणि भलीमोठी काळी फरची टोपी अन् लाल अंगरखा घालून राणीचे हुजरे दिसत होते. इथे ठरावीक वेळेला राणीच्या अभिवादनाला परेड होते. हा ३०० वर्षांपूर्वी बांधलेला भव्य पॅलेस आहे. ६०० कक्ष असलेला हा पॅलेस राणी व्हिक्टोरियाने बांधला. परेड असते, तेव्हा वादकांच्या वाद्यांना चकाचक पॉलीश केलेले असते.

या मुख्य गेटच्या बाहेर पुष्करणीवजा मनोरा आहे. उंच स्तंभावर सोनेरी मुलामा दिलेला गरूड आहे. बाजूला स्त्री-पुरुषांची नग्न म्युरल्स आहेत. वर मेरी व तिची बाळे यांचे पुतळे. यांना काही ऐतिहासिक संदर्भ आहेत. हे संदर्भ नंतर माहिती करून घेता येतील, आता तर रोमन काळातील टोपी चढवून मस्त फोटो काढून घ्यायचा मूड होता.. **हाईड पार्क**च्या काठाने ट्यूबने आलो, 'पिकॅडली सर्कस'ला.

संपूर्ण लंडन सिटीत ट्यूबचे जाळे पसरलेले आहे. पहिले ट्यूबचे स्टेशन १९०६ साली बांधले. इथे इतक्या ट्यूब्स सारख्या धावत असतात, पण वेळेत चूक होत नाही. सगळे कसे वक्तशीर, सुरळीत चालू असते. येथे दहा रेल्वेमार्ग आहेत. जमिनीच्या खाली २०० फूट ते ६०० फूट रेल्वेमार्गाचे जाळे पसरलेले आहे.

**पिकॅडली सर्कस** हा न्यूयॉर्कच्या टाईमस्क्वेअरसारखा लंडनचा गजबजता भाग. इथे दुकानांवर मोठमोठ्या जाहिरातींच्या साईन्स दिसतात. रस्त्यांवर गर्दी दिसते. बसेस, मोटारी, टॅक्सीज, सायकलींची. फक्त पुणेरी स्कूटरबाई कुठे दिसल्या नाहीत. थिएटर, रेस्टॉरंट्स यांनी गजबजलेला हा भाग आहे. शंभर वर्षांपूर्वीचा इरासचा पुतळा येथील फाऊंटनवर दिसतो. इथेच थोडे फिरून घेतले. लंडन म्हणजे 'इतिहास, जगण्यातील गती, ....असे बरेच काही'. असे येथे राहणारी माणसे म्हणतात. येथून जवळच खांबावर स्वीस लोकांनी दिलेले काही मॉन्यूमेंट्स माउंट केले आहेत. त्याखाली 'इन फ्रेंडशिप वुइथ यू.के.' असे लिहिले आहे. मुख्य रस्त्याच्या आत आत चालत जायला लहान रस्ते आहेत, त्याला लागून लहान दुकाने आहेत.

तिथून जवळच **'ट्रॅफलगार स्क्वेअर'**ला गेलो. हे इंग्रजी आरमाराच्या विजयाचे स्मारक ठरलेले आहे. येथे चार कोपऱ्यात चार सिंह दिसतात. मध्यभागी


उंच ओट्यावर ॲडमिरल लॉर्ड नेल्सनचा पुतळा उभारलेला आहे. तो १७० फूट उंच आहे. त्याच्या तळाला नेल्सनच्या आयुष्यातील चार प्रसंग दाखवले आहेत. कारंजी आहेत. येथे सभा, रॅलीज होतात. आज रविवार आणि त्यात मस्त ऊन पडल्यामुळे लोक ऊन खात लोळत पडले होते ! बाजूला गोल घोळका जमला होता. कुठलेतरी जिवंत नाटक चालले होते. थोड्या अंतरावर कुणीतरी आर्त सुरात व्हायोलीन वाजवत होता. त्याच्या पुढ्यात नाणी टाकली जात होती. एकंदरीत लंडन शहराच्या जिवंत तारा झंकारत होत्या...

या स्क्वेअरला लागूनच आहे **'नॅशनल गॅलरी'**. इथे लिओनार्डो, होगार्थ आदी मोठमोठ्या चित्रकारांची चित्रे आहेत. तेराव्या शतकापासून काढलेली पेंटींग्ज बघायला वेळ अपुरा पडतो. स्टील लाईफ, निसर्गचित्रे, पोर्टेट्स.. भारावून टाकणारी चित्रे. एकेका चित्राकडे किती वेळ बघत बसावे! आणि खरेच प्रत्येक दालनात मध्यभागी सोफे टाकून बसून बघायची सोय केलीय. व्हॅन गॉग आणि **लिओनार्डो द व्हिन्सी** यांची स्केचेस पाहिली. **व्हॅन गॉग**ची चित्रे वेगळी वाटली. एक साधी पिवळी खुर्ची होती. त्यावर एकदोनच वस्तू होत्या. मागे एका बॉक्समध्ये कांदे होते. त्यांना हिरवे कोंब फुटत होते. जणू त्याला म्हणायचे होते,

'लाईफ इज सिंपल. इट जर्मिनेट्स ॲज इट इज!' अजून एक होते, पिवळ्याधम्म सूर्यफूलांचे. सूर्याकडे डोळे करून बघणारी ही फुले एका फुलदाणीत विराजमान झाली होती, ती मात्र व्हॅन गॉगने खास मांडली होती त्याच्या आवडत्या मित्राच्या भेटीप्रसंगी. अजून एक सळसळते पिवळ्या शेताचे रानच जणू आणि वर झाडे फक्त बुंधेच दाखवणारी. काय म्हणायचेय त्याला ? बुंध्याच्या आकारावरून झाडाचा विस्तार जोखा, की त्या लगतच्या पायवाटेने वाऱ्याच्या दिशेने वळा ? आत्मशोध घ्या. आत्मशोधातून आत्मबोधाकडे... लिओनार्डोचे येशूच्या जीवनावरील बायबलचा संदर्भ देणारे चित्र. त्यात दाखवलेले बारकावे अपूर्व होते.. ही कलादालनं केवळ अनुभवायचीच गोष्ट आहे.... शेवटी आवरते घ्यावे लागले.

चालत निघालो. इंग्लंडमध्ये एकूण जमिनीचा भाग कमी, त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा उंच इमारती दिसतात. रोमन शैलीची नजाकत मिरवणारे, सोन्याचा घुमट अन् नक्षी असलेले, **'बिग बेन'** दिसले. नाजूक अन् भव्य. सुंदर अन् पुरातन. बरोबर पाच वाजता नभाला लपेटत टोल निनादला. जणू सांगत होता, आयुष्यातला हा तुझा अविस्मरणीय तास....ब्रिटनच्या संसदेची भव्य वास्तू म्हणजे राजवाडा, **'वेस्ट**

**मिन्स्टर पॅलेस**'. इ.स. १३९५मध्ये दुसरा रिचर्ड याने हा बांधला. इ. स. १९४७मध्ये हा संसदेला देण्यात आला. 'हाऊस ऑफ लॉर्डस' व 'हाऊस ऑफ कॉमन्स' या इमारती लागून आहेत. या एकशे एकोणसाठ वर्षे जुन्या आहेत. ब्रिटनच्या लोकशाही परंपरेची साक्ष असलेली ही वास्तू. व्हिक्टोरियन शैलीचे बांधकाम आहे. दुसऱ्या महायुध्दात ही वास्तू नाझी हिटलरच्या विमानांनी बॉंब फेक करून उद्‌ध्वस्त झाली होती. हाऊस ऑफ कॉमन्सचा बिगबेनकडील निम्मा भाग पडला होता. याचे दोन मजले पुन्हा पूर्ववत बांधण्यात आले. पॅलेसच्या आवारातील जगप्रसिध्द बिगबेन घड्याळ म्हणजे ३१६ फूट उंच टॉवर आहे. त्याचा व्यास चार मी. आहे. यावरील घंटा साडेतेरा टन वजनाच्या आहेत. बेन नावाचा लंडनचा कमिशनर होऊन गेला त्याचे नाव दिले गेले. वेस्ट मिन्स्टर भागातच महत्त्वाची कार्यालये आहेत. व्हिक्टोरिया ओव्हर ग्राऊंड रेल्वे स्थानक, स्कॉटलंड यार्ड पोलिसांचे मुख्यालय याच भागात आहे.


**बिग बेन**

प्रसिध्द **'टेन डाउनिंग स्ट्रीट'**ने गेले की दिसते ब्रिटिश पार्लमेंट. नवीन प्रवेशद्वार काळ्या दगडात बांधलेले आहे व त्याला बॉंब निरोधक यंत्रणा बसवलेली आहे. आत ऑफीसेस आहेत. बाहेर पोलीस होते. इथल्या आवारातच क्रॉमवेल व किंग जॉर्ज यांचे घोड्यावर बसलेले पुतळे आहेत. येथे पंतप्रधान राहतात म्हणून पोलीस पहारा असतो. येथील पार्लमेंट चौकात विन्स्टन चर्चिलचा पुतळा आहे. दुसऱ्या महायुध्दात जेव्हा हिटलरची विमाने दिवसभर बॉंबवर्षाव करीत होती, तेव्हा पायी हिंडून त्यांनी लोकांना धीर दिला. शेवटी ब्रिटन जिंकले.. पुतळा


वेस्ट मिनस्टर पॅलेस

उभारताना कबुतरांनी घाण करू नये म्हणून विशेष व्यवस्था केली आहे.

**'वेस्ट मिन्सटर ॲबे'** हे मुख्य चर्च जवळच आहे. ही वास्तू अकराव्या शतकात बांधली गेली. इंग्लंडच्या राजाराणीवर वेगवेगळे संस्कार येथे केले जातात. यावरची शैली लक्षणीय वाटली. राज्याभिषेक खुर्ची (Coronation chair) येथेच पाहावयास मिळते. शास्त्रज्ञ, कवी, विन्स्टन चर्चिल यांची सीमेट्री येथे आहे. ट्रफल्गरच्या युध्दातील शूर सेनानी नेल्सनचे दफन येथे केले गेले. आज ते बंद होते.

असे रमतगमत पायी फिरल्यामुळे लंडन शहरही बघता आले. बेकर स्ट्रीट, पिकॅडली सर्कस व ऑक्सफर्ड स्ट्रीट हे लंडन शहरातले सर्वांत गजबजलेले भाग. शेरलॉक होम्सच्या बेकर्स स्ट्रीटवरील पत्त्यावर त्याला चाहत्यांची पत्रे येत. याच्या टोकाला रीजंट्स पार्क व लागूनच 'मादाम तुसोज'आहे. ट्यूबने गेलो **'ऑक्सफर्ड स्ट्रीट'**वर. हा लंडनमधला मुख्य बाजार. 'मार्क अँड स्पेन्सर'ची येथे दुकाने दिसली. तेथे पाहिले 'सेल्फिजेस' वस्तू-भांडार. हा पहिला मॉल सुरू केला तेव्हा चालकाला वाटले कोण वस्तू घेणार? तेव्हा त्याने जाहिरात केली. 'या. खा. प्या. बसा. वस्तू हाताळा. बघा. घ्या किंवा नका घेऊ..' आता मॉल संस्कृती सर्वत्र रुजली आहे. पण ती सुरू करणाऱ्या त्या आद्यचालकाचे भांडार काचेच्या



**वेस्ट मिन्स्टर ॲबे**

खिडकीतून पाहून घेतले. कारण संध्याकाळचे सहा वाजले होते आणि सर्व दुकाने बंद झाली होती. अगदी फुटपाथवरचा फेरीवालाही याला अपवाद नव्हता.

असे हे लंडन ! येथील ग्रीनवीच या गावातूनच काल्पनिक शून्य रेखांश जाते. दिवस आणि रात्र यांतील फरक लक्षात येण्यासाठी उन्हाळाच्या सुरुवातीला घड्याळे एक तास पुढे करावी लागतात. या शतकाच्या पूर्वी विलेट नावाच्या माणसाने ही युक्ती शोधून काढली. ग्रीनवीच येथेच थेम्स बॅरेज म्हणजे पूरनियंत्रक बंधारा आहे. हा नव्हता, तेव्हा पुराचे पाणी लंडनभर पसरत असे. ५२० मी. रुंदीचा हा हलता बंधारा आहे. याला १० पोलादी भव्य दरवाजे आहेत. खांबांसाठी ५ लक्ष टन काँक्रीट लागले. १९८३मध्ये चाचणी घेऊन १९८४ साली 'थेम्स फ्लड बॅरिअर'चे उद्‌घाटन झाले होते.

वेळ कमी पडला म्हणून 'मादाम तुसा' बघायचे राहून गेले. कलादालनातून बाहेर पडताना चुटपूट लागून राहिली. इंग्लंडच्या वास्तव्यात अजून एकदा लंडनला यायला मिळावे, असे वाटत राहिले. ट्यूबने सुकन्याच्या घरी पोचलो. तेथून सामान घेऊन रेडींगला येईपर्यंत रात्रीचे साडेदहा वाजून गेले होते. रेल्वेस्टेशनवरून टॅक्सी करूनच रूमवर आलो.

***

इंग्लंडच्या वास्तव्यात मला भरपूर बघायला मिळालं आणि त्याचबरोबर एकांतही. इतके दिवस लहानथोरांचं करण्यात, त्यांचं हवं नको बघण्यात माझ्याही लक्षात आलं नाही की एकांत मिळणं ही माझी गरज होती ! आणि बदल हीही... आपलं आपण असणं ! आपल्या आत आपण डोकावत राहणं !

फुलपाखरं फुलाफुलांवरून उडत असतात; पण प्रत्येक फुलावर त्यांच्या पंखांच्या रंगाचे ठसे जसे वेगवेगळे उमटतात, तसंच प्रवास करताना होत असावं. तीच पर्यटनस्थळं, तोच निसर्ग पण तो पाहून प्रत्येकाच्या मनात उमटणारे तरंग वेगळे. प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा.... पाहताना जाणवलेलं शब्दांकित करावं अशी प्रेरणा मन देत राहिलं, म्हणून तर हा लेखनप्रपंच. आणि तो लिहिताना पुन:प्रत्ययाचा मिळणारा आनंद.

आणि वाटलं की गरजा फार वाढवू नयेत. पण कायम प्रवासिनी असावं! गावोगावी, वेगवेगळ्या प्रदेशांत हिंडावं. केवळ एखादं स्थळच नव्हे तर निसर्गाची विविध रूपे, झाडे, पशू, पक्षी, माणसे.. निरखताना आयुष्याच्या रस्त्यावर संवेदनशील असावं. आणि आठवली मेरी व्हॅान (Mary hone). पॅरीस शहरातील कॉलेजमध्ये ती भाषाशास्त्र शिकवी. सारं जग बघण्याची इच्छा धरणारी. आणि त्याप्रमाणे ती योजना करी. अर्धेअधिक जग तिचे केव्हाच बघून झाले होते. इथे पुण्याला आली होती, तेव्हा आम्ही तिला पानशेतला घेऊन गेलो होतो... तेव्हा समोरून एक खेडूत महिला डोक्यावर मोळी घेऊन येत होती, तेव्हा ती मोळी म्हणजे काय हे तिला समजून सांगता सांगता कशी त्रेधातिरपीट उडाली होती!

आठवड्यातले पाच दिवस मनाजोगे वाचन–लेखन होई. शनि–रवि भ्रमंती! आमच्या राहायच्या ठिकाणाजवळून दिवसातून एकदोनदा तरी सायरन वाजवत

ॲम्ब्युलन्स जाई, तेव्हा धस्स होई ! थकलेल्या मामंजींची, वडिलांची आठवण येई... पिकलेली पानं ती. पण मला इथला बहर बघायला मिळतो आहे, याचं त्यांना कोण अप्रूप. आमच्या घराच्या जवळच होतं 'बर्कशायर हॉस्पिटल' (Berkshire Hospital). हॉस्पिटलपेक्षा राजवाडाच म्हणावा अशी त्याची दर्शनी बाजू होती. आत अद्ययावत, सुसज्ज हॉस्पिटल होतं !.... संध्याकाळी मोकळ्यावर जेव्हा एकटीच फिरायला बाहेर पडे, तेव्हा चालताना सहज लक्ष जाई. किती सुंदर सजवलेल्या असत घरांच्या खिडक्या ! शोभेच्या वस्तू, फुले, टुमदार कुंड्या, कँडलस्टँड...बघत राहावं..

जवळच एक लहानशी बाग होती. मध्ये बाग आणि बाजूला दगडी इमारती. 'ईडन स्क्वेअर' म्हणत त्याला. बागेमध्ये रुफुस डॅनीअल इसॅक्स ( Rufus Daniel Isaacs 1860-1935) व्हाइसरॉय ऑफ इंडियाचा पुतळा होता. हा आधी दिल्लीमध्ये उभारला गेला. त्यानंतर १९६०मध्ये तो रेडींगला आणला गेला आणि १९७१मध्ये या बागेत बसवण्यात आला.

***

# सुंदर पँगबोर्न

आज भारत विरुध्द श्रीलंका क्रिकेटची फायनल मॅच होती. इथे खोलीत टीव्ही तर नव्हता. तेव्हा अचानक ठरवले की नेचर वॉकला जाऊ. रेल्वेस्टेशनवर गेलो. तेथून रेडींग टू पँगबोर्न (Reading to Pangbourne) तिकीट काढले. हे गाव ऑक्सफर्डच्या रस्त्यावरच आहे. दोन स्टेशनांनंतरच हे टुमदार खेडे आले. रेल्वेस्टेशन फक्त एकाच प्लॅटफॉर्मचे! वेटिंग रूम, ऑफीस बंदच होते. बाहेर येऊन चालत निघालो. रस्ते लहान लहान. गोंगाट, गर्दी नाही. शहराच्या दगदगीपासून दूर निसर्गाबरोबर राहणारी टुमदार सुंदर घरे ! जवळपास कुठे सोय दिसेना म्हणून तिथेच एका रेस्टॉरंटमध्ये शिरलो. आत जातानाच लिहीले होते, 'Mind your head'. इतके दार कमी उंचीचे होते ! मंद प्रकाश पसरलेला होता. सुंदर पेंटींग्ज लावली होती. चिनी मातीची रंगवलेली भांडी (पॉटरी ) तर इतकी सुरेख होती, एकेका भांड्याकडे पाहत बसावं.! हे सारं पाहूनच मला तुर्यावस्था आली ! हे सगळं खूप जुनं होतं, पण उत्तम तऱ्हेने ठेवलेलं. टॉयलेट तर इतकं स्वच्छ, शुभ्र चकचकीत बेसिन, सुंदर पेंटींग्ज लावलेली, विणकाम केलेले नॅपकिन्स घड्या करून ठेवलेले, टवटवीत फुले फुलदाणीत रचलेली. टॉयलेटच इतकं सुंदर मग बाकीचं काय बोलावं ! खरंच या लोकांकडून त्यांची सौंदर्यासक्त नजर घ्यावी .

चालत चालत निघालो. दूरपर्यंत हिरवीगार कुरणे. त्यात मधूनमधून गाई

चरताना दिसत होत्या. चांगल्या धष्टपुष्ट केसाळ गाई. मधूनच घोडेही दिसले. मधेमधे इथल्या श्रीमंत लोकांची घरे दिसत होती, महालच जणू ते. सारेच स्वप्नवत वाटत होते. थेम्सच्या काठाकाठाने फिरत चालत गेलो. जुन्या नक्षीकामाचे कमानदार पूल दिसले. आज हवा बहारदार होती. स्वच्छ आल्हाददायक मोकळ्या हवेत बसून मफीन आणि केळी खाल्ली. किती ताजेतवाने वाटत होते आज !

नदीत बदके पोहताना दिसत होती. मोठ्या बोटी जाताना दिसत होत्या. या बोटीत स्वयंपाकघर, सोफा, बेड सारे असते. या लंडनपर्यंतसुध्दा जातात. इथे थेम्स नदीवर सगळीकडे लॉक्स बसवून पाण्याचा प्रवाह कंट्रोल केला आहे. काही श्रीमंतांची घरे तर पाण्यावर बांधलेली आहेत. थेम्सचा उगम Cirencester जवळ Gloucester येथे आहे. तेथून ती वाहत वाहत येते. तिच्या काठावर सुंदर घरे, चर्चेस, पब्ज, पूल, विंटरमिल्स आहेत. तिचे शांत पाणी कोनींग (coneing)ला भावते.

पाण्यावर हळुवार लाटा उठून त्यांचे उभ्याआडव्या पट्ट्यांच्या चटईसारखे डिझाईन झाले होते. वाटले, माणसाचे आयुष्यही असेच शांतता आणि उचंबळ, सुख आणि दु:ख, नीरवता आणि कोलाहल यांची उभीआडवी वीणच तर असते!

निसर्गसौंदर्य न्याहाळत न्याहाळत थेम्सच्या काठाने आम्ही चक्क पुढल्या गोरींग (Goring ) गावाला पोचलो ! हे खेडे भारीच आवडले. त्याच्या मुग्धतेत अवखळून जात छुमछुमत रेल्वेस्टेशनला पोचलो. आमच्या डोळ्यांसमोरच रेल्वे सुटली, ते बरेच झाले ! अजून अर्धा तास ते खेडे न्याहाळायला मिळाला! प्लॅटफॉर्मवर शुकशुकाट होता. थोड्या वेळाने चारपाच माणसे आली. एकदोन डब्याच्याच रेल्वेमध्ये बसून आम्ही निघालो. वळून वळून मागे बघत ते खेडे मी नजरेत भरून घेत होते .. त्याने माझ्या मनात कायमचे घर केले होते, ते थोडेच दूर जाणार होते !

***

...परदेश बघणं ही एक गोष्ट; पण त्या देशात जाऊन काम करणं, त्यांच्यात मिसळून राहणं, त्या त्या प्रसंगी योग्य निर्णय स्वत:चे स्वत: घेणं ही वेगळी गोष्ट. मयूरी जेव्हा तिकडे गेली, तेव्हा लगेचच आठवडाभरातच तिला कामासाठी स्कॉटलंडला जाण्याचा आदेश मिळाला. अजून तिथल्या चालीरितीही तिला पुरत्या माहीत झाल्या नव्हत्या. त्यांच्या प्रोजेक्टमध्ये जेरी म्हणून स्कॉटिश माणूस होता, तो स्कॉटलंडच्या ऑफीसमध्ये काम करीत असे. स्टर्लिंगला कसे यावे, यासंबंधीची त्याची एक डिटेल मेल तिला आली होती. त्यानुसार पहाटे चार वाजता टॅक्सी ड्रायव्हर खाली आला आणि त्याने मोबाईलवरून फोन केला आणि बोलला, 'I am waiting for you downstairs, darling!' झाले ! भीतीने हिची बोबडीच वळली. परक्या देशात एकट्यादुकट्या तरुण मुलीला वेगळे काय वाटणार? पण कमिटमेंट दिलेली होती, तेव्हा रामरक्षा म्हणतच ही एकटी टॅक्सीपाशी गेली. ड्रायव्हरने बॅग डिकीत ठेवली. तो एक शब्दही बोलला नाही की त्याने मागे वळून बघितलेही नाही ! हिथ्रो विमानतळावर तिला सोडले. स्टर्लिंगला गेल्यावर जेव्हा जेरीला मयूने ही गोष्ट सांगितली, तेव्हा तो खो खो हसत सुटला आणि म्हणाला, 'Good you told that, otherwise I would have also called you darling!...' दोघांनी ब्रेकफास्ट केला आणि कामाला लागले. तर कुठल्याही मुलीला हनी, माय लव्ह वगैरे सहज म्हणण्याचा तिकडे प्रघात आहे.

माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला, तरी त्याच्याबरोबर त्याचे संस्कार असतातच आणि त्याला खास बळ देणाऱ्या, विश्वास ठेवलेल्या जागाही. तिथल्या वास्तव्यात सकाळी जाग आल्याबरोबर मयू मनाचे श्लोक लावी. शांतपणे ते ऐकत आन्हिकं आवरताना प्रत्येक दिवसाला ते एक अर्थपूर्ण दिशा देत. स्वत:चं खाणं बनवून ती ऑफीसला जाई. ऑफीसमधली तिची मॅनेजर सू लिंथवेट (Sue linthwaite) तिला म्हणाली होती, 'Oh! You cook to yourself and then come to office!....' आणि ती एक दिवस flat bread म्हणजे पोळी भाजी खायला रूमवर मधल्या सुट्टीत आलीपण ! तेव्हा ऑफीसमधल्या इतर लोकांना धक्काच बसला !.....

***

# ब्रिस्टल बाथ

रात्रीचे जेवण आटोपून चालत स्टेशनवर गेलो. ज्या प्लॅटफॉर्मवर गाडी लागणार होती, तिथे अनाऊन्समेंट झाली की ती दुसऱ्याच प्लॅटफॉर्मवर लागणार आहे. अवघी चार मिनिटे हातात होती. पळत पळत जाऊन ट्रेन गाठली. इथे असे बऱ्याच वेळा होते, हे एव्हाना लक्षात आले होते. ट्रेनने ब्रिस्टल पार्कवे (Bristol parkway ) स्टेशनला जायला साधारण एक तास लागला. रात्र अन् काचेचेच रिफ्लेक्शन येत असल्यामुळे बाहेरचे काही दिसत नव्हते. जाताना कानाला खूप दडे बसले. नंतर समजले की ट्रेन उंच डोंगरातील बोगद्यातून जात होती.

अभय फणसे व त्यांचा मुलगा प्रणव आम्हाला न्यायला आले होते. संगीता फणसे ही माझ्या वहिनीची बहीण. ठाण्याच्या अभयशी लग्न होऊन **ब्रिस्टल**ला स्थाईक झालेली. संगीताचे घर टुमदार. पुढे छोटेसे लॉन, फुलझाडे लावलेली. मागे बॅकयार्ड. गप्पा मारून झोपायला रात्रीचा एक वाजला. लवकर उठून आवरले. सकाळी साडेनऊ वाजता 'बाथ'ला जायची ट्रेन होती. त्याचे टू फॉर वन तिकीट आधीच बुक केले होते. पोचेपर्यंत साधारण पावणेअकरा वाजले असतील. रेल्वेस्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरच हॉप ऑन हॉप ऑफ बसचे तिकीट काढले आणि बाहेर येऊन स्टॉपवर थांबलो. नवीन देशात माणसे, इमारती बघण्यात वेळ कसा जातो काही कळत नाही.

**बाथ** हे इंग्लंडमधील शहर जिओथर्मल प्रकारातील गरम पाण्याच्या झऱ्यासाठी

प्रसिध्द आहे. रेल्वेस्टेशनपासून **बाथ ॲबे** (Bath Abbey ) जवळच होते. चालत तेथपर्यंत गेलो. येथे राजा एडवर्डला मुकुट चढवला गेला, ते सिंहासन आहे. पुढे बसायला राजदरबारातील मंडळींना आसने आहेत. याचाच एक भाग असल्यासारखा बाजूला येशूचा फोटो होता. मेणबत्त्या लावल्या होत्या. उजवीकडे उंच काचेच्या खिडकीवर येशूच्या आयुष्यातील प्रसंग रंगवले होते. बाहेर मधल्या चौकात ( square ) माणसे जमली होती. कुणी व्हायोलीन वाजवून गात होते. एक जुन्या काळातील बग्गी रस्त्यावरून फेरी देत होती...

ॲबेला लागूनच **रोमन बाथस** अन् पंप रूम आहे. याचा खालचा भाग रोमन शैलीचा आहे, तर वरचा भाग व्हिक्टोरियन शैलीचा. सुमारे २००० वर्षांपूर्वी रोमनांना याचा शोध लागला. युनेस्को आणि ब्रिटिश लोकांनी याला ब्रिटिश हेरिटेज साईट म्हटले आहे. पावसाचे पाणी लाइमस्टोनमधून जमिनीखाली खूप खोल जाते, जिथे अति उष्ण तापमान आहे आणि मग ते उसळून वर येते.

आत गेल्यावर प्रथम रांगेत उभे राहून रोमन बाथचे तिकीट काढले. प्रत्येकाला हेडफोन देण्यात आला. आत गेल्यावर उष्ण पाण्याचा तलाव दिसला. हा आताचा तलाव रोमन काळातील तलावापेक्षा चार मीटर उंच आहे. बाजूने टेरेस आहे इ.स. १८९७मध्ये रोमन बाथ लोकांना पहायला खुले झाले. वरच्या मजल्यावर टेरेसच्या बाजूला -Julius Caesar, B Claudius, C Vespasian,



उष्ण पाण्याचा तलाव

Ostorius Scapula, Suetonius Paulinus यांचे पुतळे आहेत. George Anderson Lawsonने त्याच्या स्टुडिओत हे घडवले. त्याचा फोटो व माहिती तिथे दिलेली आहे. प्रत्येक जागेला एक नंबर दिलेला असतो व तो नंबर प्रेस केल्यावर आपल्याला हेडफोनमधून माहिती मिळते.

पुढे गेल्यावर बरेच थांबे आहेत, तेथे माहिती ऐकून आपल्याला रोमन काळातील इतिहास उलगडत जातो. तेव्हाचे दगड, भिंती यांवर कोरलेल्या माहितीतून प्रकाश पडतो. तेव्हाची भांडी मांडली आहेत. एके ठिकाणी चक्क आपल्यासारखे जाते होते. एक दगड किती वजनदार आहे, हे कळण्यासाठी एक पुली लावली होती. आपल्याला तर दोरीही जरासुध्दा हलत नाही !... आश्चर्य वाटते, एवढ्या उकळत्या पाण्यात दगड, शिळा वगैरे टाकून प्रवाहाला वळण कसे दिले असेल याचे. एके ठिकाणी बसायला अशी जागा केली होती, की जेणेकरून हे पाणी बसून अथवा झोपून अंगावर घेता येईल. या पाण्यामुळे अनेक रोग बरे होतात, संकटे दूर होतात अशी लोकांची श्रध्दा आहे. दु:खाचे हरण करणारी त्यांची देवता आहे 'Goddess Sulis'. ताम्रपटावर आपल्या इच्छा लिहून लोक त्या पाण्यात टाकतात. नाणी फेकतात. या सर्व माहितीची डॉक्युमेंटरी मागे पडद्यावर सांगण्यात येत होती. त्या काळी त्यांची विटा बनवण्याची पध्दत आजच्या काळालाही लाजवेल अशी होती. दोन विटांमध्ये पोकळ जागा व त्यात सिमेंटसारखे मटेरियल भरून बांधकाम करीत. जास्तीचे पाणी ॲव्हान नदीत सोडले जाई.

एके ठिकाणी त्या काळच्या राणीच्या केशरचनेचे प्रात्यक्षिक चालू होते. चेहऱ्याभोवती गोल महिरपीसारख्या केसांच्या वेण्या करून बांधलेल्या व मागे बुचडा. दोन स्त्रिया त्या काळातील वेशात जाताना दिसल्या. त्यांच्याबरोबर फोटो काढून घेतला.

अशी अनेक ठिकाणी माहिती घेत शेवटच्या थांब्यापाशी आलो. तेथे समोरच्या खडकाखालून जोरात गरम पाण्याचा धबधबा येत होता. त्याचे पाणी आदळून अवतीभवतीचा भाग पिवळा झाला होता.

हेडफोन्स परत करून आम्ही बाहेर आलो. जे कुंड आम्हाला प्रथम आत जाताना दिसले होते, त्याच्या पाण्यात हात घालून पाहिले, ते चांगलेच गरम होते! ..इतिहासाबद्दल जागरूक असल्यामुळे हे लोक ऐतिहासिक वास्तूंना काळजीपूर्वक जपत असल्याची साक्ष, हे ठिकाण पाहून पटते. बाहेर आलो. बस उभीच होती.

बसमधून बाथ शहरातून फेरी घेतली. बसमध्ये पण हेडफोन असतो. आपल्याला सर्व कॉमेंट्री ऐकायला मिळते. बसमधून जाताना दुरूनच 'Plasticene Bridge' दिसला. तो इतका सुंदर अन् स्वप्नवत वाटला की बस ! 'Pultenery Bridge' ही दिसला. जुन्या काळी बांधलेले हे ब्रीज आजतागायत तसेच आहेत. Parade garden, Geogian garden या बागा आम्ही बसमधूनच पाहिल्या. The circus पाहिले. म्हणजे आपल्याकडच्या चौकासारखी मोकळी जागा अन् बाजूला गोलाकार इमारती. इथे पूर्वी श्रीमंत उच्चभ्रू लोकांचे टेरेस फ्लॅट्स होते म्हणे. या इमारतींवरच्या चिमण्या, खिडक्या, उंच दालने आलिशानतेची ग्वाही तर देतातच शिवाय इतक्या फ्रीहँडसारख्या इमारती बघून त्या काळच्या वास्तुकलेचे अप्रूप वाटते.

नंतर आम्ही रॉयल क्रेसन्ट (Royal Crescent) पाशी आलो.या इमारतीसमोर समोर लॉनवर बसलो. आज खूप दिवसांनी स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता मग काय लोक ऊन खात ऊन्हाकडे तोंड करून पहुडले होते. आर्किटेक्ट John Wood JNR (erected)ने रॉयल क्रेसन्ट १७६७–७५ या काळात बांधले. अनेक शतकांपासून आभाळाच्या पार्श्वभूमीवर ही मानवनिर्मित वास्तुकोर न मावळता भव्यपणे उठाव देत झळकत उभी आहे.. नुसतेच बाजूने जरा चालत गेलो. रॉयल क्रेसन्टच्या आत जायला परवानगी नाही. तरी खिडकीतून डोकावून जेवढे जमेल तेवढे पाहून घेतले.

रॉयल क्रेसन्ट पासून सर्कस (The Circus ) जवळच असल्यामुळे गोलाकार फ्लॅटचा थोडा भाग जवळून बघता आला. भव्य दालनांवरून लांब पडदे सोडले होते. तळमजल्यासमोर लॉन व त्यात फुलझाडेही लावलेली दिसत होती.

पुन्हा बस पकडून बाथ शहरातून फेरी घेतली. अलफ्रेड स्ट्रीट लागला. हेडफोनवरून माहिती मिळत होती. खूप पूर्वीची आयर्न रेलींग्ज पाहायला मिळाली. आपली कमानदार नजाकत मिरवत आजही ती तशीच दणकट आहेत. अजून वेळ हातात होता, म्हणून स्कायलाईन टूर घेतली. टेकडीवजा हिरव्यागार लॉनमधून उंचावरील बंगले, युनिव्हर्सिटी वगैरे दाखवत ही सफर सुखावून गेली. साधारण सहा वाजेपर्यंत ब्रिस्टल पार्कवेला परत आलो. न्यायला अभय आणि प्रणव आले होते. तुम्ही थकला नसाल तर ब्रिस्टल शहर दाखवतो म्हणाले. इथे आल्यापासून उत्साहाने हीव भरल्यासारखेच झाले होते ! मस्त स्वच्छ हवा. मोठा सनी दिवस.

मग काय, निघालो ब्रिस्टल बघायला !

ब्रिस्टल ही ग्रीन सिटी आहे. खूप मोठी हिरवीगार लॉन्स या शहरात पसरलेली आहेत. गाडीतून एके ठिकाणी उतरलो. खाली ॲव्हान नदी वाहत होती. बाजूला मातीचा गाळ साठला होता. तेथून Clifton Suspension Bridge दिसत होता. दूरवर डॉकयार्ड दिसत होते...गाडीतून जाताना रोल्सराईस इंजिनाची फॅक्टरी लागली. जेट विमाने व एअरबस बनवणारी ऑफीसेस दिसली. दुरून एक काँकार्ड दिसत होते. तिथे चढताना कुणाचा तरी ॲक्सिडेंट झाल्यापासून ते बघायला बंद होते. नंतर खाडी लागली. त्यापलीकडे आहे अटलांटिक ओशन. तिथे डॉकयार्डला लागलेली दिसली ss Great Britan Ship. तिच्यावर लावलेले झेंडे फडफडत होते. धातूपासून बनवलेली ही पहिलीच बोट. इ.स.१८४३ साली न्यूयॉर्क व ऑस्ट्रेलियाला गेली होती. हिला बघणे लोकांचे आकर्षण ठरले आहे. ब्रिस्टल ही समुद्रमार्गाने व्यापार करणारी महत्त्वाची सिटी होती. मुख्यत: आयर्लंडशी जलमार्गे व्यापार होई.. नद्यांचे पाणी समुद्रात जाई. समुद्राच्या मोठ्या लाटा व किनाऱ्यामुळे जहाजे थांबवणे कठीण जाई. येथील कारागिरांनी 'Shipshape' व 'Bristol fashion' ही जहाजे बनवली....१०५ फूट उंचीचा कॅबॉट टॉवर (Cabot Tower), John Cabot ने ब्रिस्टलपासून नॉर्थ अमेरिकेपर्यंत केलेल्या सफरी स्मरणार्थ इ.स. १८९७ मध्ये उभारलेला आहे. वुइल्यम वर्डस्वर्थही ब्रिस्टलमुळे प्रभावित झाला होता. त्याच्या काही प्रसिध्द ओळी 'Lines composed a Few Miles above Tintern Abbey' येथे लिहिल्या गेल्या. चाचे Blackbeard, Edward Teach, Bartholomew Roberts हे ब्रिस्टलचेच.

आता डॉकयार्डच्या जागी मोठमोठ्या बिल्डिंग्ज झाल्या आहेत. ऑफीसेस आहेत. प्रथमच इंग्लंडमध्ये अशा आधुनिक काचा बसवलेल्या इमारती पाहिल्या. ब्रिस्टल ही इंग्लंडची ‘सायकलिंग सिटी’ आहे. इथला प्रायमिनिस्टरही कधीकधी सायकलने पार्लमेंटला जातो ! मागे अर्थातच त्याची शोफरड्रिव्हन गाडी त्याचा सूट वगैरे घेऊन जाते! कारण सायकलस्वाराला एक विशिष्ट जॅकेट व हेल्मेट घालावे लागते. सिग्नलला इतरांसारखे त्यालाही थांबावे लागते. असे फक्त इथेच घडू शकते !

Ss Great Britain ship पाहून पुढे जाताना एक पुतळा दिसला. गुलामांचा बाजार करून त्याने अगणित संपत्ती मिळवली होती. त्याचा पुतळा बांधायचे काय

कारण ? प्रणवने विचारलेच. त्याच्या संपत्तीचा काही भाग त्याने दान करण्यात घालवला होता.. प्रणव काही किस्से मधूनमधून ऐकवीत होता. त्याच्या वाढदिवसाच्या पार्टीला त्यांनी आइसक्रीम ठेवले होते. प्रणवचे मित्र जमले होते. त्यांतल्या एका मित्राला अजून आइसक्रीम हवे होते. त्याने ते घेऊ का म्हणून विचारले. आणि नंतर जास्तीच्या आइसक्रीमचे पैसे देऊ केले ! ते अर्थातच 'अतिथी देवो भव' संस्कृतीत वाढलेल्या अभयने घेतले नाहीत.

संगीताच्या हातचे चविष्ट महाराष्ट्रीयन जेवण घेतले. आजचा दिवस बाथ अन् ब्रिस्टल बघून संस्मरणीय न ठरता तरच नवल. परदेशात या माणसांनी केलेल्या पाहुणचारामुळे खरोखर भारावून जायला झालं. आपली संस्कृती, रूढी, परंपरा सांभाळत ही माणसं परदेशात पाय रोवून उभी आहेत. त्यांनी दिलेल्या आपुलकीच्या मदतीमुळेच त्या प्रदेशात हिंडणं शक्य झालं. हे असे क्षण जगायला मिळणं, हे किती मूल्यवान आहे हे कसं सांगावं !

***

# कार्डिफ

माझी फुलांची आवड लक्षात घेऊन दुसऱ्या दिवशी संगीताने कार्डिफला भरणाऱ्या फ्लॉवर शोची तिकिटे हातात ठेवली! आमच्यासाठी कोचचे रिझर्वेशन आधीच करून ठेवले!...घेता घेशील किती दोन करांनी, असे होऊन गेले! जिव्हाळा, प्रेम, अगत्यशीलता, पाहुणचार ..या तर मोजता न येणाऱ्या गोष्टी.

सकाळी साडेनऊ वाजता कार्डिफला जाणाऱ्या बसपाशी अभयने आम्हाला सोडले. तासाभराचा प्रवास होता. युनायटेड किंगडममधील वेल्स देशाची कार्डिफ ही राजधानी आहे. जाताना सेव्हन ब्रीज क्रॉस करून जावे लागते. या पुलाची धाटणी लक्षणीय आहे. आजपर्यंत असा पूल मी पाहिला नव्हता... फ्लॉवर शो होता, त्या गार्डनसमोरच बस थांबली. आजही सूर्यदेवांची मेहरबानी होती. बाग माणसांनी गजबजलेली होती. फुलांच्या रंगांच्या किती छटा, पाकळ्यांच्या आकाराच्या विविध तऱ्हा. नुसतं पाहात राहावं काही बोलू नये!.. ..देव रंगारी रंगारी, त्रिभुवनाचे रंग भरी, लक्ष चौऱ्याऐंशी ठसे वेगळाले केले कसे? सांगा! कुणाला तरी आजतागायत सांगता आलंय का ?....बाजूला लहान लहान दुकाने होती. घरातल्या बागेत मांडायच्या वस्तूंनी ती सजली होती. खूप नावीन्यपूर्ण आणि कलात्मक वस्तू होत्या त्या.

बाहेर आवारात लिलीसारख्या फुलांनी संपूर्ण बहरलेले वृक्ष होते..चहूबाजूला पाकळ्यांचा सडा पडला होता...मंद सुगंध साऱ्या आसमंतात दरवळत होता.

अक्षरश: फुलांच्या पाकळ्यांवर आम्ही बसलो, त्याशिवाय रिकामी जागाच नव्हती! ..समोरच्या बेंचवर हॅट घालून एक म्हातारा माणूस एकटाच बसला होता... काय बरं विचार करीत असेल तो! निसर्गकवी वर्डस्वर्थ इथलाच!..भारावल्या मन:स्थितीतच बाहेर पडलो.

शेजारीच **कार्डिफ कॅसल** हा किल्ला दिसला. बाहेर बुरुजासारखे डिझाईन होते. त्याबाहेर लॉन दिसत होते. मुख्य गेटमधून आत कॅसल दिसत होता, तो पाहून घेतला. हा किल्ला मुळात रोमन लोकांनी ५५ मध्ये बांधला होता म्हणे. कॅसलबाहेर बुरुजावर झेंडे लावले होते. त्यात तिरंगाही होता. नुकताच वर्ल्डकप जिंकल्यामुळे भारताचा राष्ट्रध्वज अधिकच दिमाखदारपणे फडफडत होता ! या कॅसलचा एक भाग असल्यासारखे त्याला लागून टॉवर होते, त्यावर अर्थातच रोमन आकड्यातले घड्याळ बसविलेले होते. बाजूला काही मूर्ती दिसत होत्या. त्या रंगीबेरंगी होत्या. ही म्हणे वेलीश पध्दत (Welish style).

थोड्या अंतरावर मार्केट होते. मॉल्स ..नेहमीसारखे. थोडाच वेळ हातात होता तेवढे फिरून झाल्यावर जिथून बस सुटणार होती तेथे पोचलो. याच शहरात भव्य मिलेनियम स्टेडियम आहे. स्लायडिंग रूफ असलेल्या या स्टेडियममध्ये ७४,५०० प्रेक्षक बसू शकतात. पण ते आम्ही पाहिले नाही.

सुंदर फुलांचे दर्शन घडवून आम्हाला वेल्सने वेडे करून सोडले !...बस सुटली... मधूनमधून गाई चरताना दिसत होत्या... मेंढ्या फिरत होत्या.. गुराखी मात्र तो कुठे दिसला नाही! परतताना तो अनोखा ब्रीज पुन्हा लागला पण कॅमेऱ्यात पकडता आला नाही तो नाहीच. नाहीतरी सगळेच अनुभव शब्दांतून कुठे व्यक्त करता येतात !

..तासाभरात बस ब्रिस्टलला पोचली. रेडींगला जायची ट्रेन रात्री साडेनऊ वाजता होती. तोपर्यंत गप्पाटप्पा झाल्या. प्लॅटफॉर्मवर शुकशुकाट होता. थोड्या वेळाने दोन-तीन माणसे आली. आम्ही रेल्वेत बसून ती सुटेपर्यंत अभय गेटशी थांबला होता. त्यामुळे आम्हाला भय असे कशाचे वाटलेच नाही... रेडींगला पोचायला उशीर झाल्यामुळे कॅब करून रूमवर पोचलो. खूप वेळ झोप लागली नाही. अतिएक्साईटमेंटमुळे असेल !

***

**त**र मयूरी तेव्हा ‘प्रुडेन्शियल इन्शुरन्स कंपनी’मध्ये डिफेक्ट मॅनेजर म्हणून काम करीत असे. तिचा बॉस होता, शॉन (Mr. Sean) व त्याचा बॉस होता, सॅम नोव्होटनी. त्याचे प्रायव्हेट हेलिकॉप्टर होते व तो हेलिकॉप्टर राईड देत असे. त्याच्याशी बोलण्यातून कळले, की तो ताशी ३०० ते ३५० पौंड चार्ज करतो. हेलिकॉप्टरमध्ये बसण्याची तिची खूप दिवसांपासून इच्छा होती. माणसाने नेहमी इच्छा धरावी! कधीकधी बोलूनही दाखवावी!.. याचे प्रत्यंतर तिला लगेचच आले. तर त्याने मयूरीला विचारले, "Would you like to go for a ride..Any way I have to do couple of hours of flying to keep my licence active." आणि त्यात तो तिला राईड देऊ शकतो....असे करणे योग्य आहे ना याची खात्री शॉन व इतरांशी बोलून तिने आधी करून घेतली...आणि एक दिवस ठरल्याप्रमाणे प्रुडेन्शियलमध्ये काम करणारा मॅनेजर मि. नायजेल, त्याचे वडील व मयूरी हे ऑफीसपासून कारने ‘मारलो’ (Marlow) या जागेजवळ एअरबेस आहे तेथे गेले. तेथे सॅम नोव्होटनी थांबला होता. त्याने त्यांना दोन तास हेलिकॉप्टर राईड दिली! इंजिनाचा खूप आवाज येत होता, त्यामुळे पहिला अर्धा तास म्हणे कोण काय बोलते आहे, काही कळत नव्हते. हेडफोन्स लावल्यावर एकमेकांशी बोलता आले ! आणि तिला मजा वाटते आहे, हे सांगता आले. हेलिकॉप्टर जमिनीवर उतरल्यावर मयूरीने सॅम नोव्होटनीला ‘थँक्यू’ म्हणून स्कॉचची बाटली दिली! आता बोला! (यामुळे काही रॉंग मेसेज जाणार नाही ना, याची तिने आधी खात्री करून घेतली होती.) देश तसा वेश. देश तसा रिवाज.

"You live only once !" असं सॅम नोव्होटनी एकदा बोलताना सहज म्हणाला होता. खरंच एकदाच जगायला मिळणाऱ्या या आयुष्यात आपल्याला नेमकं काय मिळवायचं आहे, त्या वाटेने सजग प्रवास करणं किती महत्वाचं आहे. काहींना ही समज लहान वयातच येते.

...वाटून गेलं आपलीच मुलगी आपल्यापेक्षा किती वेगळी आहे ! काळाचा रेटा झपाट्यानं बदलतो आहे. त्यांना येणारे अनुभव वेगळे आहेत. गतिमान आयुष्यात त्यांची निर्णयप्रक्रिया बदलते आहे. त्यांची ती शिकतात, नव्हे शिकावंच लागतं... त्यांची ती घडतात... आपलं त्यांच्यावरचं प्रेम हाच मोठा आधार देऊ शकतं. विश्वाला कवटाळायला निघालेल्या या पिढीला संस्कारांची शिदोरी असली की पुरे..

# स्ट्रॅटफोर्ड

इंग्लंडला पोचल्यापासून शेक्सपियरची भूमी स्ट्रॅटफोर्डला भेट द्यायची इच्छा होती. जिथे तो खेळला-वाढला, जिथे त्याने स्वप्ने पाहिली, त्या भूमीला भेट द्यायची उत्सुकता लागून राहिली होती. या विकएंडला ती अंमलात आणायचा प्लॅन झाला.

रेडींग येथून आम्ही गाडी हायर केली. जिथल्या वृक्षवेलींचे, पानाफुलांचे उल्लेख त्याच्या साहित्यातून आले त्या विशिष्ट ठिकाणाला भेट देणे ही शेक्सपियरच्या चाहत्यांसाठी अत्यंत आनंदाची बाब असते.

..एप्रिल महिन्यातली मस्त आल्हाददायक हवा होती. दिशा दाखवण्यासाठी गाडीत समोर वेबकॅमेरा बसवलेला होता. मोठा हाय वे. रस्त्याच्या दुतर्फा दूरपर्यंत मोहरीची फुललेली पिवळीधम्म शेतं फार सुंदर दिसत होती. येथे मुख्यत: मोहरीची लागवड होते, ती मस्टर्ड सॉस करायला.

पोहोचल्यावर गाडी पार्क करून जवळच चालत गेलो 'हेनले स्ट्रीट'वर (Henley Street). इथे सर्व पर्यटनस्थळी असतो, तसा स्वच्छ, सुंदर मोठा चौक होता. बाजूला दुकाने. बसायला बेंचेस. लोक खातपीत बसले होते. पाहिले तर समोरच होते **शेक्सपियरचे 'जन्मघर'** ! आता ते गजबजत्या वस्तीत आले असावे. सँडविचेस खाऊन घेतली आणि चारी घरांची तिकिटे काढली. आत

गेल्यावर प्रथम बाहेर लहान खोलीवजा जागी शेक्सपियरची चित्रे लावली होती. त्यानुसार माहिती सांगितली गेली. आतल्या अंधाऱ्या खोलीत समोर टी.व्ही. स्क्रीन होता. त्यावर कॉमेंट्री लागली. त्याच्या नाटकांची नावे, सुनिते, पात्रांची स्वगते वगैरे. या खोलीत बैलगाडीच्या चाकासारखे जुने चाक, जुनी पोती असे त्या काळातले दृश्य साकारले होते. उजव्या बाजूला प्रकाशझोत पडला. तेथे शेक्सपियरची प्रतिकृती पाठमोरी लिहीत बसली होती. त्या प्रतिकृतीसमोर आडव्या फळ्यांवर काही पुस्तके मांडलेली होती. काही कागद डावीकडे. उजवीकडे फुलदाणी. पीस लावलेले पेन बुडवून तो काही लिहीत होता. त्याच्या पुस्तकाची मूळ प्रत काचेच्या पेटीत बंद होती. लोक त्याचे फोटो काढीत होते.

शेक्सपियरचे घर लाकडी आहे. आत गेल्यावर जुन्या काळातली बेडरूम दिसते. गादीच्या खाली आत-बाहेर करता येईल अशी खाट होती, त्याला फिरवायची सोय होती. त्यात बाळांना झोपवले जाई, जेणे करून त्यांना थंडी वाजणार नाही. उजवीकडे एक पाळणा होता. त्यात खऱ्यासारखे दिसणारे झोपलेले खोटे बाळ होते. इथेच शेक्सपियर जन्मला ! इ.स.१५६४मध्ये. इथेच त्याने बालपणीचा काळ घालवला. लग्न होईपर्यंत व लग्नानंतर पहिली पाच वर्षे पत्नी 'ॲने हॅथवे'बरोबर तो येथे राहिला.

शेक्सपियरचे वडील 'जॉन' ग्लोव्ह मेकर होते. वेगवेगळ्या प्राण्यांच्या कातडीपासून ते कसे ग्लोव्ह्ज बनवत हे दाखवले गेले. या खोलीला एक लहान खिडकी होती. तेथून विक्री करून ते चलन मिळवीत.

स्वयंपाकघरात जुन्या काळची भांडी, बरण्या वगैरे मांडल्या होत्या. त्या बघायला आवडल्या. त्या काळी लाकडे पेटवून स्वयंपाक करीत. ब्रेड भाजायची चूल तशीच ठेवली आहे.

या घराच्या मागे छोटीशी बाग होती. तिथे रोमिओ ज्युलिएटचा त्या काळातील पेहराव करून जोडपे उभे होते... तेथेच एका बोर्डवर भेट दिलेल्या मोठ्या लेखकांचे फोटो आणि त्यांचे या जागेविषयीचे अभिप्राय लावलेत.

चालत चालत **'नॅशस् हाऊस'**पाशी गेलो. इ.स.१६१६ साली शेक्सपियरचा मृत्यू येथे झाला. शेक्सपियरचा श्रीमंत नातजावई थॉमस नॅश यावरून या घराला हे नाव पडले. नॅशस् हाऊसच्या अंगणात पुरातत्त्व विभागाचे खणणे चालू होते. मागे बागेत मलबेरीचे झाड आहे. आज ते काळसर तपकिरी काड्यांचे दिसते. हे झाड म्हणे शेक्सपियरने लावलेल्या झाडाचे कटिंग लावून वाढवले आहे. मोठ्यांच्या

सर्वच गोष्टी मोठ्या. हे घर शेक्सपियरने १५९७ साली विकत घेतले होते. इथे त्याचे बरेच लिखाण झाले. 'टेम्पेस्ट' लिहिले गेले तेही इथेच.

येथून पाच मिनिटांच्या अंतरावर चर्च आहे. तेथे शेक्सपियरची बॉडी ख्रिस्तवासी केली गेली. त्याची पत्नी ॲने आणि इतर कुटुंबीयही तिथेच चिरविश्रांती घेत आहेत.

त्यानंतर 'हॉल्स क्रॉफ्ट'पाशी गेलो. शेक्सपियरची मुलगी 'सुसाना' व तिचा नवरा 'जॉन हॉल' यांची ही सतराव्या शतकातील राहायची जागा. उच्चभ्रू वस्तीतील सजवलेली अशी. जॉन हा त्या काळी प्रथितयश श्रीमंत डॉक्टर होता. त्या काळची भांडी, फर्निचर व वस्तू अत्यंत काळजीपूर्वक जतन केल्या आहेत.

ओढ्यावरून जाणारा निमुळता वळणाचा रस्ता... सुंदर फुलांनी नटलेले वृक्ष... आसमंतात भरून राहिलेला मंद सुवास... हा रस्ता इतका सुंदर होता की बस् ! विल्यम शेक्सपियर ॲनेशी प्रेमालाप करायला ह्याच रस्त्याने गेला असेल! त्याच रस्त्याने आम्ही **'ॲने हॅथवेज कॉटेज'** पाशी पोचलो. पोहोचता क्षणीच एकदम प्रसन्न वाटले. ॲनेचे घर गवताने शाकारलेले आहे. खूप सुंदर परिसर आहे हा. बागेत विविध फुले फुललेली दिसत होती. इतर घरांपेक्षा या घराची रचनाही वेगळी आहे. 'ॲने' ही शेक्सपियरची पत्नी. इथेच शेक्सपियर तिला भेटे. ॲनेचे

**हॉल्स क्राफ्ट**



बालपण येथे गेले. इथे त्यांचे शयनगृह पाहिले. त्यांचे बेड, खुर्ची, वेगळ्या धाटणीची टेबले, बेबीकॉट बघायला मजा आली. त्या काळी स्वयंपाक करण्याची पध्दत वेगळी होती. भांडीकुंडी मांडलेली होती. खोल्यांना अगदी लहान खिडक्या होत्या. खोल्यांतून मोठ्या शेकोट्या होत्या. विचार आला, थंडीत जेव्हा चार वाजताच अंधार पडत असेल, बाहेर हाडे गोठवणारी थंडी पडत असेल, तेव्हा कसे गेले असतील यांचे दिवस! आणि या कशाचीही तमा न बाळगता शेक्सपियरने कसे देशकालाच्या मर्यादा ओलांडून भव्य लेखन केले!...असे विचार मनात घोळवतच घराच्या बाहेर आले.

घराच्या बाहेरची बाग फारच सुंदर आहे. या घराला अल्फ्रेड टेनिसन व चार्ल्स डिकन्सनेही भेटी दिल्यात. शेक्सपियरच्या नाटकातल्या पात्रांतून स्फूर्ती घेऊन कलाकारांनी बनवलेले पुतळे येथे बसवलेत. शेक्सपियरच्या साहित्यातून उल्लेख झालेली झाडे-झुडपे येथे बघावयास मिळतात. तीनशे वर्षे हॅथवेचे वंशज येथे राहिल्यानंतर शेक्सपियर 'बर्थ प्लेस ट्रस्ट'ने इ.स.१८९२मध्ये हे घर विकत घेतले. शेक्सपियरच्या आईची झोपडी जवळच्याच एका खेड्यात आहे.

काळाची पानं माघारी पलटवत शेक्सपियरच्या काळात नेऊ पाहणारं असं हे ॲव्हान नदीकाठचं स्ट्रॅटफोर्ड. त्याचा सदा संस्मरणीय इतिहास.... पाहू ते किती साठवणीत ठेवू, असं झालं. एक स्वप्न, एक इच्छा पुरी झाली होती.

***

# विंडसर कॅसल

सकाळी नऊ वाजता ब्रेकफास्ट करून निघालो. विंडसर (Windsor) गाव लागले. लगेच ठरले कॅसल बघून पुढे निघावे. मुख्य गेटच्या बाहेर तिकीट काढण्यासाठी मोठी रांग होती. वेगवेगळ्या देशातील चिनी, जपानी,..लोक दिसत होते. पंधरा मिनिटांनंतर कॅसल बघायला उघडणार होते. विंडसर हा जगातील सर्वांत जुना व सर्वांत भव्य असा राजदरबारातील लोकांचा राहायचा किल्ला. हा कॅसल अकराव्या शतकात नॉर्मन William the Conqueror ने बांधला. पहिला हेन्रीपासून येणाऱ्या राजांनी तो वापरला. आज तो राणीच्या विकएंडचे रहाण्याचे ठिकाण आहे.

गेटमधून आत गेल्यावर तिकीट दाखवले. सिक्युरिटी चेकचा सोपस्कार पार पडल्यावर हेडफोन दिला गेला व आत जायला सांगितले. आत मोठी मोकळी जागा होती. तिथून दिसत होता दिमाखदार कॅसल ! इंग्लंडच्या राणीची राहण्याचीच जागा ही ! वेगवेगळ्या अँगलनी फोटो काढले. हेडफोनवर कॉमेंट्री चालू झाली. त्यात कॅसलचा इतिहास सांगितला गेला.

आत गेल्यावर उजवीकडे प्रशस्त हॉल होता. ही होती डॉल्सरूम. कुणालातरी राणीच्या मुलांना भेटवस्तू द्यायची कल्पना सुचली. मुलांना मोठ्यांसारख्या वस्तू आवडतात, म्हणून मग त्या लहानरूपात (miniature form) तयार केल्या गेल्या. त्या इथे मांडल्यात. त्या पाहून आपण अवाक होतो...स्वयंपाकघर सर्व

भांड्यांसकट... छोटे डायनिंग टेबल.. त्यावर छोट्या सोनेरी प्लेट्स, छोटे सोन्याचे चमचे, चांदीचे बाऊल, भांडी. छोटे डबलबेड....त्यावर फ्रीलचे सरकणारे पडदे. एक ना दोन... राणीच्या खऱ्या वस्तूंचे अगदी हुबेहूब छोटे प्रारूप.

प्रत्येक दालनाला एकेक नंबर दिलेला आहे. आपल्या हेडफोनवर तो नंबर दाबला, की तिथली कॉमेंट्री सुरू होते. प्रत्येक दालनाच्या दरवाजाशी युनिफॉर्ममधील शिपाई किंवा शिपाईण उभी असते... पुढल्या दालनात अनेक राजे-राण्यांची व इतर मान्यवरांची काढलेली हँडपोट्रेट लावली होती. पाहुण्यांची बसायची आलिशान जागा..खुर्च्या..गालिचे सारेच रॉयल...पॉटरी.. सोनेरी पेंटींगच्या चांदीच्या प्लेटस्, बाऊल्स, मग्ज, कपबशा.. कितीतरी वस्तू. प्रत्येक वस्तूतून श्रीमंती आणि कलात्मकता यांचा प्रत्यय येत होता. लक्ष वेधून घेतले, एका अननसाच्या आकाराच्या बाऊलने.

नंतरच्या दालनात होत्या ढाली, तलवारी...इथे टिपू सुलतानाने राणीला दिलेली रत्नजडित तलवार दिसली. तसेच भारताकडून दिलेला सोन्याचा मुकुट दिसला. इंदूरच्या राजाने दिलेली कट्यारही येथे पहायला मिळते. आत फोटो काढायला परवानगी नव्हती. हे सर्व अगदी कमी वेळात बघायचे ठरवले तरी कमीतकमी दोन तास तरी लागतातच.

तेवढ्यात बरोबर पावणे अकराला चेंज ऑफ गार्ड सुरू झाले. अनेक



विंडसर कॅसलचा मुख्य दरवाजा

वर्षांपासून ही प्रथा हे लोक जपत आले आहेत. लाल पोशाख, फरची काळी टोपी घालून गार्ड्सची परेड सुरू होते. जगभरातून ही परेड पाहायला खूप गर्दी होते.

कॅसलला लागूनच St. George's Chapel आहे. हिचे बांधकाम लक्षवेधी आहे. ही दहा राजांची (monarch) चिरविश्रांतीची (buried place) जागा आहे. पण आज रविवार असल्यामुळे बंद होती.

हेडफोन परत करून कॅसलच्या बाहेर आले. समोरच्या गल्लीत जुन्या काळातील ड्रेस घालून एक जण उभी होती. तिचा फोटो काढला. तिथल्या शॉपमधून सोव्हेनियर घेतले. आणि गाडी निघाली डोव्हरच्या दिशेने.

एका ठिकाणापासून पुढल्या ठिकाणी पोचेपर्यंतच्या काळात पाहिलेल्या कलाकृतीबद्दल, तिथल्या इतिहासाबद्दल मनात विचार येत राहतात. अनेक राजे, लेखक, कवी, शास्त्रज्ञ.. आले आणि गेले. त्यांनी एक महत्त्वपूर्ण ठसा काळाच्या पटावर उमटवला.. आपण सामान्य माणसं. खरंच माणसाच्या जगण्याचं सार्थक कशात आहे? याचं साध सोपं उत्तर आहे, एक चांगलं माणूस होण्यात. आणि चांगलं माणूस होण्यासाठी डोळसपणे केलेला प्रवास महत्त्वाचा ठरतो. रोजचा दिवसही लहान बालकाच्या उत्सुकतेनं जगला पाहिजे हे कळतं आणि मग आपल्या घराच्या खिडकीतून दिसणारा निसर्गही खुणावू लागतो. सांगतो, 'चलो, अपनी संवेदनाओंकी बॅग भरके निकल पडो बाहर !'.....आणि मग ठरवून टाकलं की जेवढा म्हणून प्रवास करता येईल तेवढा करायचा. अप्रतिम कलाकृती पाहताना, सुंदर निसर्ग पाहताना, याचसाठी केला होता अट्टाहास असं वाटल्याखेरीज राहत नाही.

***

# डोव्हर व्हाईट क्लिफ्स

मोठ्या हायवेवरून गाडी धावत होती. दोन्ही बाजूला दूरपर्यंत हिरवळ. वाटेत एक खेडे लागले, 'वाय' (Wye). या खेड्याने आम्हाला थांबवले. एक पब होते व त्याच्याजवळच खूप जुन्या धाटणीचे चर्च होते. जुन्या काळातले. त्याचा वरचा भाग सपाट होता. त्याच्या बाजूने चालत गेलो. सिमेट्रीतून (cemetery) जाणारा हा सुंदर रस्ता होता. गेलेल्या माणसांपुढे कुणी कुणी ताजी टवटवीत फुले ठेवली होती. जरा पुढे गेलो तर पिवळेजर्द मोहरीचे शेत विलोभनीय दिसत होते. त्या सिमेट्रीत हिरवळीवर बसायला खरोखर आवडले !...

..वाटेत पेट्रोल भरण्याची गरज होती. कुठेही पेट्रोलपंप दिसेना. सारे खेडे चुपचाप होते. रस्त्यावर अपवादानेच दिसणाऱ्या एका प्रौढ जोडप्याला पेट्रोलपंप कुठे आहे विचारले. खरे तर त्यांच्या हातात मॅप होता, पण त्यांना सांगता येईना. पुढे गेल्यावर एक मालट्रकचा ड्रायव्हर दिसला. त्याने अचूक पत्ता तर सांगितलाच एवढेच नव्हे तर तो त्याच बाजूने जाणार होता म्हणून 'follow me' म्हणाला.त्याने सांगितलेल्या रस्त्याने डावीकडे खाली उतरल्यावर पेट्रोलपंप दिसला. तिथेच मोठा मॉलही होता आणि खूप साऱ्या गाड्याही पार्क केलेल्या दिसत होत्या. पुलावरून जाणारे खूप रस्ते असल्यामुळे तो झाकला गेला होता. पेट्रोल भरून झाल्यावर आम्ही निश्चिंत झालो !

गाडी धावत सुटली... दूरवर निळेशार आभाळ दिसत होते... तोच त्याच्या खाली दिसू लागली पांढरी जहाजे. डोव्हर आले तर ! उंच पांढऱ्या डोंगरांचे कडे दिसू लागले.... ही इंग्लिश खाडी. इथे एकूण तीन फोर्ट आहेत. त्यांतला एक फोर्ट आम्ही वर डोंगरावर जाऊन गाडीतून बाहेरून पाहिला. दुसऱ्यावर चालत गेलो. पूर्वी फ्रेंच लोक आक्रमण करीत, तेव्हा या किल्ल्यांना खूप महत्त्व होते. दोन फोर्टच्यामध्ये पसरलेय डोव्हर. चुनखडीचे डोंगर म्हणजे व्हाईट क्लिफ्स ( white cliffs ) हे निसर्गाचे वरदान डोव्हरला लाभलेय. इथली सर्व घरे, समुद्रकाठच्या इमारती पांढऱ्या रंगाच्या प्राबल्याने रंगवलेल्या आहेत. म्हणजे पांढरा रंग असतोच असतो. माणसांनी हा रंग वापरून साऱ्या शहरालाच शुभ्र वस्त्रांकिता केलेय...पांढऱ्या घोड्यावरून जणू कुणी शुभ्र वेषधारी राजपुत्र रपेट करतोय असे वाटले !

असेच चालत फोर्टच्या बाजूला वर गेलो... समोर अथांग पसरलेला समुद्र दिसत होता. 'P & O' ची जहाजे लागली होती. दर पस्तीस मिनिटांनी येथून जहाजे फ्रान्सकडे सुटतात. लोक मोटारी बसेस त्यात घालून फ्रान्सला पोचतात. मूळच्या ईस्ट इंडिया कंपनीचे नाव आता बदलत बदलत 'P & O' झाले आहे. समुद्रात थोड्या अंतरावर भिंत उभारली होती. त्याला दोन दरवाजे होते. त्याच्या बाजूला असणाऱ्या खांबांवर लाल दिवे बसवलेले दिसले. हे जहाजांचे जायचे मार्ग.

डोंगरावर थोडे फिरलो. आज रविवार. सारे युनायटेड किंगडम आज बंद असते. डोंगरावरले पांढरे दगड गोळा केले, सोव्हेनियर म्हणून. तिथे एक भटकणारे कुत्रे दिसले. तेही चक्क पांढरेच होते ! इटुकली पिटुकली रानफुले डोलत होती, तीदेखील पांढुरकी !

आज बंद असणाऱ्या शहरातून चालत चालत समुद्रकिनाऱ्यावर आलो. तेथेही पांढरे गोटे पसरलेले होते. त्यावर अनवाणी चालून घेतले. फ्रान्सकडे तोंड करून समुद्राला डोळ्यांत साठवत किनाऱ्यावर बसलो. हवा जर स्वच्छ असेल तर रात्री फ्रान्सचे दिवे लुकलुकताना दिसतात म्हणे. पण निळ्या ढगांत अन् निळ्या पाण्यात फ्रान्स निळाईने झाकले गेले होते आणि अंधार पडेतो वेळ हातात नव्हता.

..गार वारा वाहू लागला...तरी मला माझा स्कार्फ गुंडाळवेना. तो काळा होता ना ! अन् माझी पडलेली काळी सावली एव्हाना या डोव्हरने अलगद उचलून नेली होती.

...बाय बाय डोव्हर...तुझी शुभ्रता थोडी बरोबर घेतलीय.

***

# स्कॉटलंड

सकाळी साधारण साडेनऊ वाजता घरातून निघून चालत रेडींगच्या बसस्टॉपपर्यंत गेलो. तेथे बसचे तिकीट काढले व पस्तीस चाळीस मिनिटांत हिथ्रो विमानतळावर पोचलो. एडिनबर्ग या स्कॉटलंडच्या राजधानीचे काढलेले ई तिकीट जवळ होते. एक बॅग चेकइन केली अन् सॅक घेऊन गेटला जाऊन थांबलो... दुपारी सव्वाबाराचे डिपार्चर होते आणि एक तास पंधरा मिनिटांची फ्लाईट. आम्हाला वाटले विमानातून खाद्यपदार्थ न्यायला बंदी आहे म्हणून काहीच बरोबर घेतले नव्हते. फ्लाईटमध्ये काहीच खायला दिले नाही. पाणीसुध्दा विकत घेतले! एक मफीन विकत घेऊन खाल्ला, पोचेपर्यंत पोटाला जरा आधार मिळावा म्हणून. एक वाजून तीस मिनिटांनी विमान एडिनबर्गला पोचले...आजचा दिवस सनी होता. छान ऊन पडले होते...एडिनबर्गचा एअरपोर्ट गावापासून लांब आहे. एक्झिटमधून बाहेर पडल्यावर सिटीत जायला बसचे तिकीट काढले व सांगितलेल्या स्टॉपपाशी येऊन उभे राहिलो. तीन-चार बसेस गेल्या, पण कुठलीही बस थांबेना...विचारल्यावर पहिल्या स्टॉपवरूनच बस सुटते, असे कळले. या बसच्या वाट पाहण्यात आमचा वेळ निष्कारण वाया गेला. सिटी रेल्वेस्टेशनपर्यंत जायला साधारण अर्धा तास लागला असेल.


एडिनबर्ग ही इंग्लंडच्या उत्तरेला असलेल्या स्कॉटलंड या देशाची राजधानी. स्कॉटलंड हा देश प्रसिध्द आहे, तो हायलँडसाठी. म्हणजे डोंगररांगांच्या रांगड्या सौंदर्यासाठी. एडिनबर्गची धाटणी वेगळीच आहे. हे शहर डोंगराडोंगरावर वसले

आहे. डोंगरांना सांधणारे पूल आहेत. वाटतं खाली नदी असेल. पण खाली शहरच वसलेले आहे ! हिचे वैशिष्ट्य म्हणजे इथल्या साडेचार हजाराहून अधिक इमारतींची नोंद युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज यादीत झाली आहे. बसमधून जातानाच एडिनबर्ग कॅसल हा डोंगरमाथ्यावर किल्ला दिसतो. एडिनबर्गला 'अथेन्स ऑफ नॉर्थ' असेही म्हणतात. ही स्कॉटिश लोकांची इतिहासकालीन राजधानी आहे.

इथल्या सगळ्या वास्तूंचा रंग काळसर आहे. पोचल्यावर आधी पोटपूजेसाठी सबवेत जाऊन खाऊन घेतले. तोवर तीन वाजले. आता बस घेऊन फिरण्यास वेळ नव्हता. पण मयूरी येथे आधी आल्यामुळे तिला विशेष ठिकाणांची माहिती होती.

स्कॉटिश लोक रूढिप्रिय असून ते स्वत:ला उच्च समजतात. एडिंगबर्ग हे शहर युरोपातील दुसऱ्या क्रमांकाचे आर्थिक केंद्र आहे. जगातील सर्वांत पहिला गोल्फ कोर्ट अठराव्या शतकात येथे बांधला गेला. येथील राजवाड्याभोवती शहराची वाढ होत गेली. स्कॉच, व्हिस्की बनवणे हा येथील एक उद्योग आहे.

इथला मुख्य रस्ता आहे, रॉयल माईल (Royal mile). लोक फिरत होते. रस्त्यावरच जादूचे प्रयोग चालले होते अन् लोकांनी गोल गर्दी केली होती. या रस्त्याने अनेक शतकांपूर्वी राहणाऱ्या स्कॉटिश लोकांचा रक्तरंजित अद्भूत इतिहास पाहिलेला आहे आणि तो आहे चोर लुटारूंचा, खुनांचा... म्हणूनच इथल्या रस्त्यावर ढाल-तलवारी घेऊन स्कॉटिश माणूस जुन्या पोशाखात उभा असतो...


डार्क क्लोझेट

त्या रस्त्यावर एक चर्चही दिसले...रस्त्याच्या दोन्ही बाजूला वुलन शाली, स्वेटर्स, मफलर्स यांनी दुकाने भरली होती...मऊसूत रेशमासारखी लोकर...आम्ही सेलमध्ये दहा पौंडाला तीन स्कार्फ्स विकत घेतले.

या शहराचे वैशिष्ट्य म्हणजे डार्क क्लोझेट (Dark closet). मुख्य रस्त्यामधून खाली भुयारात उतरल्यासारखे अगदी अरुंद बोळ जातात. शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी पूर्वी लोक इथे जाऊन

राहात असत. अठराव्या शतकातील हे व्हॉल्ट्स (Vaults) आहेत. या अंधाऱ्या गुहांतून पूर्वी लोक कसे राहत याच्या रंजक कथा आहेत. येथून नेल्सन टॉवर दूर दिसले.

एडिनबर्ग येथून साधारण संध्याकाळी पाच वाजता निघालो. रेल्वेने स्टर्लिंगला पोचायला साधारण एक तास लागला. प्लॅटफॉर्मच्या बाहेर येऊन पाच मिनिटे झाली, तोच समोरून मारुती येताना दिसला. मारुती हा आंध्रचा. तो प्रुडेंनशियल कंपनीच्या स्टर्लिंग ऑफीसमध्ये काम करीत होता. परक्या देशात आपल्या देशबंधू-भगिनींना मदत करण्याची एक साखळीच या मुलांनी तयार केली होती. विश्वास, माणुसकी, परोपकार, कुठल्याही अपेक्षेविना मदत करणे, हे त्यांचे गुण पाहून मला तर खरोखर भरून येत असे...तर मारुतीने आम्हाला सिंधूकडे सोडले. सिंधू केरळी. लग्न होऊन येथे आलेली. नवरा-बायको दोघेही आय.टी. त. पण सिंधूचा नवरा स्टर्लिंगला कामाला तर सिंधू रेडींगला! तो शनिवार-रविवारच्या सुटीला तिच्याकडे जाई. ही सिंधू आम्ही रेडींगला राहत असू, तिथेच खाली राही... तर स्टर्लिंगच्या त्यांच्या घरी आम्ही एक रात्र राहणार होतो. घराच्या चाव्या मोठ्या विश्वासाने तिने आमच्या हवाली केल्या होत्या. सामान टाकून उजेड आहे तोवर फिरायला बाहेर पडलो.

स्टर्लिंग हे अगदी लहान शहर आहे. फिरत फिरत मारुतीने आम्हाला नदीकाठी नेले. 'रिव्हर फोर्थ' (river forth) असे या नदीचे नाव आणि 'Rap Loch' असे या एरियाचे नाव आहे. इथले आकर्षण म्हणजे सर्वात जुना १२९७ सालचा पूल येथे आहे. तेव्हा तो लाकडाचा होता नंतर दगडी बनवण्यात आला... नदीकाठी हिरवळीवर बसलो. समोर 'Ochil hill' दिसत होती. दूर टॉवरसारखे दिसत होते, ते होते वॉलेस मॉन्युमेंट (Wallace monument )... देशाच्या आंध्र-पुण्याच्या गप्पा झाल्या... गप्पांच्या ओघात मारुतीने सांगितले की तो आंध्रातल्या एका खेड्यातील शेतकरी कुटुंबातून आला होता. त्याचे आई वडील इंग्रजी लिहू वाचू शकत नव्हते. जेव्हा केव्हा तो घरी फोन करतो, तेव्हा 'अब शादी कर ,अब शादी कर' असा लकडा त्याची आई लावत असते!.. मातृहृदयच ते! वेगळे काय सांगणार?

परतताना दुसऱ्या दिवसासाठी ब्रेड, फळे, चीज वगैरे सामान खरेदी केले. मारुती त्याच्या घरी गेला. आम्ही ज्या अपार्टमेंटमध्ये राहिलो ते स्टेशनपासून जवळ आणि खूप जुने होते. घरावरून गृहिणीचा हात फिरत नाहीये, हे लगेचच

लक्षात आले! स्वयंपाकघरात कटिंग बोर्डवर कांद्याची टरफलं, भाज्यांची डेखं तशीच पडली होती. सिंक भरून अस्ताव्यस्त भांडी पडली होती. मायक्रोवेव्हच्या आत पानिपत झाले होते!.. आम्ही पिझ्झा घेऊन आलो होतो, ते बरेच झाले!

झोपायला बेडरूममध्ये गेलो, तर तिथे बेडवरच काय खालीही अस्ताव्यस्त कपडे पडले होते! सिंधू इथे देखभालीला नव्हती ना! कशीबशी जागा करून आम्ही झोपलो...समोर सिंधू अन् तिच्या नवऱ्याचा लग्नातला केरळी वेशातला फोटो हसत होता!....मला भरून आले!..किती अपेक्षा, स्वप्नं, जिद्द घेऊन ही मुलं परदेशात येतात. परक्या मातीत पाय रोवण्यासाठी, स्वत:चं नाणं खणखणीत वाजवण्यासाठी त्यांना करावा लागणारा संघर्ष आपल्याला साध्या डोळ्यांनी दिसत नाही! .....कोण जाणे का, पण बराच वेळ झोप लागली नाही.

सकाळी उठून आवरले. सँडविचेस पॅक करून घेतली. सकाळी साडेनऊ वाजता रेल्वेस्टेशनवर पोचलो...ग्लासगोचे तिकीट काढले. हे शहर क्लीड नदीकाठी वसलेले आहे. या औद्योगिक शहरात पावणेअकराला पोचलो...पृथ्वेशचे विमान डिले झाल्यामुळे त्याला यायला उशीर झाला होता. रेल्वेस्टेशनवरच वेळ काढला.. स्टेशन खूप मोठे होते.. तिथेच लिहीत बसले...

पृथ्वेश हा मूळचा दिल्लीचा. त्याचे लग्न झाले होते. त्याची बायको अमेरिकेत शिकागो येथे M.S. करीत होती... दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती, मृदूभाषी आणि निसर्गप्रेमी होता तो. डोंगरदऱ्यांतून भटकंती हा त्याचा छंद. तो अनायासेच आमच्या पथ्यावर पडला! कारण त्याखेरीज हायलँडची टूर शक्य झाली नसती. ऑफीसची कामे उरकून तो ग्लासगोला रेल्वेस्टेशनबाहेर आम्हाला भेटणार होता. ग्लासगो नंतर आम्ही हायलँडची टूर फक्त कारनेच करू शकणार होतो. तो ड्रायव्हिंग करणार होता. पंधरा–वीस मिनिटांनी फोन झाला व तो गाडी घेऊन स्टेशनच्या बाहेर येऊन थांबला आहे हे कळले. ग्लासगो खूपच मोठे शहर आहे. उंच उंच मोठ्या इमारती दिसत होत्या.

गाडीने निघालो. शहरातून बाहेर पडल्यावर प्रथम साधा प्रदेश संपल्यावर उंच डोंगर दिसू लागले. या उंच डोंगरांच्या प्रदेशाला हाय लँडस् (high lands) असे म्हणतात... दूरपर्यंत हिरवळ पसरलेली होती... त्यात गुबगुबीत मेंढ्या चरताना दिसत होत्या.. मधूनमधून घोडे दिसत होते..

...पुढे गेल्यावर अजून उंच डोंगर लागले. त्यावर हिरवीगार सूचीपर्णींची

दाट झाडे दिसत होती. डोंगराचा काही भाग या झाडांनी हिरवागार तर काही भाग एकदम रखरखीत. असे दृश्य खूप वेगळे वाटले. या डोंगरांच्या मध्ये बर्फ वितळून मोठी तळी झाली आहेत... येथे रस्त्याला लागूनच मोकळी जागा केलेली असते. तिथे गाडी उभी करून आपण निसर्गसौंदर्य न्याहळू शकतो.

पण सांगते, ..धीरोदात्त, विराट, उत्तुंग हिमालयाची सर कशालाच नाही!.. एवढेच काय ...राकट देशा, कणखर देशा, महाराष्ट्र देशातल्या आपल्या सह्याद्रीइतकाही तो वळणवाटांनी भव्यदिव्य नाही. पण या लोकांनी त्यांच्या नैसर्गिक संपत्तीचे असे जतन केलेय की, तोंडात बोट गेल्याखेरीज राहत नाही. डोंगररांगांचे रांगडे सौंदर्य तसेच राहावे म्हणून कुठेही वस्ती केलेली नाही...टपऱ्या, खानावळी असे काहीही नाही. जंगले त्यांच्या निसर्गक्रमानुसार वाढू दिली आहेत...कुठेही पडलेला प्लॅस्टिकचा कचरा तर तुम्हाला शोधूनही सापडणार नाही... कित्येक वर्षांपासून हायलँडचे सौंदर्य जसेच्या तसे अबाधित आहे

..वाटेत Lomond लेकपाशी थांबलो... हिवाळ्यात हायलँड्स बर्फाने आच्छादलेले असते. उन्हाळ्यात बर्फ वितळून सुंदर तळी तयार होतात..थांबत थांबत निसर्ग न्याहाळत ग्लेनकोला (Glencoe) पोचलो. अवघे साडेचार वाजले होते. या देशाची ही एक गंमतच आहे ! एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आपण इतके लवकर पोचतो ! देशच आधी इतका लहान, त्यात रहदारी अत्यंत तुरळक. इंग्लंडचा दोन तृतीयांश भाग स्कॉटलंडने व्यापलेला आहे आणि याच्या तिन्ही बाजूला समुद्रकिनारा लाभलेला आहे. पूर्वेला नॉर्थ सी आणि पश्चिम व उत्तरेला ॲटलांटिक सी. पृथ्वेश आम्हाला ग्लेनकोला सोडून दुसरीकडे रहायला व त्याच्या भटकंतीला निघून गेला. आम्ही राहिलो त्या कॉटेजचे नाव 'inchree rooms' असे होते. खोली स्वच्छ व नीटनेटकी होती. कॉमन स्वयंपाकघर होते. तिथे तुमचे तुम्ही स्वयंपाक करून खाऊ शकता. कापायचे ट्रे, सुऱ्या, काटे, चमचे, प्लेट्स अत्यंत व्यवस्थित मांडून ठेवल्या होत्या. आपले काम झाल्यावर आपण या गोष्टी स्वच्छ करून जागच्या जागी ठेवणे सक्तीचे होते.

..पोचल्या पोचल्या साडेचार वाजता आम्ही जंगलट्रेकला निघालो...दाट जंगल..त्यातून जाण्याचा अनुभव अद्भुत होता...सूचीपर्णी झाडे..खाली फर्न्स वाढलेली...अरुंद पायवाट..त्यातून जात राहिलो...दूरवरून पाण्याचा आवाज कानी पडत होता... तो आवाज जवळ जवळ येऊ लागला... तसा धबधबा दिसला ! तो अन् बाजूची पार्श्वभूमी मिळून नितांत सुंदर दृश्य दिसत होते! ...दूर

तळे चमकत होते. त्यावर पाण्याची सुरेख जाळी विणली गेली होती. त्यात सूर्यास्ताचे आभाळ उतरून रंगांचे अनोखे पॅलेट तयार झाले होते... सूचीपर्णी झाडांच्या रेखीव फांद्यांची सळसळ.. पाण्याचा झुळझुळ आवाज... पक्षांचे मधुर बोल... जंगलाची नीरव शांतता अनुभवत कॉटेजकडे परतलो

कॉटेजच्या बाहेर बेंचवर बसून सँडविचेस खाल्ली. सूर्यास्त निरखत राहिलो.. काही म्हणा प्रवासातला सूर्य काही और असतो! मावळताना त्याच्या सोनेरी लाल किरणांतून किती अल्लद उतरता येतं आपल्याला या ढगावरून त्या ढगावर. मिटून जाणाऱ्या दिवसाशी हितगुज करीत निवांत मिटून घेता येतं. तसा तर कामंधामं उरकून घरी परतताना रोज मावळताना लालबुंद सूर्य दिसतोच की, पण तेव्हा घरी गेल्यावर कुकर लावायचीच धास्ती असते!....

सकाळी उठून आवरून रूमची चावी देऊन निघायला साडेदहा वाजले. एका ठिकाणी थांबलो. पृथ्वेश त्याचा ट्रेक करून येणार होता. तोपर्यंत आम्ही जवळ डोंगरावर फिरून आलो. असेच फिरत फिरत सुंदर ठिकाणी थांबत निसर्गाचा अवर्णनीय आनंद घेत होतो

'फोर्ट विल्यम टाउन' (Fort William town) क्रॉस करून आम्ही 'Glen Nevis" पाशी आलो. इथे व्हॅलीला 'Glen' म्हणतात...नंतर आम्ही आलो 'Ben Nevis' रोप वेपाशी. रोप वेचे तिकीट २२ पौंड प्रत्येकी म्हणजे महाग वाटले.. म्हणून वर जायचा प्लॅन रद्द केला. तिथेच बाजूला कॅफे हाऊस होते. तिथे कॉफी घ्यायचा प्लॅन झाला. शेवटच्या घटकेला सूप पाहून मी प्लॅन बदलला व सूप घेईन म्हटले. माठासारख्या भांड्यातून टोमॅटो सूप ओतून त्यावर तिथली वेट्रेस चीजची मस्त नक्षी काढत होती... पण ते सूप चवीला अगदीच काहीतरी लागले. कसेबसे चारपाच चमचे संपवून राहिलेले पॅक करून घेतले, तेही नंतर गाडीत धक्का लागून सांडून गेले! आणि गाडी स्वच्छ करणे क्रमप्राप्त झाले!..आपण किती सहज सवयीप्रमाणे एखाद्या पदार्थाच्या चवीची कल्पना करतो, पण भलत्याच रसनेला सामोरे जावे लागते!

आम्ही निघालो. **'बेन नेव्हीस'** टुरिस्ट स्पॉटपाशी आलो. येथून पृथ्वेश त्याच्या ट्रेकला निघून गेला. आम्ही बेन नेव्हीस चढू लागलो! चक्क अर्धे चढून गेलो असू... प्रसन्न ताजीतवानी हवा... दूरवर सूचीपर्णी झाडांची दाट बने..ऊन सावल्यांचा लपाछपीचा खेळ...आल्हादायक शिंतोडे शिंपडणारा पाऊस..आणि उंच वर बर्फाचा मुकुट घातलेला बेन नेव्हीस!! ...हा बेन नेव्हीस वर्षातले पाच-

सहा महिने तरी बर्फाने आच्छादलेला असतो व ३६४ दिवस ढगाळलेला! आता एप्रिल महिन्यात खूप गिरीप्रेमी हौसेने चढताना दिसत होते. उतरत्या कुरणांवर गुबगुबीत मेंढ्या चरताना दिसत होत्या. मधे मधे पडलेल्या मोठ्या दगडांजवळ त्या पिलांसह आडोशाला बसलेल्या दिसल्या.

बेन म्हणजे पर्वत, mountain. नेव्हीस (Nevis) हे त्याचे नाव. बेन नेव्हीस हा U.K.मधला सर्वांत उंच पर्वत. U.K.तला हं! तो इतका सहज चढून जाता येण्यासारखा सोपा आहे! सह्याद्रीच्या कडेकपारी पाहायची आपल्याला सवय झालेली असते... मला आठवलं, एकदा आम्ही निसर्गप्रेमी पाबे घाटातून गेलो होतो. पूर्वी फक्त दोन चाकी वाहनेच जाऊ शकत असत. आता सिंहगडाच्या उजवीकडून चांगला रस्ता झाला आहे... डोंगर उतरणीवर झाडेच्या झाडे कारवीच्या फुलांनी बहरली होती!...तानाजी मालुसरे जेव्हा सिंहगडावर धारातीर्थी पडले तेव्हा त्यांचा मृतदेह या मार्गाने खाली शिवथरघळीजवळ 'उमरठ' या त्यांच्या गावी उतरविण्यात आला होता. या मार्गाला म्हणतात 'मढेघाट'..पहाडी सौंदर्य ...तर सह्याद्रीसारखा सह्याद्रीच बरं का !

वर गेल्यावर तिथल्या दगडांवर बसून बाजूचे दृश्य बघत राहिलो... आणि बघतच राहावेसे वाटले, तोच रिमझिम पाऊस सुरू झाला... समोरच्या डोंगरावर ऊन पडले होते... आणि चक्क समोर पहाडावर दुहेरी इंद्रधनुष्य दिसले!.. निसर्गसुध्दा किती कहर करतो ना! ....अनुपमेय– अवर्णनीय काय, काय म्हणायचे आपण!!

खाली उतरल्यावर नदीच्या काठाला निवांत बसून एखादे निरागस बालक प्रकाशाच्या तिरिपीतल्या धुलिकणांना पकडायचा जसा खेळ करते ना, तसे त्या क्षणांना साठवण्याचा प्रयत्न करीत राहिले! ...मनाच्या नोंदवहीत खरं तर या साऱ्यांची नोंद झाली होतीच, पण तिथेच एका बेंचवर बसून वहीत लिहिण्याचा फुका प्रयत्न करून पाहिला.

.. ते दिवस मोठे होते. पृथ्वेश त्याचा ट्रेक करून आठ–सव्वाआठ वाजता आला तरी उजेड होता...गाडीने निघालो ..वाटेत पहिल्यांदा जेवण घेतले. चक्क गोवन करी–भात व पराठा खायला मिळाला !..अंधार दाटत चालला... रस्त्यांवरील ॲरो साईन्स वैशिष्ट्यपूर्ण वाटल्या. ॲरो पांढऱ्या रंगाचे होते व त्यावर षटकोनी सेल सारखे डिझाईन काढलेले दिसले. अंधारात त्यामुळे लाईट परावर्तित होऊन हे साईन्स खूप चमकतात... रस्त्यावरून आमची गाडी धावत होती...तुरळक एखाद–दुसरी गाडी दिसे.. आम्ही ज्या युथहोस्टेलमध्ये उतरणार होतो, तिथे फोन

झाला तर ते दहा वाजता बंद होते असे कळले. ही युथहोस्टेल्स् धर्मशाळेसारखी असतात. तेथील बाईंना विनंती केल्यावर त्या आमच्या नावाचा कागद व रूमच्या चाव्या ठेवणार होत्या.

पोचेपर्यंत रात्रीचे जवळजवळ बारा वाजले. गाडीतून उतरलो. आकाश चक्क निरभ्र होते. असंख्य चांदण्या लुकलुकताना दिसत होत्या !.....मागे कोकणात जाताना आमची बस बंद पडली होती. रात्रीचीच वेळ होती ती. टायरचे पंक्चर निघेपर्यंत सर्व प्रवासी उतरलो होतो. अमावास्येच्या त्या रात्री किती सुंदर दिसले होते आभाळ चांदण्यांनी चमचमताना! ते पाहणारी तेव्हाची माझी नजर तरुण होती. सारा चंदेरी भवताल खुळ्यागत खुणावत होता....आज आकाश जास्तच खाली उतरल्यासारखे वाटले. चांदण्या जास्त जवळ आल्यात हे जाणवले व त्या पलीकडले गूढ, अज्ञात, अमूर्त असे काही खुणावू लागले.

..हे लेडीज युथहोस्टेल मुख्य रस्त्याला लागून होते आणि तेवढेच एकमेव. दूरपर्यंत किंवा जवळपास एकही इमारत दिसत नव्हती. पिनड्रॉप सायलेन्स..दाट अंधार... परका प्रदेश... आम्ही दोघीच जणी... प्रथम थोडी भीती वाटली. पण मग आमच्यासाठी ठेवलेला कागद वाचला. रूमच्या चाव्या घेतल्या. आमची रूम मुख्य दरवाजाच्या समोरच होती. कागदावर लिहिले होते की, मुख्य दरवाजा आतून लावून घेऊ नये, पण तरी घाबरून आम्ही तो आतून लावून घेतला! वाटले, यापुढे एवढ्या रात्री कोणी येणार नाही!...त्यानंतर कधीतरी रात्री जोरजोरात दार वाजवल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. पण आम्ही कसले दार उघडतोय! ...जोरजोरात माणसांच्या बुटांचे आवाज आमच्या रूमभोवती फिरून दूर गेल्याचा आवाज येत राहिला... अंथरुणात जराही न वळता डोक्यावरून पांघरूण घेऊन आमचा श्वास तेवढा चालू राहिला!... कधीतरी पहाटे डोळा लागला.

दुसऱ्या दिवशी उलगडा झाला की ते आमच्यासारखेच प्रवासी होते आणि मुख्य दार न उघडल्यामुळे त्यांना शेवटी ते युथहोस्टेल चालवणाऱ्या बाईंना फोन करून दुसऱ्या डुप्लिकेट चाव्या आणून प्रवेश करावा लागला. आम्ही मध्यरात्री असे सगळ्यांना सूचना न पाळून अडचणीत आणले होते!..आम्ही दुसऱ्या दिवशी दहादा माफी मागितली!...तर असो!...

आम्ही राहिलो त्या ठिकाणाचे नाव होते **'लॉकनेस'** (Lochness). हे आमचे बेसकँप होते व येथे आम्ही दोन रात्री काढणार होतो. दुसऱ्या दिवशी उठून

आवरायला साडेनऊ तरी वाजलेच. अंघोळीची गोळी घेतली! ..रात्री भीतीने जागरण झाले होते ना ! लेडीज शॉवर बाथरूम्स वरच्या मजल्यावर होती...आमच्या खोलीत बंकबेड होते. किमान सामान असलेली स्वच्छ खोली होती ती. उठल्यावर आपापली अंथरुणे-पांघरुणे धुवायला टाकायची स्पष्ट सूचना होती ...तोंड धुण्याकरिता सात-आठ बेसीन्स लागून लागून, तशीच स्नानगृहे ..सगळी स्वच्छ. खरंच सार्वजनिक स्वच्छतेचे धडे या लोकांकडून गिरवावेत...कॉमन कीचन होते... ते चालवणाऱ्यांशी ओळख करून घेतली. ती एक जर्मन महिला होती. आठ महिने येथे राहून चार महिने ती जर्मनीला जाई.

हेवी ब्रेकफास्ट करून निघालो. आता आम्ही जाणार होतो 'ile of sky'ला. म्हणजे समुद्रकाठाने स्कॉटलंडचे सौंदर्य न्याहाळीत न्याहाळीत....स्कॉटलंडच्या तिन्ही बाजूला समुद्र आहे आणि तो मधूनमधून किनाऱ्यातून आत घुसलेला आहे, त्यामुळे किनारे अत्यंत सुंदर दिसतात. हिरवी दाट कुरणे..दूरपर्यंत पर्वत.. मेंढ्यांचे कळप... पाहत रहावे.....एक टुमदार गाव 'Portree' लागले..

समुद्रकाठच्या 'An Cailc'ला पोचलो. हा एक उंच कडा होता. येथून खाली समुद्रकिनाऱ्यावर मोठा सिलिंडरवजा भाग दिसतो. खूप पूर्वी यात म्हणे गवत टाकत असत व ते जाळत. ते गवत साठवण्यासाठी केलेल्या खोल्याही दिसत होत्या. त्यापासून म्हणे साबण बनवला जाई व तो समुद्रमार्गाने साउथ आफ्रिकेला जाई.. तिथे दगडावर बाहेर लिहिले होते-

'An Cailc- the story of Skye Diatomite- this is one of a series of panels interpreting special places in Skye and Lochalsh.'

कड्यावर उभे राहून खाली दिसणाऱ्या समुद्राचे दृश्य डोळ्यांत किती साठवू असे झाले. बाहेर पोस्टरवर गवताचा भारा वाहून नेणारी म्हातारी बाई दाखवली होती... पूर्वीच्या काळी जेव्हा ट्रान्सपोर्टच्या सवलती नव्हत्या, तेव्हा तो भारा घेऊन ती गावाकडे कशी जात असेल याची कल्पना करून दाखवणारी.

..जसे आपण महाबळेश्वरला वेगवेगळ्या पॉईंट्सना थांबून निसर्गसौंदर्य न्याहाळतो ना, तसेच वेगवेगळ्या थांब्यांना थांबून समुद्रकिनाऱ्यांचे विशाल सौंदर्य न्याहाळायचे थांबे आहेत... पुढे गेल्यावर आम्ही एका पॉईंटला थांबलो. येथे पुराणसंशोधकांना डायनासोरचे अवशेष सापडले. त्याचे फूटप्रिंट्स दिसले. तिथे लिहिले होते, 'creag an Fheilidh- Kilt Rock views and spot clues

tells about skye's past'.

..पुढे जात राहिलो...एके ठिकाणी उतरून खाली गेल्यावर दिसला, 'The bay of seals' येथे पूर्वी fishing चाले. त्याकरिता विशेष प्रकारच्या बोटी-coble वापरल्या जात. त्याही येथे ठेवल्यात...दूर..दूरपर्यंत समुद्र नजरेत मावत नव्हता. बाजूला दगडीवजा जुने बांधकामही दिसत होते, जेथे बोटीतला माल उतरवला जाई.

गाडी पुढे जात राहिली... तो दिसले, हिरव्यागार कुरणात एक टुमदार घर. आणि तेवढेच एकमेव. आजूबाजूला कुठेही दुसरे घर अथवा वस्ती दिसत नव्हती, घराभोवतीच्या बागेत कमरेत वाकलेले आजोबा काम करताना दिसले. घरावर पाटी दिसली Art gallery...आम्ही थांबलो...गॅलरी पहायला उघडी होती. आत गेल्यावर चकीत झालो ! आजोबांनी स्टुडिओ इतका निटनेटका अन् सुंदर ठेवला होता की बस ! ...सुंदर सजवलेली खिडकी...घराभोवती फुललेली इटुकली बाग...रंगीत पेन्सिलीने काढलेली कितीतरी सुंदर चित्रे तेथे लावली होती. त्यांनी बनवलेली काही ग्रिटींगकार्डस् मांडली होती. त्यांनी सांगितले की, त्यांची बायको फोटोग्राफी करते व ते चित्रे काढतात. पण ती आम्हाला कुठे दिसली नाही हे सारे ते टेबलावर चित्रे काढता-काढताच सांगत होते...त्यांच्या टेबलावर खूप रंगीत पेन्सिली मग्जमधून अगदी व्यवस्थित ठेवलेल्या दिसल्या.... वस्तीपासून, साऱ्या गजबजाटापासून दूर एकांतात राहून त्यांची चाललेली कलेची साधना पाहून त्या कलावंताला मी मनोमन प्रणाम केला. समुद्राच्या गहराईसारखा त्यांचा स्टुडिओ काही सांगू पाहत होता!

नंतर 'Loch Shianta' इथे थांबलो.. पूर्वी इथे ज्या वनस्पती सापडल्या त्यांचा उपयोग रोग बरा करण्याकरिता करत असत. तेथेच एक विहीर आहे, तिच्या पाण्यामुळेही म्हणे रोग बरे होत. तिथे बाहेर लिहीले होते-

'Example of practices from Gaelic Scotland-holy wells were important in medieval times the most celebrated healing well. Gaelic people understood the healing power of plants including those on the shore.'

वाटेत 'Fort-The cairn' लागला. स्कॉटिश लोक एक वेगळ्या प्रकारचे वाद्य वाजवतात, (bag-piper) त्याचे स्कूल येथून जवळच आहे. ते अठराव्या शतकापासून आहे म्हणे. तिथे लिहिले होते- 'Fort-The cairn is to

commemorate the MACARTHURS heriditary pipers to the MAC DONALDS of the isles during 18 th century. Their school of piping stood at nearby peingown.'

वाटेत एक जुना किल्ला दिसला. त्याचे गेट बंद होते व त्यावर danger असे लिहिले होते. तरी काही लोक गेटवर चढून पलीकडे जाताना दिसले. मग आम्हीही गेलो. भीती वाटेल अशीच परिस्थिती होती ! कडे अगदी पडायला आलेले... खोल खाली अक्राळविक्राळ समुद्र...दूर उभे राहूनच पाहून घेतले.

आत्तापर्यंत आम्ही पूर्व किनारपट्टीवरचे समुद्रकिनारे पाहत होतो. आता आम्हाला जायचे होते, western pt. seashore पाहायला..पश्चिम किनाऱ्याचे सौंदर्य निरखायला, तोच कासवासारख्या आकाराचा अवाढव्य खडक समुद्रात घुसलेला दिसला. त्याच्या डाव्या बाजूला चार-पाच डोंगर दिसले...उजवीकडे पठारवजा भागावर जाऊन खाली पाहिले तर प्रचंड मोठे सुळके दिसले...सूर्य अजून आभाळात रेंगाळत होता.. प्रकाशकिरणे घाईघाईने पाण्यात फेकत होता..त्यांना झेलत लाटा चमचमत होत्या...तिथे फिरून खडकावर बसून राहिलो...याचे नाव 'Neist point..' पृथ्वेश त्याची भटकंती झाल्यावर तेथे आला...मुलांचे बरे असते, एकट्यालाही सहज भटकंती करता येते !

ज्या Lochness या ठिकाणाहून आमचा प्रवास सुरू झाला होता, तेथून



नीस्ट पॉइंट

जाताना वाटेत Localsh आहे व तेथे एक ब्रिज आहे. त्या ब्रिजच्या एका बाजूला हायलँड्स आहे व ब्रिज क्रॉस केल्यावर दुसऱ्या बाजूला ile of sky. आमचा प्रवास दुसऱ्या बाजूने सुरू झाला.

आता जाम भूक लागली होती. तोच गाव लागले 'Kyle'. तेथे चक्क Indian food अशी पाटी दिसली! मग काय आत गेलो.. नान, व्हेजिटेबल करी, राईस, डाल मागवले. जेवण तर चांगले झालेच, शिवाय ते रेस्टॉरंट चालवणारे व तेथले वेटर्स हिंदीत बोलत होते, त्यामुळे अजून चांगले वाटले..

रात्री एक वाजेपर्यंत Lochnessला पोचलो. पांघरूण ओढताच झोपेने आमचा कबजा कधी घेतला, कळले नाही..

दुसऱ्या दिवशी आरामात उठलो. हे आमचे रहायचे ठिकाण लेकला लागूनच होते. पडदा सरकवला की खाली लेक! ब्रेकफास्ट करून साडेदहाला आम्ही रूमची चावी परत केली. लेकच्या काठाने निवांत फिरलो. तासाभरात गाडी निघाली... इथून सुरू झाला आमचा परतीचा प्रवास. आलो त्यापेक्षा वेगळ्या रस्त्याने- शॉर्टकटने आम्ही जाणार होतो. यात ग्लासगो लागणार नव्हते. तरी वाटेत दोन-तीन ठिकाणी थांबलोच.

...एक अत्यंत शांत रमणीय तळ्याचा किनारा होता. तिथे एक जोडपे गाडीतून बोट घेऊन आले, बोटींग करायला! या जागेचे नाव होते 'Fort--Augustus'. ही जागा नितांत सुंदर होती.. पुढे-मागे सूचीपर्णी वृक्षांचे दाट जंगल... त्यातून जाणारी निमुळती पाऊलवाट. ती कोण जाणे कुठे पोचवीत असावी! ..कुठली निळाई तिला साद घालत असावी?

...असेच वाटेत थोडे थांबत एडिंगबर्ग एअरपोर्टला पोचलो. संध्याकाळचे साधारण सहा वाजले असतील. रात्री नऊ वाजता फ्लाईट होती...एअरपोर्टच्या आत गेल्यावर एक बॅग चेकइन करून विंडो शॉपींग करत वेळ काढला. भूक लागली होती.. सगळीकडे नॉनव्हेज सँडविचेस दिसत होती. प्रयासाने व्हेज सँडविच मिळाले...कधी एकदा मस्त झुणका-भाकर आणि लसणीचा ठेचा खाणार असे झाले!... एअरलाईनचा स्टाफ आला...गौरीला फोन लागतो आहे का ते पाहिले...आज तिची डॉक्टरांची अपॉईंटमेंट झाली होती..तिची गोड बातमी या सुंदर स्कॉटलंडच्या ट्रीपला 'डेझर्ट आफ्टर डिनरचा'आनंद देऊन गेली

पंधरा मिनिटे विमान उशिरा उडाले.. हिथ्रोला साधारण पावणेअकराला पोचलो.... लगेज मिळून बाहेर सेंट्रल बसस्टेशनला येईतो साडेअकरा वाजून

गेले... इथे एअरपोर्टला लागूनच बसस्टेशन होते, त्यामुळे प्रवाशांची सोय होते..आता हिथ्रो-रेडींग एकच शेवटची बस होती, बारा वाजून पाच मिनिटांची..त्याने निघालो.. बसमध्ये आम्ही दोघीच.. अंधार.. आणि रस्त्यावर वाहतूक नाही...प्रथम जरा भीती वाटली.. पण या बसेस एअरपोर्टच्या सेफ्टी सिस्टीमने अ‍ॅरेंज केलेल्या असतात त्यामुळे निर्धास्त झालो... रात्री पाऊण वाजता रेडींग बसस्टेशनला पोचलो व लगेच टॅक्सी करून घरी रूमवर.



**लेखिका तिची मुलगी- मयुरीसह**

लाँग विकएंड संपला होता...दार वाजले, उघडले तो दारात व्यवस्थित, नीटनेटका पोशाख केलेला स्मार्ट तरुण उभा होता. सिंधूचा नवरा होता तो, चावी घ्यायला आलेला !....त्यांचे स्टर्लिंगमधले घर माझ्या डोळ्यांपुढून सरकून गेले!.....

तिथे मला आपल्या देशातून आलेली मुलं दिसायची. त्यांना स्वत:चे असे वाहन नसायचे. कुठे जायचे म्हणजे आपली दोन पायांची सायकल ! ...सिंधू

काय किंवा पृथ्वेश काय, ही मुले चालत ऑफीसला निघायची...जाता-येताना नदीच्या पात्रात राजहंसाच्या जोड्या पोहताना त्यांना दिसतच असणार, पण यांचे जोडीदार मात्र यांच्यापासून खूप दूर ....म्हणून मग ऑफीसमधून खोलीवर परतल्यावर आपापल्या राजहंसाला स्काईपचा चारा खाऊ घालण्यात ते दंग असत.

..काळ कसा बदलत जातो पाहा ! खाली नंदा राहायची. पस्तिशीला आली असावी. अजून लग्न झाले नव्हते. तिची आई चिंतेत दिसायची..मला माझे आजी-आजोबा आठवतात. आजी सांगायची, ती चौदा-पंधरा वर्षांची असतानाच कधीतरी तिचे लग्न झाले.. अंतर्पाट दूर झाल्यावरच प्रथम दोघांनी एकमेकांना पाहिले!...काळाचा बदलत गेलेला केवढा मोठा विस्तीर्ण पट आमची पिढी पाहते आहे!...अशीच एकदा राजलक्ष्मी काही कामाचे पेपर घेण्याकरिता ऑफीसमधून परस्पर आली होती...संध्याकाळी काहीतरी खायचे केले होते, तेच तिला दिले होते... भुकेजलेलीच होती ती...खाऊन झाल्यावर एकदम रडायलाच लागली... मी विचारले,''काय गं, आईची आठवण आली का?''...तशी म्हणाली, ''आईने माझ्याशी बोलणे टाकले आहे. माझे अजून लग्न झाले नाही ना!..मी आता चाळीशीला आले, कोण माझ्याशी लग्न करणार?''...काय बोलावे मला काही सुचेना. तिन्हीसांज झाली होती..घराघरात दिवे लागलेले दिसत होते...येते म्हणून पोर निघून गेली. माझ्या भरलेल्या डोळ्यांत मला प्रत्येक दिव्याच्या अनेक प्रतिकृती दिसत राहिल्या.

आता या परक्या देशातल्या वास्तव्याचे थोडेच दिवस शिल्लक राहिले होते...वेगळे अनुभव, वेगळा निसर्ग, वेगळे प्रश्न...एकेक गाठोड्यात बांधून ठेवत होते...

पुण्यातील कोथरुडचा महेश, त्याची बायको व त्यांचा पाच वर्षांचा मुलगा यांची ओळख झाली होती..निघण्यापूर्वी त्यांनी आम्हाला एका संध्याकाळी घरी जेवायला बोलावले.. जेवणे झाल्यावर गप्पाटप्पा चालल्या होत्या...मयूरीला काही म्हणायचा आग्रह झाला. ती म्हणू लागली,

'आतां विश्वात्मके देंवें, येणे वाग्यज्ञें तोषावें,
तोषोनी मज द्यावें पसायदान हें
जे खळांची व्यंकटी सांडो
तयां सत्कर्मी रती वाढो

भूतां परस्परें जडो मैत्र जीवांचें.'

..

..एक अगम्य असीम शांतता पसरून राहिली.

....जगातल्या सर्वांत जास्त बिझी 'हिथ्रो' विमानतळावरून एअरइंडियाचे विमान उडाले मुंबईच्या दिशेने...

***

# पुन्हा लंडन...

इंग्लंडमध्ये वास्तव्य होतं, तेव्हा एका विकएंडला लंडनला येणं झालं होतं. लंडन शहर तसं बघून झालं होतं. तरी वाटलं होतं की, आपण अजून एकदा रेडींगपासून सहज येऊ... पण ते काही जमलं नव्हतं ... आयुष्यात संधीची दारं उघडमीट होत असतात. जेव्हा ती उघडतात, तेव्हा पटकन त्यातून आत शिरायचं असतं! वयाच्या या टप्प्यावर पश्चिम युरोपमधील उर्वरित देश बघावेत असा प्रस्ताव मुलांनी मांडला आणि आम्ही तो लगोलग उचलून धरला!.....आणि 'वीणा वर्ल्ड'या नामांकित ट्रॅव्हल कंपनीतर्फे जायचं, हेही निश्चित झालं.

यू. के. व्हिसा, शेंजेन व्हिसाचे सोपस्कार पार पडले आणि निघायचा दिवस उजाडलादेखील...१९ एप्रिल २०१६... चकाचक मुंबई एअरपोर्टचे दर्शन डोळे दीपवणारे होते. इंटरनॅशनल स्टँडर्डला लाजवेल असे त्याचे रूप पाहून अभिमान वाटला. खरंच आपल्या लोकांकडे काय नाहीय ? बुध्दिमत्ता आहे, कला आहे, वास्तुशास्त्राचा अभ्यास आहे....एअरपोर्टवर बाहेर थोडा वेळ काढला आणि टर्मिनल २मधून आत गेलो. बोईंग जम्बो जेटचे ७४७ ई तिकीट हातात होते. वीणा वर्ल्डचा टूर मॅनेजर आत दिसत होता. सकाळी ६.२५ ला डिपार्चर होते. विमानात बसलो.

खिडकीतून खाली नजर टाकताना विचार आला की, पृथ्वीच्या पृष्ठभागावरील फक्त २ टक्के भागच युरोप व्यापतो, पण इतिहासातील कला-परंपरा जतन करून तो किती पर्वांचा साक्षीदार झालाय. मानवी संस्कृतीच्या इतिहासातील खुणा

मिरवणारा, जगाच्या इतिहासाला आकार देणारा हा लहान खंड इतक्या थोड्या दिवसात कसा नजरेत भरून ठेवणार ? काय काय वेचणार ?

प्रवास आताच तर कुठे सुरू झाला होता...युरोप त्याच्या दर्शनाने काही देणार होता काय देणार हे तर मला अजून माहितीही नव्हते. विंदा करंदीकरांची कविता आठवली...देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे / घेणाऱ्याने घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे !... भारत देशात परतताना मी तेथील काय घेऊन येणार होते ?

चार तासांनी विमान वाटेत कुवैतला लँड झाले. या रखरखीत भूमीकडे समुद्र धीरोदात्तपणे पाहत होता....एअरपोर्ट तसा लहानच होता. ग्रुपचा ब्रेकफास्ट वगैरे झाला. दुसऱ्या विमानाने लंडनच्या हिथ्रो विमानतळावर पोचलो. संध्याकाळी साधारण साडेपाच वाजले असतील. विमान त्याच टर्मिनल चारला लागले, जेथे मी पाच वर्षांपूर्वी आले होते ! आज ४५ जणांचा ग्रुप होता, तेव्हा एकटीच होते. त्याच WH Smith दुकानासमोर बसले ! ...आता माणसं नवीन होती....तशी तर प्रवास थांब्यावरची माणसं सारखी बदलतच असतात ! पाच वर्षांनी माझ्याही वयाचा थांबा बदललाय. पुलाखालून पाणी वाहून गेलंय...वाहत चाललंय.

हिथ्रो विमानतळाविषयी अपेक्षा करणाऱ्यांना तो यथातथाच वाटला ! कारण डोळ्यांचं पारणं फेडणारा मुंबईचा नवीन एअरपोर्ट डोळ्यांसमोर होता ! पण हिथ्रो हा जगातील जुन्यात जुन्या एअरपोर्टपैकी एक, त्या काळी बांधलेला. वाटले, स्पर्धा क्षमता वाढवते. नावीन्य भुरळ घालते !...काहीशा संदिग्ध भारावलेल्या मन:स्थितीत गेटच्या बाहेर येऊन रस्ता ओलांडला व बसने पंधरा मिनिटांत एअरपोर्ट जवळच्या 'Holiday Inn Heathrow' या हॉटेलवर पोचलो. रात्री छान झोप लागली.

......

...ब्रेकफास्ट करून बरोबर आठ वाजता बसमध्ये बसलो...पिवळा टी शर्ट घातलेला, उमदा, प्रसन्न चेहऱ्याचा आमचा टूर मॅनेजर 'चेतन सुर्वे', 'या काका, या काकू' म्हणत आधीच उभा होता..बस सुरू झाल्यावर प्रथम 'गणपती बाप्पा मोरया' म्हणून त्याने शुभारंभ केला. तेवढं म्हणूनच थांबला नाही, तर 'उंदीरमामाकी जय, चिचुंद्रीमामीकी जय' हेही म्हणायला विसरला नाही. हा पोरगा लहान-थोर, नाना स्वभावाच्या माणसांना बरोबर सांभाळून घेणार, हे लगेच उमगले....आणि सांगते या मुलाने थोड्याच दिवसांत सगळ्यांची मने जिंकली आणि तीही शिस्त

लावत !

एअरपोर्टजवळ असलेल्या आमच्या हॉटेलपासून बस सिटीत चालली होती... लंडन हे पहिल्या दहा महागड्या सिटीत येतं. येथे राहणारे लोक एंगेल्स जमातीचे. ही जमात मूळची जर्मनीची. एंगेल्सवरून 'इंग्लंड' हे नांव पडलं... इंग्लिश ही इंग्लंड आणि चर्च ऑफ इंग्लंड म्हणजे पोप या दोघांची भाषा. जाताना ग्लॅस्को या प्रसिध्द औषध कंपनीची फॅक्टरी लागली. इंग्लंड ही जगातील पाचव्या क्रमांकाची इकॉनॉमिक पॉवर आहे. पहिल्या क्रमांकावर जर्मनी जाते. बोईंग विमाने, फोर्ड मोटार बनवण्याचे कारखाने इथलेच. लाल रंगाचे टेलिफोन बुथ ही इथली खासियत होती. आता जमाना आलाय इंटरनेटच्या वायफायचा. नंतर दोन दिवसांनी येथे मॅरेथॉन शर्यत होती, त्यामुळे त्याची तयारी चालली होती... आम्ही वेळेतच लंडनला पोचलो म्हणायचो, नाहीतर भलत्याच ट्रॅफीक जाममध्ये अडकलो असतो.

बस थांबली व तेथून चालत जवळच असलेले 'टॉवर ऑफ लंडन' हे म्युझियम बघायला गेलो. प्रत्येक ठिकाणी लागणारी तिकिटे चेतनने आधीच काढलेली असत व तो व्यवस्थित सूचना देई... कोहिनूर हिरा असलेले दालन पाहिले. बाहेर आल्यावर टॉवर ब्रिज दिमाखात झळकत होता. त्यानंतर गेलो राणीचे निवासस्थान असलेले 'बकिंगहॅम पॅलेस' पहायला. आज तर राणीसाहेबांचा नव्वदावा वाढदिवस होता ! जगभरातून पर्यटक 'चेंजिंग द गार्ड सेरेमनी' पहायला येतात व ती वेळ साधतात. परंतु आज कळले नाही, वाढदिवसाच्या काही योजना असतील... बसमधून पिकॅडली सर्कस, वेस्टमिस्टर ॲबे, बिग बेन, ट्रॅफलगार स्क्वेअर, हाऊस ऑफ पार्लमेंट, हाईड पार्क यांचं दर्शन झालं. लंडन शहराच्या गजबजत्या मुख्य रस्त्यांवरून बस फिरत होती, त्यामुळे मोठी झलक पाहायला मिळाली.

लंडन आयमधून शहराचे दर्शन घडले. आता लंडन आयसारखे निरीक्षण चक्र अमेरिकेतील लासव्हेगास, सिंगापूर व चायनानेही बनवले आहे. एकापेक्षा एक वरचढ होत !... मागच्या वेळेस राहिलेले 'मादाम तुसा वॅक्स म्युझियम' या वेळेस पाहिले गेले. ते बंद व्हायच्या आत आम्ही वेळेवर पोचलो. आमचा ग्रुप घोळका करून उभा राहिला. तेथे एक षोडशवयीन नवतरुणी उभी होती. तिला ग्रुपमधील माणसे मोजायची होती. माणसे सारखी पुढे-मागे होत सरकत होती. आणि मोजताना तिचा नंबर सारखा बदलत होता ! लोकांच्या लक्षात आले नाही

की, एक लाईन केली तर तिला मोजणे सोपे जाईल....तिचे अवखळ सौंदर्य, पुन्हा पुन्हा होणारा गोंधळ आणि निरागसपणा यांचीच सर्वांवर मोहिनी पडली. तेथून लिफ्टमध्ये जाताना ती जास्तच माणसांनी भरली. ते पाहून आता पुरे, असे भाव करत सांगत हसत सुटली... तोपर्यंत लिफ्ट सुटलीसुध्दा ! तिचे हावभाव,हातवारे यांत इतकी सहजता, निर्लेपता होती की लाजवाब.

मादाम तुसादचा जन्म १७६१मध्ये फ्रान्समध्ये झाला. तिची आई स्वित्झर्लंड येथे राहणाऱ्या Dr. Phillipe Curtius यांच्याकडे घरकाम करी. ते वॅक्सच्या कलाकृती बनवत. त्यांच्याकडून तुसादने ही कला शिकून घेतली. प्रथम ती बनवलेल्या कलाकृती प्रदर्शनातून मांडे. पण नंतर त्या नेणे तिला जड जाऊ लागले. शेवटी लंडनमधील बेकर स्ट्रीट येथे तिने १८३५मध्ये घरीच म्युझियम उघडलं. प्रथम फ्रेंच रिव्होल्युशनमधील बळींचे त्यात पुतळे होते. त्यात अधिकाधिक भर पडत गेली.. आपल्याकडील महात्मा गांधी, इंदिरा गांधी, अमिताभ बच्चन, माधुरी दीक्षित, शाहरुख खान....इ. पुतळे आहेत. ते ओळखता येतात पण त्यात त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले आहे अशी छाप पडत नाही, त्यापेक्षा त्यांच्याकडील मर्लीन मन्रो, डायना यांचे पुतळे परिणामकारी वाटले...अशी लहान लहान दालने आहेत व तेथे वेगवेगळे मेणाचे पुतळे मांडले आहेत... त्यानंतर आपण रिक्षासारख्या पण इंजीन नसलेल्या वाहनातून आजूबाजूला, थोडे खाली-वर फिरत राहतो. फिरताना हे पुतळे त्या वेळच्या थोड्या पार्श्वभूमीसह पाहायची व्यवस्था केली आहे. उदा. शेक्सपियर बसून लिहिताना दिसतो...वगैरे.

तुसा बघून शेवटच्या दालनातून बाहेर पडताना माझी नजर भिरभिरली, ती अवखळ षोडशी कुठे दिसते का ते पहायला; पण ती दृष्टीस पडली नाही. तिची निरागसता आणि निखळ सुंदर विभ्रम आयुष्यभर तसेच राहोत, असा दुवा मी मनातल्या मनात तिला कधी दिला हे मलाच कळले नाही... प्रवासात केवळ प्रेक्षणीय स्थळेच नाही, तर माणसातल्या विलोभनीय भावांचेही सौंदर्यदर्शन घडते तर !

बाहेर आल्यावर जागेवर कोच उभा होता.... आमच्या मुक्कामाच्या जागी परतलो.

***

# फ्रान्स -पॅरीस

पहाटे पाच वाजता तयार होऊन खाली आलो, तो कोच तयार होता. हॉटेलपासून साधारण पाऊण तासात लंडनच्या 'सेंट पॅनक्रास' (St. Pancras) रेल्वेस्टेशनला पोचलो. सात वाजता लंडन टू पॅरीस युरोस्टार ट्रेन होती. त्याची तिकिटे आधीच काढली होती. टाईम मॅनेजमेंट अगदी बरोबर करून आम्हाला पॅकड् ब्रेकफास्ट बसमध्येच देण्यात आला.... सिक्युरिटी सोपस्कार होऊन पासपोर्ट वगैरे दाखवून आम्ही आमच्या प्लॅटफॉर्म नंबर नऊला जाऊन थांबलो. तेथून एस्कलेटरने युरोस्टारच्या प्लॅटफॉर्मवर आलो. लंडन ते पॅरीस हा प्रवास साधारण दोन तास वीस मिनिटांचा होता. त्यातील पाऊण-एक तास प्रवास ५०.५ कि.मी.लांब टनेलमधून होतो. इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामधे पाण्याखालून हा प्रवास होतो.ताशी ३०० कि.मी.वेगाने जाणारी ही अत्यंत जलद ट्रेन आहे. फक्त टनेलमध्ये सेफ्टीकरिता हा वेग ताशी १६० कि.मी. ठेवला जातो. गारे डू नॉर्ड ( Gare Du Nord ) या पॅरीसमधील स्टेशनला ती जोडली गेली आहे.

इतक्या प्रचंड वेगाने धावणारी ही रेल्वे, पण जणू हलक्याफुलक्या पिसासारखी धावत होती. कधी पाण्याखाली बोगद्यात शिरली अन् बाहेर आली, काही कळले नाही ! या इंजिनियरांच्या डोक्यात कुठून कशा भन्नाट कल्पना शिरतात, तेच जाणे!....मोठ्या काचेच्या खिडकीतून बाहेर दूरपर्यंत हिरवीगार माळराने दिसत होती.. त्यात पिवळीधम्म मोहरीची शेतं दिमाखात चमचमत होती. त्यांनाही 'वीणा वर्ल्ड'चा पिवळा रंग भावला तर !...अधूनमधून एखाद-दुसरी गाय चरताना दिसे, तर कुठे टुमदार झोपडी !...गावागावांना जोडणारी, देशादेशांना

सांधणारी अशी सीमांतरे बघायला मला तरी फार आवडतात.. पाहून झालेल्या स्थळाची मोहिनी अजून मनावर रेंगाळत असते आणि पुढल्या ठिकाणाबद्दल अपार उत्सुकता लागून राहिलेली असते..एकाच वेळी नीरवता आणि उचंबळ दोन्ही ! शब्दांना जोडणाऱ्या, वाक्यांना जोडणाऱ्या अनन्वयाप्रमाणे भिन्न चालीरितीच्या माणसांना जोडणारं भूमीचं अनन्वयच की हे ! निदान निसर्ग तरी तसं सूचित करीत असतो!

इंग्लंडचा निसर्गकवी 'वर्ल्डस्वर्थ' फ्रेंच स्त्रीच्या प्रेमात पडलाच ना !...असो!..

ट्रेनमध्ये बोगींना सांधणारी उघडमीट करणारी मोठी काचेची तावदाने होती...तिथल्या कॉफीशॉपमध्ये कॉफी घेण्यासाठी आम्ही गेलो. कॉफीसारखीच कॉफी, पण आज त्यात आजूबाजूच्या वातावरणाची चव उतरली होती, ती जास्त फेसाळली होती ! तेथे आम्हाला आमच्याच ग्रुपमधले झारे कुटुंबीय भेटले. सुशिक्षित पती, पत्नी, बारावीत गेलेला मुलगा आणि मोठी मुलगी. व्यवस्थित योजना करून, वेळ काढून एकमेकांसमवेत देश पाहण्यासाठी ते या सहलीला आले होते. त्यांना तर त्यांच्या वयस्कर वडिलांनाही आणायचे होते, पण त्यांच्या तब्येतीमुळे शक्य झाले नाही म्हणाले. त्यांच्या वृत्तीतल्या सालस, प्रेमळ पैलूचे असे मनोहारी दर्शन घडले!

गारे डू नॉर्ड कधी आले कळले नाही. सगळ्यांनी आपापल्या बॅगा खाली घेतल्या. जे वयस्कर होते, त्यांना न सांगता एकमेकांनी मदतीचा हात दिला. ज्येष्ठांचा आदर हा तर आपल्या संस्कृतीचा एक भाग..

आमच्याच ग्रुपमध्ये भार्गवे पतीपत्नी होते...त्यांनी त्यांचा अनुभव सांगितला. युरो स्टारमध्ये चढताना ते कसे कोण जाणे, उलट्याच दिशेने चालत गेले होते.... प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीत हे त्यांच्या बऱ्याच वेळाने लक्षात आले... शेवटी समोर दिसणाऱ्या एका बोगीत चढले... बरोबरीचे कोणी दिसेना म्हणून गोंधळलेल्या, घाबरलेल्या अवस्थेत होते... बोगीतील एका फ्रेंच महिलेच्या हे लक्षात आल्यावर तिने आपणहून विचारपूस करून त्यांना ग्रुपच्या बोगीपर्यंत आणून सोडले ! या ट्रेनमधील सर्व बोग्या एकमेकांना जोडलेल्या होत्या.....माणसाने माणसाला देशाच्या मर्यादा ओलांडून मदत करावी, याचे हे बोलके उदाहरण.

येथून पुढे आमचा LDC मर्सिडीज कोच होता. येथून पुढे हाच कोच राहणार होता. त्याचा ड्रायव्हर होता, मिस्टर इस्तवान. तो पोलिश होता. पोलंड हा युरोपमधील गरीब देश. त्याच्या राहणीवरून, रंगरूपावरून तो काही गरीब वगैरे

वाटत नव्हता... पोटापाण्याकरीता टुरिझमच्या काळात अशी मंडळी फ्रान्स, स्वित्झर्लंडसारख्या देशात येतात.

रेल्वेस्टेशनपासून कोच निघाला...पाहते तो रस्त्यावरील पुलाखाली लोकांनी संसार थाटले होते ! कचराही पडला होता. पॅरीसमध्ये घुसलेले हे रेफ्युजी होते. असे चित्र मला अपेक्षित नव्हते ! पॅरीस आणि रोममध्ये चोऱ्यामाऱ्याही खूप होतात. चोरांना शिताफीने चोऱ्या करण्याचे शिक्षणच म्हणे मिळते! आम्हाला आमच्या पर्सेस आणि पासपोर्ट काळजीपूर्वक सांभाळणे जरूर होते. अशा लोकांपासून सुटका करून घेणे, हा या देशापुढे एक प्रश्न आहे. पॅरीसमध्ये आपल्यासारख्या सायकली, स्कूटर्स दिसल्या. स्कूटर्सना रिक्षासारखी कव्हर्स होती. सायकली लावण्यासाठी फूटपाथवर व्यवस्थित स्टँड केले होते आणि लोकांनी शिस्तीत सायकली उभ्या केल्या होत्या. उंच उंच इमारती रस्ताभर एकमेकांना चिकटून उभ्या होत्या. त्यांच्या मधूनमधून उभे-आडवे रस्ते गेले होते...सगळीकडे एकजात फ्रेंच भाषेत पाट्या दिसत होत्या. हे लोक चुकूनही इंग्लिश भाषेत लिहीत नाहीत !

येथील घरे खूप लहान असतात. त्यामुळे ती कोझी आणि गरम राहतात. येथील लोकांना घर आणि ऑफीस दोन्हीकडची कामे करावी लागतात. राहणीमान चांगलं राहण्यासाठी दोन दोन नोकऱ्यासुध्दा लोक करतात....इथल्या इमारतींची रचना 'बरोक' पध्दतीची आहे. खिडक्या खूप मोठ्या व दरवाजे लहान असतात त्यामुळे टॅक्स कमी आकारला जातो. सँडस्टोनपासून बनवलेल्या इमारती ही येथील इतिहासकालीन परंपरा... फॅशनकरिता प्रसिध्द असलेली ही सिटी. रस्त्यावर फॅशनेबल कपडे घातलेल्या स्त्रिया दिसताहेत का हे पाहिलं, पण मला तरी सकाळ व दुपारच्या वेळेला अशा स्त्रिया दृष्टीस पडल्या नाहीत !

आम्हाला माहिती देण्यासाठी एक लोकल गाईड घेतली होती. तिची ओळख करून देताना चेतनने ब्युटिफूल 'लेडी ब्रिगेटा' अशी करून दिली. ती तशी प्रौढ स्त्री होती, पण तिच्या चेहऱ्यावरील सौंदर्याच्या खुणा काळ धीरे धीरे नेत असावा.

पॅरीस शहराला अडीच हजार वर्षांचा इतिहास आहे. आज पॅरीसची लोकसंख्या ४.२ मिलीयन आहे. पॅरीस म्हणजे जगावर विजय मिळवणाऱ्या सम्राट नेपोलियन बोनापार्टचे शहर... सीन नदीच्या काठावर वसलेले सुंदर शहर...Champs Elysees-शॅन इलिझे हा २ कि. मी.लांब व ७० मी. रुंद सुंदर रस्ता इथलाच.




विजयी कमान

या रस्त्याच्या एका बाजूला Place de la Concorde–प्लेस डी ला कॉन्कॉर्ड आहे, तर दुसऱ्या बाजूला Grand  Petit Palais.

L' Arc De Triom ही एक नेपोलियनने बांधलेली विजयी कमान आहे. ऑस्ट्रिया, इटली व रोमवरील विजयाचे प्रतीक म्हणून. या कमानीवर फ्रान्ससाठी जीवदान दिलेल्या सरदार मेजर यांची नावे कोरलेली आहेत. आर्कच्या मध्ये एक ज्योत सतत तेवत असते. येथून बारा रस्ते फुटतात, एवढा मोठा हा चौक आहे, त्याचे नाव चार्ल्स दि गॉल.

६५0 वर्षांपूर्वीचे नोत्रदाम चर्च, १६व्या लुईला फासावर चढवले तो टुलरेज राजवाडा सीन नदीच्या परिसरात आहे.



नोत्रदाम चर्च

बसमधून फिरत असताना शानदार आयफेल टॉवरचे दर्शन होत होते, तो आम्ही त्याच्या जवळ येऊन पोचलो. पॅरीस शहराच्या मध्यवस्तीत भल्यामोठ्या चौकात –Champ the Mars येथे सीन ( Seine) नदीच्या काठी जगातले हे अद्भूत आश्चर्य पहाताना मती कुंठित होते. पॅरीसला बॉम्बस्फोट झाल्यापासून दोन ठिकाणी सिक्युरिटी चेक होईल, असे आम्हाला सांगण्यात आले. जगाचा इतिहास पालटवून टाकणारी फ्रेंच राज्यक्रांती इ.स.१७८९–१७९९मध्ये झाली. त्या स्मरणार्थ मॉन्युमेंट (स्मारक) बनवले गेले व त्याचे उद्घाटन १८८९मध्ये स्कॉटलंडचा राजा एडवर्ड दुसरा याच्या हस्ते झाले. गस्टेव आयफेल (Gustave Eiffel ) हा इंजिनियर १८३२ ते १९२३ या काळातला...त्याने या टॉवरचे डिझाईन बनवले व त्याच्यावरूनच आयफेल टॉवर हे नाव पडले. हा टॉवर ३२४ मी. उंच आहे. खाली त्याचा बेस चौरस असून प्रत्येक बाजू १२५ मी. आहे. गंजलेले लोखंड वितळवून याचे डिझाईन त्याने केले. प्रथम हा फक्त वीस वर्षांच्या मुदतीवरच ठेवला गेला, पण अखेरीस मानदंड ठरला ! सतरा लाख आयर्न प्लेट्सनी हा बांधला गेला. सुमारे ७ हजार टन लोखंड याकरिता लागले. जवळ जवळ १८८१ ते १८८८ अशी सात वर्षे टॉवर उभारणीचे काम चालू होते. प्रथम हा टॉवर कोणाला आवडला नव्हता ! म्हणून पॅरीस रेडिओ स्टेशनने प्रसारणासाठी भाड्याने घेतला. मनोरा पाडण्याचे ठरलेले असूनसुध्दा उत्पन्न जास्त येत असल्यामुळे तो पाडण्याचा बेत रद्द झाला ! एकेका कलाकृतीचेसुध्दा बघा कसे नशीब असते! ऐकावे ते नवलच ! तोच टॉवर आज जगातल्या सर्वांत जास्त भेट देणाऱ्या पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे ! जाण्याकरिता तीन लिफ्टस् लावल्या होत्या. पूर्वी त्या रोपस् होत्या. सेकंड वर्ल्ड वॉरनंतर लिफ्ट्स बांधल्या गेल्या...हिटलरच्या नजरेतून वाचलेल्या काही गोष्टींपैकी एक आयफेल टॉवर. दुसऱ्या– फ्लॉरेन्स सिटी व बर्न सिटी( स्वित्झर्लंड).

आयफेल टॉवरवर लिफ्टने आम्ही सर्वांत वरच्या मजल्यापर्यंत गेलो. वरून पॅरीस शहराचे विहंगम दृश्य दिसत होते. सीन नदी वाहताना दिसत होती...हिने इतिहासातल्या शूरवीरांच्या, सम्राटांच्या ईर्षेच्या किती कहाण्या समक्ष पाहिल्या असतील ! तीच ही नदी अजूनही वाहते आहे...आज तिचे पाणी प्रदूषित झाले आहे...आयफेलने लोखंडी पट्ट्या जोडून हा टॉवर कसा बनवला असेल, याचा विचार करण्यात विकासमधील मेकॅनिकल इंजिनियर गुंग झाला होता. आणि मी इतिहासातल्या माणसांच्या मनाचा थांग सीन नदीच्या पाण्यात पाहण्याचा फुका

प्रयत्न करीत होते... कशी घडते एखादी अजरामर कलाकृती ? माणसाला प्रेरणा कशी मिळते ?...दिङ्मूढच झाले...तिथल्या दुर्बिणीतून खाली दिसणारी सीन नदी, तिच्यावरचे पूल जरा जवळ आल्यासारखे भासत होते. पण खरं तर अशी कुठली दुर्बीण आहे का की तो जिवंत काळ आपल्यापुढे उभा करील! ...डॉक्युमेंटरीतून, सिनेमांतून प्रयत्न केलेला दिसतो. शाळकरी वयात क्लिओपात्रा सिनेमा पाहिला होता. ते आठवले. पण तेव्हा तो काही म्हणता काही कळला नव्हता आणि आता त्यातले काही आठवतही नव्हते. सिनेमाच्या माध्यमातून का होईना, त्या काळाच्या पोटात शिरून इतिहास अजमावा असे वाटून गेले.

आयफेल टॉवरवरून खाली उतरलो. सोव्हेनियर विकायला बरीच मंडळी पुढेपुढे करीत होती. इतरही पर्यटकांची गर्दी झाली होती. हिंदीत नमस्ते वगैरेही म्हणणारे लोक त्यात होते. परंतु या सर्व लोकांपासून  आपले पासपोर्ट व पर्स सांभाळण्याची खबरदारी घ्यायला आम्हाला आधीच सांगितले होते.

संध्याकाळी सीन नदीतून क्रुझ होती..हेडफोनमधून टेप केलेली कॉमेंट्री ऐकण्याची सोय होती..रिमझिमता सुखद पाऊस सुरू झाला. आणि मग डेकवर जाऊनच नदीच्या तीरांवरल्या स्मारकांचे दर्शन घेतले. नदीवर बांधलेले पूल तर इतके सुंदर होते, त्यांच्यावरील सोन्याचा मुलामा व नक्षीकाम जसेच्या तसे आजही दिसत होते. सीन नदीवर एकूण ३७ पूल आहेत, पैकी पाच फक्त चालत जाता येण्यासारखे तर दोन रेल्वेकरिता आहेत. सुंदर अलेक्झांडर ब्रिजचे सौंदर्य आजही जसेच्या तसे दिसत होते... नेपोलियनने लोकांना ज्ञानाची अनेक साधने उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर कलेला उत्तेजन दिले. फ्रेंच लोकांचे नेपोलियनबद्दलचे प्रेम आजही अबाधित आहे.

लुव्हर म्युझियमचा काही भाग बोटीतून जाताना बाहेरून दिसला. यू आकाराच्या इमारतीत हे म्युझियम आहे. सोळाव्या शतकात हा आधी राजाचा राजवाडा होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर याचे म्युझियममध्ये रूपांतर झाले. अनेक प्रसिध्द चित्रे व शिल्पे यांमुळे हा जगप्रसिध्द आहे. हे जगातले मोठे व भव्य म्युझियम असून मोनालिसाचे गूढ चित्र पाहण्याकरिता रसिक येथे गर्दी करतात...

इतिहासातल्या प्रसिध्द वास्तूंचे दर्शन बसमधून व क्रुझमधूनच झाले. कुठेही पडझड झालेली अथवा रंग उडालेला वगैरे आढळला नाही. त्या बघताना ऐतिहासिक वास्तू जतन करण्याची या लोकांची वृत्ती व इतिहासाबद्दलचा अभिमान दिसून येतो.

आम्ही एअरपोर्टजवळील ibis styles Paris Roissy CDG या हॉटेलमध्ये उतरलो होतो. आमचा मुक्काम नेहमी एअरपोर्टजवळच्या हॉटेलमध्येच असे, त्यामुळे पुढल्या देशात जाताना सिटी ट्रॅफीक वाचे आणि त्यामुळे वेळही...सकाळी ब्रेकफास्ट करून आम्ही नऊ वाजता निघालो, डिस्नेलँड बघायला. हे डिस्नेलँड स्पेस माउंटनमुळे फेमस झालेलं... हॉटेलपासून साधारण एक तासात पोचलो.. जाताना कुरणे दिसली, त्यात धष्टपुष्ट गाई चरताना दिसत होत्या ...गार हवा ..ढगाळ आकाश......मोहोरीची प्रसन्न शेते. युरोपमध्ये पावसाचा भरोसा कधीही देता येत नाही त्यामुळे बरोबर कायम छत्री किंवा रेनकोट ठेवावा लागतो... फ्रान्समध्ये मुख्यत: बार्ली, ओट्स बनतात व बाहेरही जातात. बटाटे पिकवतात.. एकवीस जूनला बरोबर इथला समर चालू होतो. शनिवारी- रविवारी रस्त्यांवर मोठ्या व्हेइकल्स चालवण्यास बंदी आहे. दिसल्या तर दंड भरावा लागतो. विकएंडला कुटुंबे आपापली कॅरॅव्हॅन घेऊन बाहेर जातात, रस्त्यावर गर्दी नको म्हणून हा नियम करण्यात आला आहे. अशी कॅरॅव्हॅन प्रत्येक फॅमिली घेऊ शकते व स्वत: ड्राइव्ह करू शकते.

...डिस्नेलँडला पोचल्यावर आम्हाला राईड आणि खाण्याची कूपन्स दिली गेली.

रोलरकोस्टरमध्ये बसायची राईड काही आम्ही घेतली नाही. बोटीत बसून जायचे व दोन्ही काठांवर वेगवेगळ्या देशांतल्या मांडलेल्या अप्रतिम बाहुल्या पार्श्वभूमीसह पाहायच्या. ही राईड करायला मजा आली, पण त्यामुळे आम्हाला आमच्या नातवंडांची आठवण तीव्रतेने करून दिली.. असातसाच वेळ काढला.. तिथल्या रस्त्यावर मिकी मिनी आणि डोनाल्डची कार्टून कॅरेक्टर्स वाजतगाजत आकर्षक रीतीने जाताना दिसली... आमच्या ग्रुपमधले बहुतेक सारे आमच्याच वयाचे होते. आणि इथे तर सारी बाळगोपाळांचीच गर्दी दिसत होती...आम्हाला यापेक्षा लुव्हर म्युझियमला का नाही नेले असे वाटत राहिले.

पाच-साडेपाचपर्यंत हॉटेलवर पोचलो. व्यवस्थित ठेवणीतले कपडे घालून, मेकअप करून आम्हाला जायचे होते, खास 'पारादी लातीन शो' बघायला, म्हणजे येथील प्रसिध्द कॅब्रे शो बघायला. हा शो नऊ-सव्वानऊला सुरू होऊन अकरा वाजता संपणार होता. असे शो म्हणे येथील कल्चरचा एक भाग आहे! फक्त फॉर्मल कपडे घालूनच आत जाता येते. प्रथम तिकीट काढावे लागते व बॅग चेक झाल्यावरच आत प्रवेश मिळतो. हवी तेवढी शँपेन, वाईन सर्व्ह करतात.

स्टार्टरसकट जेवण दिले जाते... हॉल तसा मोठा होता व अंधूक प्रकाश पसरलेला होता. ओळीने टेबले मांडली होती. आमची टेबले मागची होती. पाहते, तो आजूबाजूला भारतीय लोकांचाच भरणा जास्त दिसत होता. युरोप पर्यटन करणाऱ्यांत भारतीय मंडळी आघाडीवर होती. शाळकरी मुलांपासून म्हातारे आजी-आजोबाही बघू शकतील, असा हा डिसेंट शो होता !

सौंदर्य मग ते देहाचे का असेना, कलात्मक रीतीने पेश करण्यात काय हरकत असावी, असा त्यांचा दृष्टिकोन असावा. शो सुरू झाला. नग्न सुंदरी (टॉपलेस) म्युझिकवर डान्स करीत होत्या. त्यांच्याबरोबर तरुणही होते. त्यांचे पेहराव व हालचाली अत्यंत आकर्षक होत्या.. सर्कशीसारखा प्रकार होता तो...किळसवाणे वगैरे काही वाटले नाही. वाटले, स्त्रीदेहाचे आकर्षण ही तशी नैसर्गिक बाब असेलही, पण प्रेम आणि समर्पण त्याची जागा थोडीच घेऊ शकणार ?...शो संपेपर्यंत रात्रीचे बारा वाजले.

..रात्री रोषणाई केलेला आयफेल टॉवर अफलातून दिसतो असे ऐकले होते, म्हणून रात्री राईड घ्यायचे खरे तर ठरलेही होते. परंतु आमच्या कोचच्या ड्रायव्हरला सकाळी उठून जायचे होते, म्हणून तो येऊ शकणार नव्हता. येथे ड्रायव्हर्सना काटेकोरपणे नियम पाळावे लागतात. बस किती वाजता सुरू झाली, येथपासून सर्व रेकॉर्ड होते. इतके इतके कि.मी. प्रवास केल्यानंतर बस ड्रायव्हरला पंधरा मिनिटे ब्रेक घ्यावाच लागतो. दुसऱ्या दिवशी प्रवास असेल तर आदल्या दिवशी ठरावीक वेळेला ड्रायव्हिंग थांबवावे लागते. असे काटेकोर नियम आहेत व ते बिनचूक पाळावे लागतात... त्यामुळेच येथे अपघातांचे प्रमाण खूपच कमी आहे.

***

# बेल्जियम

पॅरीस सोडून निघालो. **'चार्ल्स द गॉल'** एअरपोर्टचा ( Charles de Gaulle Airport ) काही भाग दिसत होता.. बसच्या खिडकीतून पाहिले तर बाहेर आभाळ भरून आले होते. पॅरीसचा हात सोडून जाताना चुटपूट लागून राहिली...लुव्हर म्युझियम बघता आले नाही ! जी पाहिलीच नाहीत ती चित्रे, शिल्पे गडद आभाळामागे लुप्त झाली. डोळ्यांच्या कडेने एक थेंब खिडकीच्या काचेवर टपकला !....बसमध्ये गप्पागाण्यांना ऊत आला होता... पुढच्या प्रवासाच्या वाटेला जायला मी सामोरी होत गेले.

पॅरीसपासून बेल्जियम २८८ कि. मी. अंतरावर आहे. पोचायला साधारण साडेतीन-चार तास लागतात. ब्रसेल्स ही बेल्जियमची राजधानी. फ्रेंचमध्ये ब्रक्सेल्स ( Bruxelles ) असं म्हणतात. ही युरोपियन युनियनची कॅपिटल आहे. फ्रेंच कम्युनिटी व फ्लेमीश कम्युनिटी दोघांची राजधानी आहे. पूर्वी डच बोलणाऱ्या लोकांचे राज्य होते. सोळाव्या शतकात ज्या जागेला आग लागली होती तेथे नंतर राजवाडे उभे केलेत. अनेकांनी बेल्जियमवर अधिकार गाजवला.

बेल्जियममधून 'Yser' ( IJzer ) नदी वाहते. काही जण 'आयगर रिव्हर' असाही उच्चार करतात. बेल्जियमधील अर्धे लोक फ्रेंच भाषा बोलतात. ब्रुसेल्स सिटीत येऊन आर्किटेक्ट लोकांना काम करायला आवडते. येथील इमारती बरोक स्टाईलने बांधलेल्या आहेत. येथे घरांना नंबर दिलेले असतात व राजेशाही आहे. किंगला रिसपेक्ट दिला जातो. किंगचा वाढदिवस हा नॅशनल डे म्हणून साजरा

केला जातो. दर चार वर्षांनी इलेक्शन होतात.

ॲडॉल सॅक्स ( Adolphe Sax ) याने सॅक्सोफोनचा शोध लावला तो बेल्जियममधलाच. सायन्स, मेडीसिनमधली नोबेल प्राईजेस बेल्जियममधील लोकांना मिळाली आहेत. ५०० निरनिराळे बियरचे प्रकार इथलेच. फ्रेंच फ्राईज, वॅफल्स प्रथम इथेच बनवले गेले. युरोपियन युनियनचे मेन ऑफीस इथेच आहे. टिन टिन कार्टूनची देणगी बेल्जियमनेच दिली. अनिश कपूर या भारतीय माणसाने येथे मॉन्युमेंट बांधलंय. समुद्रमार्गे पूर्वी व्यापार चाले. आजही ते ट्रेड सेंटर आहे. मॅक्सिमिलीयनचा जन्म इथलाच. हा ऑस्ट्रियाचा राजा म्हणून सांगण्यात आला. सर्वांची काळजी घेणारा प्रेमळ राजा म्हणून तो प्रसिध्द झाला.

बेल्जियम येथील काच प्रसिध्द आहे. त्यापासून कटग्लासच्या अनेक वस्तू बनवल्या जातात. मोठमोठ्या टेपस्ट्रीजही येथे बनवल्या जातात. 'अँड्राफ बंदर' डायमंड सिटी म्हणून प्रसिध्द आहे. येथून कोळसा, चीज, फीश वगैरे दुसऱ्या देशात निर्यात होई.

'ॲटोमियम' हे एक अणूच्या रचनेसारखे बनवलेले म्युझियम आहे. १९५८मध्ये Expo 58 वर्ल्ड फेअरसाठी हे बनवले गेले. याचे डिझाईन इंजिनियर आंद्रे वॉटरकेन ( Andre Waterkeyn ) यांनी बनवले आहे. हे ३३५ फूट उंच असून मूळ अणूच्या १६५ बिलीयन पट मोठे आहे. नऊ ॲल्युमिनियम कॅपसूल्सनी बनवलेले हे गोळे एकमेकांना लिफ्टने जोडले आहेत. यामध्ये एक्झिबिशन्स



ॲटोमियम

भरवली जातात. ५९ फूट डायमीटरचे हे गोळे एकमेकांना जोडल्यामुळे एका युनिट सेलची रचना दिसते.

'ग्रँड प्लेस' हा येथील एक स्क्वेअर आहे वर्ल्ड हेरिटेज म्हणून याला मान्यता देण्यात आली आहे. येथे पूर्वी दरबार भरे. प्रदर्शने, बाजार वगैरे भरवला जायचा. १६९५मध्ये बेल्जियमवर फ्रेंच सैन्याने आक्रमण केलं व  ग्रँड प्लेस येथील इमारती जमीनदोस्त केल्या. चार वर्षातच त्या पुन्हा उभ्या केल्या.

मॅक्समिलीयन किंगचा सोन्याचा पुतळा उंच इमारतीवर दिमाखात चकाकताना दिसतो. याचे वजन दीड टन आहे. ब्लॅक कलरची सोन्याचा मुलामा दिलेली गिल्ड हाऊसेस दिसतात. आता तेथे शॉप्स आहेत. काळ्या रंगाची सर्वांत जुनी इमारत दिसते, जेथून पूर्वी ट्रेडिंग चाले.

ग्रँड प्लेसपासून चालत 'सरक्लस मॉन्युमेंट'ला जाता येते. ही एक मेटलची झोपलेली लेडी आहे. जिला हात लावला असता इच्छा पुरी होते म्हणे. लेडीचा कलर आता बदलत चालला आहे.

'मॅनेकन स्टॅच्यू ऑफ लिटल बॉय' पाहिला. याची कथा अशी सांगतात की, जुन्या शहरात एका मेयरचा मुलगा हरवला.ज्याला सापडेल त्याला इनाम दिले जाईल, असे त्याने जाहीर केले. तो एके ठिकाणी शू शू करताना सापडला. तेथे हा स्टॅच्यू बनवला गेला. काहींच्या मते फ्रेंच आर्मी हल्ला करायच्या, बंबार्डींगमुळे आग लागायची. एकदा त्या आगीवर बरेच लोक पाणी टाकत होते, तेव्हा एक मुलगा शू शू करत होता... इव्हेंटनुसार हा स्टॅच्यू कपडे बदलत राहतो. याला ३००० पेक्षा जास्त ड्रेसेस मिळाले आहेत. मॅनेकीनस पिस ( Manneken Pis Statue ) स्टॅच्यू तीन वेळा चोरीला गेला व नवीन पुतळा बनवण्यात आला, असं सांगण्यात आलं.

बेल्जियमची चॉकलेट्स प्रसिध्द आहेत. ती वितळत नाहीत. मॅनेकन स्टॅच्यू पाहून झाल्यावर त्याच्या जवळच असणाऱ्या दुकानातून आम्हाला चॉकलेट्स घ्यायला सांगितली. 'वीणा वर्ल्ड'करिता त्यांनी खास कन्सेशन ऑफर देऊ केली होती. चॉकलेटची चव तर घेतलीच, शिवाय चॉकलेट आइसक्रीम  खाऊन तो दिवस चॉकलेटी गोड झाला.

'अँटवर्प सिटी' ही ब्रुसेल्सनंतरची मुख्य फायनान्शियल सिटी आहे. बेल्जियममधील नदी River Scheldtवरील ही पोर्ट सिटी आहे. मुख्यत: फॅशनकरिता प्रसिध्द आहे.. येथील डायमंड एरिया प्रसिध्द आहे. बसमधून जाताजाता आमच्या टूर मॅनेजरने ही माहिती दिली.

***

# नेदरलँड

तुम्हाला रोजचे खाऊन कंटाळा आला असेल, तर आज वेगळे खाऊ या का, असे आमच्या टूर मॅनेजरने विचारले. त्याला सगळ्यांनीच होकार दिला. आमची बस मॅकडोनाल्डपाशी थांबली. मॅकडोनाल्डचा शोध नेदरलँड येथेच लागला नंतर अमेरिकेने त्याचे मार्केटिंग केले. मॅकडोनाल्ड दिसल्यावर नेदरलँडची हद्द सुरू होते. ‘रोटरडॅम’ (Rotterdom) हे साउथ नेदरलँडमधील मोठे पोर्ट आहे. नेदरलँडची शान विंडमिल्समुळे आहे. येथे खूप सायकलस्वार दिसतात. नेदरलँडची राजधानी ॲमस्टरडॅम. हे युनेस्को वर्ल्ड हेरिटेज लिस्टमध्ये येते. कालव्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. हे शहर बघायला कॅनॉल क्रुझ करावी लागते. तीन प्रमुख गोलाकार कालवे व त्यांना जोडणारे उपकालवे बांधून जाळे झाले आहे. 'God made the world but the Dutch made the Netherlands.' असं म्हटलं जातं. 'Amstel' नदीवरून ॲमस्टरडॅम हे नाव पडले. ‘न्यूडैक’,‘झिडैक’ अशी शहरातील विविध भागांची नावे ‘डैक’ वरून पडली आहेत. ॲमस्टेल आणि ऱ्हाईन या नेदरलँडमधील मोठ्या नद्या. ॲमस्टरडॅम आणि रोटरडॅम ही शहरे नेदरलँडमधील मोठी व्यापार केंद्रे आहेत.

या देशात जोरात वारा वाहतो. त्याचा उपयोग करून पवनचक्क्या उभ्या केल्या गेल्या. आता आधुनिक पध्दतीने विजेवर चालणाऱ्या विंडमिल्स दिसतात. नेदरलँड याचा अर्थ लो कंट्री ( समुद्रसपाटीपासून खोल असलेली जमीन ) असा होतो. या देशाचा काही भाग समुद्रात भर घालून करण्यात आला आहे. नेदरलँडला

‘हॉलंड’ असेही म्हटले जाते. ‘स्किफोल’ विमानतळ ॲमस्टरडॅमपासून १५ कि.मी. अंतरावर आहे. ट्युलीपच्या फुलांसाठी नेदरलँड प्रसिध्द आहे. साधारणत: २४ मार्च ते १६ मेपर्यंत हा फुलांचा मौसम असतो. आम्ही हीच पर्वणी साधून आलो होतो. हे जगातले सर्वात मोठे ट्युलीप गार्डन सुमारे ३२ हेक्टरांत पसरलेले आहे. ॲमस्टरडॅमजवळील ‘लिसे’ या शहरात हे ‘कुकेनहॉफ ट्युलीप गार्डन’ आहे. वेगवेगळ्या रंगांची जवळपास ७० लाख ट्युलीपची फुले बघायला मिळतात.

ही फुले बघताना अक्षरश: डोळ्यांचे पारणे फिटते. नाना रंगांच्या नाना छटा उधळीत ही फुले निसर्गसौंदर्याचा चमत्कार घडवतात. अत्यंत सुबक आणि नीटस पध्दतीने ती लावली आहेत. त्यातून कलात्मकतेचे लाजवाब दर्शन घडते. अत्यंत ताजी प्रफुल्लित हवा होती. बागेतून फिरत जात असताना दोन्ही बाजूला हिरव्यागार झाडीतून वरून नदीच वाहत येते आहे असे वाटले, तर ती निळ्या रंगाची फुले होती ! कॅमेऱ्यात टिपून किती टिपणार !....इतर जातीची डॅफोडिल्स, नार्सिसी अशीही काही फुले येथे लावलेली दिसली.

विविध रंगांच्या ट्युलीपच्या फुलांच्या नजर ठरणार नाही तोपर्यंत लांबलचक रांगा. धुकट सांद्र हवा... मंतरलेला हा अनुभव कुठे कसा बांधून घेणार ?...जवळच एक विंडमिल होती. तिच्या आतून वर जायला जिना होता. वरून आजूबाजूच्या मैलोन्‌मैल पसरलेल्या बागेचे दृश्य निरखणे, हा एक स्वप्नवत अनुभव होता...

खाली उतरल्यावर जवळच सोव्हेनियर शॉप होते. लाकडी ट्युलीपच्या फुलांचे संच विक्रीला ठेवलेले दिसत होते. लाकडाचे कलात्मक बूटही दिसत होते. पूर्वी शेतात चिखलात काम करताना पायांच्या संरक्षणासाठी हे बूट वापरीत असत. आता ते शोभेची वस्तू झाले आहेत.

ट्युलीपच्या बागेतून खरं तर पाय निघत नव्हता, पण आम्हाला एक ठरावीक वेळ दिली होती, त्या वेळेत होईल तेवढे बघून घ्यायचे होते. कुठल्याही गोष्टींची निरोप घ्यायची वेळ येतेच आणि सुंदर गोष्टींची तर फार लवकर येते !...बाहेर पडलो...बस उभी होती. नंतर ग्लासबोटीतून ॲमस्टरडॅम सिटीचे दर्शन घेतले.... कॅनॉलच्या कडेने सायकल स्टँड होते व शिस्तीत सायकली उभ्या केलेल्या दिसत होत्या... कॅनॉलमधून फिरताना होलोकास्टमधे वाचलेल्या मुलीचे घर आम्हाला दाखवले. जिने तिची डायरी लिहिली होती व नंतर ती प्रसिध्द झाली. कॅनॉलमधेही म्हणे लोकांनी टाकलेल्या सायकलींचा खच होता !....आमची बस ‘कोलन’ 'Cologne' च्या दिशेने निघाली. ..

# जर्मनी-कोलन (Cologne)

D for डॉईशलँड...जर्मनीला 'डॉईशलँड' असेही म्हणतात. इथली बियर प्रसिध्द आहे. बर्लीनमधे बियर म्युझियम आहे. बर्लीन हे जर्मनीचे कॅपिटल आहे. जर्मनी म्हणजे हायर टेक्नॉलॉजीमध्ये अग्रेसर राहिलेलं एक नाव. जर्मन प्रॉडक्ट्सची गुणवत्ता चांगली असते. इथल्या सिमेंटचा दर्जा उत्तम असतो. चांगल्या गाड्या बनवण्यात यांची मक्तेदारी आहे. येथून जास्त संख्येने गाड्या स्वित्झर्लंडला रवाना होतात... कोलनमध्ये मॅन्युफॅक्चरिंग प्लँट्स आहेत.

कोलन कॅथेड्रल बांधायचे काम ६३२ वर्षे चालू होते. जितके दिवस पृथ्वी असेल, तितके दिवस कोलन कॅथेड्रल राहीलच राहील असा लोकांचा विश्वास आहे. कलोन येथील गोथीक शैलीतील हे कॅथेड्रल जर्मनीचा मानबिंदू समजतात. 'कथेड्रा' या लॅटीन शब्दाचा अर्थ 'बसण्याची जागा किंवा पीठ' किंवा 'आसन' असा होतो. ज्या मंदिरात धर्माच्या अधिकाऱ्यांचं वास्तव्य असतं, त्याला कॅथेड्रल असे म्हणतात. इ.स. ५५०पासून १२३०पर्यंत नवनवी दालने जोडत या मंदिराचे काम चालू राहिले. वर्ल्ड हेरिटेज साईट म्हणून या कॅथेड्रलला मान्यता मिळाली आहे. जर्मनीत सगळ्यांत जास्त पर्यटकांनी भेट दिलेले हे ठिकाण आहे. दोन (Spire) डोमची नजाकत अप्रतिम आहे. त्याची उंची १५७ मी. आहे. इ.स. १२४७मध्ये नव्या चर्चच्या कामाची सुरुवात झाली होती.

कॅथेड्रलमध्ये अकरा वेगवेगळ्या घंटा आहेत. २४ टन वजनाची जगातील सर्वांत मोठी घंटा सेंट पिटर (st. Petersglocke ) येथे बसवली आहे. १३व्या शतकात संत सॅक्रोफेगस ( Sacrophagus ) मरण पावल्यावर त्यांना ज्या

कॉफीनमध्ये ठेवलं, ती खूप सुंदर होती. चर्चच्या ज्या जागेवर दफन केली, ती काही काळासाठी ओपन ठेवली. सॅक्रोफॅगसमुळे ही जागा प्रसिध्द आहे.

विसावा 'वर्ल्ड युथ डे' कोलन येथे ऑगस्ट १६ ते ऑगस्ट २१ पर्यंत साजरा झाला. तेव्हा पोप बेनेडीक यांनी भेट दिली होती. पोपना बघायला लाखो लोकांनी कोलन कॅथेड्रलपाशी गर्दी केली होती.

येथे पेट्रोल खूप स्वस्त आहे, त्यामुळे स्वित्झर्लंडला जायच्या आधी गाडीचा पेट्रोल टँक पूर्ण भरून घेतात. गाड्यांचे ड्रायव्हर पोलंडमधून आलेले असतात. पोलंडमध्ये गरीब लोक जास्त आहेत. १५ दिवस काम करून ड्रायव्हर ३ दिवस घरी जातात व परत येतात.

जर्मनीमध्ये डिव्होर्सचं प्रमाण खूप जास्त आहे. मुलांमुळे स्वतःचं आयुष्य जगता येत नाही, प्रायव्हसी निघून जाते असं वाटल्यामुळे त्यांना फॅमिली लाईफमध्ये इंटरेस्ट नसतो. लिव्ह इन रिलेशनशिप्स आहेत. लोकसंख्या घटत चालली आहे. म्हणून त्यांना इतर देशातून मॅन पॉवर घ्यावी लागते. भारतातून डॉक्टर, इंजिनियर वगैरे घेतले जातात. युरोपमध्ये तरूण मंडळींना लोकसंख्या वाढवण्याच्या क्लासेसना घालतात ! भारतातील कुटुंबसंस्था ही खरोखर अतिशय चांगली आहे. बघा, इतर देशात यावर रिसर्च चालतो !

जर्मन माणूस हा अतिशय मेहनती असतो. जर्मन माणूस त्याच्याबरोबर मुलांना चालायला शिकवतो. पडलं तर त्याचं त्यांना उठायला शिकवतो, त्यामुळे ती भावनिकदृष्ट्या खंबीर बनतात. ... बसमधून जाताना आमचा टूर मॅनेजर अशी त्या त्या देशाची माहिती देत असे.

...जेवणासाठी आमची बस गणेशा हॉलजवळ थांबली. आत जाण्याकरिता अरुंद निमुळता रस्ता होता. आम्ही सारेच जण एकामागे एक रांगेत जात होतो. आत लहान लहान टेबले मांडली होती. आमच्या ग्रुपमध्ये मुंबईहून आलेले पतिपत्नी होते. बाईंनी त्यांची पर्स टेबलावर ठेवली व मिस्टरांना सांगून त्या टॉयलेटला गेल्या. आम्ही सारे तेथेच अवतीभवती टेबलांभोवती उभे होतो. मिस्टर मान वळवून जरा बघत होते. मिसेस आल्या तर त्यांची पर्स गायब ! त्यात त्यांच्या पासपोर्टसकट अन्य किमती वस्तूही होत्या. आमच्याखेरीज दुसरा कुठला ग्रुप जेवायला आलेला दिसत नव्हता. सगळ्यांनाच या गोष्टीचा चटका लागला...

युरोपमधील सर्व रेस्टॉरंट लहान असतात. कारण देशच लहान आहेत.

आमचा टूर मॅनेजर रेस्टॉरंटच्या मालकाशी आधी संपर्क साधून आमच्या जेवणासाठी व्यवस्था करी. अशा रेस्टॉरंटच्या मालकांशी त्याची चांगली ओळखही झालेली असे... पासपोर्ट गळ्यातच अडकवून ठेवा. मूल्यवान वस्तू खरे तर प्रवासात बरोबर घेऊच नका. आपापली पर्स सांभाळा...चोरांपासून सावध राहा.....अशा सूचना टूर मॅनेजर वारंवार देत होता...पण ..त्या दिवशीचे जेवण कुणालाच गोड लागले नाही.

चार घास कसेबसे सगळ्यांनी पोटात ढकलले. रेस्टॉरंटचा कसून तपास घेतला, पण कुठे म्हणून पर्स सापडली नाही ! ..सगळ्यांच्या डोळ्यांसमक्ष अजब लिलयेने चोराने तुरी देऊन पर्स लंपास केली... आता सांगायला नको, सगळ्यांनी आपापला पासपोर्ट व पर्स छातीशी घट्ट धरून ठेवली...सांगायचा मुद्दा हाच की परदेश प्रवासात पासपोर्ट सांभाळणे अत्यंत महत्त्वाचे असते...चेतन सुर्वे या आमच्या हुशार व अतिशय चांगल्या टूर मॅनेजरने धीर दिला व संपूर्ण केस अत्यंत काळजीपूर्वक हाताळली. आणि त्यांची उरलेली ट्रीपही चांगली पार पडण्याची शाश्वती दिली..

***

# जर्मनी

..जर्मनीतल्या ‘ब्लॅक फॉरेस्ट’ या घनदाट वृक्षराजीतून बस धावू लागली. वाईन आणि फरचे दाट वृक्ष ठायी ठायी नजरेत भरत होते.. या भागात पूर्वी जंगली श्वापदे असत...आता फार्मिंग डेव्हलप केलेय... टुरीझम वाढवलंय....पर्यटकांना आनंद देण्यासाठी वॉटरराफ्टींग सारख्या खेळांची सोय केलीय.. आकाशातून सूर्यकिरणही पोचत नसत इतकी दाट झाडे येथे होती म्हणून याचे नांव ‘ब्लॅक फॉरेस्ट’ असे पडले. या जंगलात ‘लेक टीसीसी’ हे सरोवर आहे... पण ब्लॅक फॉरेस्ट म्हटलं की आपल्याला आठवतो तो क्रिमचे लेअर असलेला डार्क ब्लॅक फॉरेस्ट केक ! तीही जर्मनीनेच शोध लावलेली रेसिपी आहे !

‘ब्लॅक फॉरेस्ट’ या जंगलात जी झाडं आहेत त्यांचं लाकूड उत्तम दर्जाचं तर असतंच, शिवाय तलम ( fine ) असतं. म्हणून त्यापासून भिंतीवर लावायची घड्याळे बनवण्याची जुनी परंपरा आहे. यांना ‘कुकू क्लॉक’ म्हणतात. टिटीसी या गावात डुबा येथे ही फॅक्टरी आहे. टिटीसी ( Titisee ) हे गाव जर्मनीच्या बॉर्डरवर आहे.

आम्ही पोचलो तर भुरुभुरु कापूस पिंजल्यासारखा हिमवर्षाव होऊ लागला.. थोड्याच वेळात आजूबाजूचा आसमंत पांढराशुभ्र दिसू लागला... घड्याळाच्या फॅक्टरीलगतचा भाग पायऱ्यांसकट बर्फाने भरून गेला. परंतु वर म्युझिकल डेमॉन्सट्रेशन दाखवणारे घड्याळ दिमाखात चालत होते... त्याच्यासाठी ना काळ

गोठणार होता, ना वेळ ! या घड्याळाच्या बाजूला बाहुला–बाहुलीची जोडपी गोलाकार डान्स करीत जातात व ठरावीक वेळेला म्युझिकवर टोल पडून वेळ दाखवतात. आत भिंतींवर कलाकुसर केलेली लाजवाब घड्याळे लावली होती. काही घड्याळात प्रत्येक तासाला संगीत ऐकू येई तर काही घड्याळात पक्षांची मंजूळ किलबिल !

कुकू क्लॉक घरातल्या भिंतीवर असणं, हे इथल्या समाजात स्टेटसचा भाग समजतात ! पूर्वी राजघराण्यातील लोकांना कुकू क्लॉक भेट देत असत. लुव्हर म्युझियममध्ये आपल्याला असं घड्याळ बघायला मिळतं.

..Schaffhausen ( Neuhausen ) येथील ऱ्हाईन फॉलपाशी बस थांबली...येथून स्वित्झर्लंडची हद्द सुरू होते...बोटीत बसून फॉलपर्यंत गेलो. एक मोठी शिळा आहे आणि ती वाटेत आल्यामुळे धबधब्याचे दोन प्रवाह कोसळताना दिसतात. कोसळत्या पाण्यातून एखादा वीर चढून त्या शीलेवरही जाऊ शकतो.. पाण्याचा तो थरार अनुभवणे हा एक चित्तथरारक अनुभव होता....खरं सांगू, लोक उगाच तुलना करत बसतात एका धबधब्याची दुसऱ्या धबधब्याशी !...दोन सुंदर गोष्टींची, दोन आनंदांची कशाला तुलना करत बसावी...पाण्याचे ते रूप ..तो फेसाळता प्रवाह बोट माघारी फिरू लागली तसा कॅमेऱ्यात कसा बंदिस्त करावा हा प्रश्नच पडला...निसर्गातले हे चमत्कार पाहताना मानवी देहांत उमटणारे तरंग, संवेदना, क्षुद्रत्वाची होणारी जाणीव विलक्षण अनुभव देतात... कुठली अद्‌भूत शक्ती...कुठला कार्यकारण भाव...पाण्याचा प्रचंड मोठा लोट ढकलत ...असतो. किनाऱ्याला बोट लागली तशी भानावर आले.

...खरेतर आयुष्य किती लहान आहे..त्यात असे आतून ढवळून टाकणारे अनुभव किती अल्प...पण तेच आपल्याला समृध्द बनवतात.

या लहानशा आयुष्यातले काही असेही लहान लहान आनंद. काठावर उतरलो... त्या कुंद ओल्या हवेत, परक्या देशात आपल्या भारतीय माणसाची आधुनिक टपरी होती.

..त्याने बरोबर नस ओळखून आम्हाला वडापाव खाऊ घातला !

***

# स्वित्झर्लंड

स्वित्झर्लंडमधील लुसर्नला जाताना ९० कि.मी. लांबीचा जगातील सर्वांत मोठा बोगदा लागतो. याहून मोठा बोगदा आता चीनमध्ये झालाय म्हणे..बोगद्यात 'sos' (save our soul)च्या पाट्या दिसतात. स्वित्झर्लंडला स्विस कनफेडरेशन असं पण म्हणतात. याचा एरिया ४१२८५ स्केअर कि.मी. आहे. स्वित्झर्लंडमध्ये २६ cantons (provinces) आहेत. आल्पस पर्वतांनी वेढलेल्या या प्रदेशात २७ नैसर्गिक तळी आहेत.

हिमाच्छादित पर्वतरांगा, त्यांच्या उतारावरील हिरवीगार कुरणे यांमधून स्विस (Alpine ) ट्रेन धावते. हिटलरच्या नजरेतून वाचलेली 'बर्न' (Bern ) सिटी ही या प्रदेशाची राजधानी. येथे ७५% जर्मन, २०% फ्रेंच, ४%इटालियन, व १% इतर लोक राहतात... येथील चलन स्विस फ्रँक आहे.. बार्ली आणि ओट्स यांची मुख्यत: शेती होते... 'माउंट टिटलीस' हे शिखर १० हजार ६२५ फुटांवर आहे... येथील सगळ्या बँकांना मिळून स्विस बँक असं म्हणतात..

हा देश स्वत:चा स्वत: विचार करणारा देश आहे. कारवर जेवढा मोठा नंबर असेल, तेवढी मोठी कार असते.. खूप केटल फार्म्स दिसतात. डेअरी प्रॉडक्ट्स चीज, बटर यांची रेलचेल आहे.

'एंजेलबर्ग' ( Angelburg ) ही अतिशय सुंदर सिटी याच प्रदेशातली. 'स्वाईस शॅले' म्हणजे जुन्या पध्दतीची टुमदार घरे दृष्टीस पडतात. वर्षभर हवा अतिशय थंड असते. येथे जगातल्या पहिल्या रिव्हॉलव्हिंग केबल कारमध्ये

'Rotair Titlis'मध्ये आम्ही बसलो... सर्वत्र बर्फच बर्फ पसरलेलं होतं. ही केबलकार टप्प्याटप्प्याने जाते. पहिल्या टप्प्यात आठ आठ जणांची केबिन असते. दुसऱ्या वेळेस ८० जणांची केबिन असते. जी स्वत:भोवती गिरकी घेते. पाचव्या मजल्यावर उतरल्यावर बाहेर मोकळी जागा आहे. तेथे बर्फात खेळू शकतो. स्किईंग करण्यासाठी अनेक लोक येथे येतात.

उंच उंच शिखरांवर जाताना बर्फात लपेटलेली घरं शुभ्र अंगडं-टोपडं घातलेल्या गोंडस बाळांसारखी दिसत होती....सुरूची झाडं आम्ही बर्फाच्या फुलांनी 'बहरू' सांगत लगडलेली होती... एक फक्त बर्फ आणि बर्फच फक्त पण तो ज्यावर पडेल तशी त्याची नजाकत किती वेगवेगळी सुंदरता धारण करीत होती! इतक्या उंच आम्ही गेलो, पण तेथेही या बर्फमय प्रदेशात जेवणासाठी उत्तम हॉटेलची व्यवस्था आहे... या लोकांनी टुरिझम किती डेव्हलप केलेय.... खरं तर आपल्याकडेही निसर्गसौंदर्याची काही कमी नाहीय. खूप सुधारणा व्हायला हव्या आहेत...होतील !

...लुसर्न शहराच्या सिटी सेंटरला आम्हाला नेले, ते 'लायन मॉन्युमेंट' ( Lion monument ) पहायला.

चुनखडीच्या पहाडात कोरलेले हे जखमी सिंहाचे स्मारक आहे. फ्रेंच



जखमी सिंहाचे शिल्प

रिव्होल्युशनच्या वेळी १६व्या लुईने फ्रेंच सरकारची मदत मागितली, तेव्हा त्याच्या रक्षणासाठी ते पॅरीसला गेले. तेव्हा सर्वांसमक्ष त्याला गिलोटीनवर घालून मारण्यात आले, शिवाय त्याच्याबरोबर शूर शिपायांचाही शिरच्छेद करण्यात आला. त्यांच्या स्मरणार्थ हे खंजीर खुपसलेले व अश्रू ढाळतानाचे सिंहाचे शिल्प बनवण्यात आले... यानंतर स्विस सरकारने तटस्थ भूमिका घेतली व पुढे दोन-तीन शतकात या राष्ट्राची प्रगती झाली.

..मला त्या सिंहाच्या पोटात अनेक कोटी हुतात्मे दिसायला लागले.. आपापल्या देशाकरिता, देशबांधवांकरिता प्राणार्पण करणारे. प्रवासात शिल्प पाहिले.. सरकलो पुढे... असे नसतेच मुळी ! नंतर आम्ही गेलो 'कपेलब्रुक ब्रीज' पहायला. १४ व्या शतकात बांधलेला हा एक लाकडी ब्रिज आहे.

रोमन एम्पायरच्या वेळेला याला आग लागली होती पण नंतर तो तसाच बांधण्यात आला. केवळ चालत जाता येईल असाच Reuss River वरील हा पूल लुसर्न शहरातील वैशिष्ट्यपूर्ण आहे.१७व्या शतकात बांधलेल्या या लाकडी पुलाच्या आतील बाजूला सुंदर चित्रे काढली आहेत.. शतकांचे वारे वाहिले तरी तो आजतागायत जसाच्या तसा आहे.

संध्याकाळी स्विस पारंपरिक संगीत ऐकत लेक लुसर्न डिनर क्रुझचा कार्यक्रम ठरवला होता. त्या संगीताबरोबर आमच्या ग्रुपमधले उत्साही लोक उठून नाच करू लागले.. आपलीही गाणी वगैरे म्हणून ठेका धरू लागले. कार्यक्रम स्विस लोकांचा की भारतीयांचा असा प्रश्नच पडला !

***

# 'युंगफ्राऊ' शिखर

निसर्गाने भरभरुन सौंदर्य बहाल केलेला प्रदेश म्हणजे स्वित्झर्लंड....टॉप ऑफ युरोप म्हणजेच 'युंगफ्राऊ' हे बर्निस आल्प्समधील सर्वोच्च शिखर. हे साधारण १३ हजार ६४० फुटांवर आहे... हॉटेलबाहेर पडल्यावर आजूबाजूचा परिसर न्याहाळताना दोन डोळे अपुरे वाटत होते.. टुमदार घरं दृष्टीस पडत होती. ही घरं पाईनच्या लाकडाची बनवलेली असतात.

या शिखरावर जाताना वाटेत 'Trummelbach' वॉटर फॉल बघायला मिळतात. एका वॉटरफॉलच्यावर दुसरा फॉल पायऱ्या चढून वर जाऊन बघणे हा वेगळाच अनुभव होता. एरवी डोंगराच्या आत वॉटरफॉल असू शकतो यावर कुणाचा विश्वास न बसता. असे जवळ जवळ १० वॉटरफॉल्स आहेत. डोंगराच्या आतील त्या विलक्षण पोकळीत जायला-यायला रस्ता केलेला होता, लिफ्टची सोय होती. दिवेही लावले होते..

दोन डोळे अपुरे म्हणून मी चार डोळ्यांनी बघत होते.. विस्फारून विस्फारून.. कोसळणाऱ्या पाण्याचा रौद्र आवाज... गूढ गहन परिसर.. आणि मला जाणवले माझ्या वरील डोळ्यांच्या काचा गळून पडल्या आहेत ! निसर्गाला ते आपसूक बहाल झाले, संपूर्ण शरणागती पत्करुन! डोंगराच्या आत बर्फ पडल्यामुळे पोकळी झालीय...ही अशी विस्मयकारक करामत निसर्गच करू जाणे !...

इथे चांगलं टुरिझम ठेवणाऱ्याला बक्षीस ठेवतात. इंटरलाकेन या गावाला ते सतत पाच वर्षे मिळालेय, असं आम्हाला सांगितलं.

वॉटरफॉल पाहून आम्ही रेल्वेस्टेशनवर पोचलो. ४५ मिनिटांची एक रेल्वे, नंतर ती बदलून दुसरी असा साधारण दीड–दोन तासांचा प्रवास टॉप ऑफ युरोप म्हणजेच युंगफ्राऊला घेऊन जातो... प्रथम हिरवीगार झाडे दिसतात. टुमदार घरं दृष्टीस पडतात... नंतर सुरू होतं, साम्राज्य बर्फ आणि बर्फाचंच फक्त...एकच एक फक्त पांढरा रंग कुंचल्यावर घेऊन निसर्गदेवाने केलेली करामत पाहून थक्क व्हायला होतं. पण आपण हे येथपर्यंत येऊन बघू कसे शकलो, त्या माणसाच्या बुध्दीचं फार फार कौतुक वाटतं ! ...इतक्या वरपर्यंत जायला रेल्वेची सुंदर व्यवस्था केलीय. सुरुवात कॉगव्हील ट्रेनने होते. 'Grindelwald' स्टेशनवर थांबलो व गाडी बदलली. या रेल्वेच्या मोठ्या काचेतून बघावे तेवढे बघून घ्यावे.. बोलू नये चालू नये ..नुसते ध्यानमग्न शुभ्रस्थ व्हावे !

रेल्वेने वरपर्यंत गेलो. उतरल्यावर वेलकम करायला महाराष्ट्रीयन साडीतील स्त्रीचा मोठा फोटो होता. तो बघताच अर्थातच अभिमान वाटला. इंडियन बुफे जेवणाची सोय होती. इतक्या उंचीवर जाण्यासाठी लिफ्टसेवा, हॉटेल, दुकाने ही सारी व्यवस्था पाहून आश्चर्य वाटले. टॉप ऑफ युरोप ..येथे आमचा ग्रुप फोटो काढला.

तेथेच एका मजल्यावर बर्फाची गुहा केलीय. या आईस पॅलेसमधून आपण चालत जाऊ शकतो, बर्फाच्या केलेल्या कलाकृती बघत ! ही माणसाने केलेली करामत. काही बर्फाची स्कल्पचर्स काचेसारखी दिसत होती 'Sphinx Terrace'वर उभे राहून अनेक कोनांतून अनेक दिशांना जेवढे म्हणून बघता येईल, तेवढे बर्फाचे साम्राज्य  बघून घेतले. एक हिममय धुंदी पापण्यांवर पसरून राहिली. पुन्हा ट्रेनने परतीचा प्रवास करून  खाली उतरलो. इंटरलेकन सिटीतून फिरून लुसर्नला हॉटेलवर येऊन पोचलो.


बर्फाची कलाकृती

# लिचेस्टाईन ( Liechtenstein )

लिचेस्टाईनला जाताना आम्हाला वाटेत लाँगेस्ट टनेल 'SchLund' लागला... लिचेस्टाईन हा देश जणू स्वित्झर्लंडचाच एक भाग असल्यासारखा. त्याचाच लहान भाऊ म्हणावा असा...'वडूज' ही प्रिन्सिपॅलिटी ऑफ लिचेस्टाईनची राजधानी. जगातली सर्वात लहान सिटी. पण इतकी सुंदर आहे की बस. म्हणूनच या देशाला पऱ्यांचा देश म्हणत असावेत.

या शहरातून ट्रॅम राईड घेऊन फिरणे हा एक अवर्णनीय अनुभव होता... ट्रॅममध्ये बसलो आणि कॅप्टनने आम्हाला 'गणपती बाप्पा मोरया' म्हणून चकित केले. ट्रॅममध्ये हेडफोन्स होते व त्यावरून विविध भाषांत डॉक्युमेंटरी ऐकायची सोय होती त्यात हिंदी भाषासुध्दा होती. ट्रॅम रस्त्यावरून धावत होती, ते रस्ते अगदी लहान लहान होते... छोट्याशा घरांजवळून ती जात होती.. त्या घरांपुढे लहानशा बागा होत्या, फुलांनी बहरलेल्या..सगळं अगदी स्वच्छ, सुंदर, प्रसन्न..भरीसभर त्यांना हिमाच्छादित डोंगरांची, हिरव्यागार झाडांची पार्श्वभूमी...आणि मग लगेचच उमगलं, या देशाला पऱ्यांचा देश का म्हणतात ते. या वडूज सिटीचा सेंट्रल भाग फक्त दीड कि.मी. आहे. ब्रँडेड वस्तूं, स्विस घड्याळे यांनी दुकाने भरलेली दिसतात. हा पिटुकला देश इतका शांत, रम्य आहे की बस.

येथे राजेशाही आहे. डोंगरावर किल्ला दिसतो. तेथे राजाचे वंशज राहतात.

या सुंदर देशातलं जेवणही चविष्ट होतं. आणि मुख्य म्हणजे आम्ही जेवलो ते रेस्टॉरंट एका आसामी माणसाचं होतं. मिस्टर महंता त्याचं नाव. आपल्या

भारतीय लोकांनी कुठे कुठे पाय रोवलेत बघा... लिचेस्टाईनची लोकसंख्या फक्त ३५,००० आहे व क्षेत्रफळ अवघं १६० स्क्वेअर कि.मी.च्या जवळपास. शेती आणि टुरिझम यावर हा देश मुख्यत: चालतो. स्वित्झर्लंडहून ऑस्ट्रियाला जाताना वाटेत हा स्वप्नवत देश लागतो, जेथे मुख्यत: जर्मन भाषा बोलली जाते.

***

# म्युनिच ( Munich )

लिचेस्टाईनच्या बॉर्डरला लागूनच जर्मनीची बॉर्डर लागते. लिचेस्टाईनपासून साधारण २५० कि.मी. अंतरावर म्युनिच आहे. बसने पोचायला चार-साडेचार तास लागतात. प्रसिध्द मर्सिडीज गाडी जर्मनीचीच. म्युनिचमध्ये म्युझियम आहे, जेथे सुरवातीपासूनच्या गाड्यांची मॉडेल्स ठेवली आहेत. ज्यात बसून आपल्याला फोटो काढता येतो.

म्युनिचचा मोटो आहे, 'Munchen mag dich' ज्याचा अर्थ आहे (Munich loves you ) म्युनिच सिटी रोमन काळापासून प्रसिध्द आहे. जर्मनीतील बवारिया (Bavaria ) स्टेटची ही राजधानी. बेनेडीक संत याच सिटीत रहात. monkवरून म्युनिक व पुढे म्युनिच झाले.. येथे बियर फेस्टीव्हल होतं, ते 'Oktoberfest celebration' म्हणून प्रसिध्द आहे.. रस्त्यावर बियर कॅन उडवतात, बियर पाजतात... सोळाव्या शतकात स्विस आक्रमणे थांबली, म्हणून राजघराण्यातील व्यक्तींनी सर्वांना मोफत बियर पाजली. त्याच वेळेस प्लेगची साथ आली, पण ती यावेळेस निघून गेली म्हणून म्हणे बियर सेलीब्रेशनची प्रथा पडली !


'Marienplatz square' हा इथला ऐतिहासिक प्रसिध्द चौक. मॅक्सिमिलीयन किंग हा लोकांचा आवडता राजा होता. त्याचा सोन्याचा पुतळा या चौकातील कॅथेड्रलवर बसवण्यात आला आहे. कुकू क्लॉक जे राजघराण्याला भेट देण्यात आलं होतं, ते टॉवरवर बसवलेलं आहे... याचे काटे सोन्याचे आहेत. बरोबर पाच

वाजता टोल पडतात व त्या खाली छोट्या बाहुल्यांसारखी सरदार वगैरेंची परेड गोल फिरताना दिसते. ती बघायला दुरदुरून लोक येतात व स्क्वेअरमध्ये खूप गर्दी होते. कॅथेड्रल आता पोल्युशनमुळे काळं पडत चाललंय. त्याचे पॉलिशिंग चालू असते... कॅथेड्रलसमोर खांब आहे व त्यावर खऱ्या सोन्याचा पुतळा आहे... मुख्य उत्सव या चौकात साजरे होतात.. या कॅथेड्रलच्या आत ऑफीसेस वगैरे आहेत. हे जुने कॅथेड्रल म्हणजे सिटी हॉल. याच्या पलीकडे नवा सिटी हॉल आहे.

युध्दात अनेक स्वीडीश सैनिक मारले गेले, त्यांच्या प्रीत्यर्थ येथे 'मेरीज कॉलम' हा स्तंभ उभारण्यात आलाय. त्याच चौकात सोन्यासारखा पूर्ण पोशाख केलेला एक माणूस बसलेला पुतळाच आहे असं वाटत होतं, पण तो भिकारी होता. पैसे टाकल्यावरच त्याच्याबरोबर फोटो काढता येत होता !..कशासाठी-पोटासाठी... जगाच्या पाठीवर सगळीकडे सारखंच.

अनेक युध्दे झाली.. शतकांची पाने उलटली... पुन्हा पुन्हा डागडुजी करत या लोकांनी आपल्या ऐतिहासिक वास्तूंना पूर्वीच्याच डौलात असे काही जपलेय की तोंडात बोट गेल्याखेरीज राहत नाही... वर्षानुवर्षांपूर्वीची यांची घड्याळे चालतात.. चित्रांवरचे रंग राहतात... सोन्याचे पुतळे अबाधित राहतात.. आश्चर्य तर वाटते...खरं तर उघड्या डोळ्यांनी हे सारं बघावं आणि जागृतीचे टोल आपल्या आत वाजावेत.. कृतींच्या बाहुल्या सरकत रहाव्यात.

'Hofbrauhaus' हे इथलं सर्वात जुनं बियरहाऊस. हिटलरने दुसऱ्या महायुध्दाची खलबतं केली, ते ओपेरागृह इथे दाखवलं. आम्ही आत गेलो.. म्हणजे आम्हाला आत जायला परवानगी दिली. बियर न घेताच बियर घेतानाचे लोक पाहिले ! वाद्यवृंद वाजवताना पाहिला..या साऱ्यात या लोकांचे बियरप्रेम फेसाळत होते !.......



लोखंडी सळयांचं सुंदर डिझाईन

येथे रस्त्यांवरून फिरताना लोखंडी सळ्यांचं (cast iron ) सुंदर डिझाईन करून प्रत्येक दुकानाबाहेर लटकवलेलं दिसत होतं. पूर्वीच्या काळी ठिकाणे ओळखता यावी म्हणून. म्हणजे समजा फ्लोरिस्ट असेल तर फुलांच्या चित्राचे डिझाईन बनवून बाहेरच्या बाजूला टांगत असत. अशी सुंदर सुंदर केलेली डिझाईन्स आम्हाला दिसली.

# ऑस्ट्रिया

जगातल्या पहिल्या पाच सुंदर देशांत ऑस्ट्रियाचा नंबर लागतो. 'साल्सबर्ग' ही ऑस्ट्रियामधील एक सिटी 'सॅलझॅक' (Salzach) नदीच्या किनाऱ्यावर वसलेली आहे. अठराव्या शतकातला प्रसिध्द संगीतकार मोझार्ट (Mozart) याची जन्मभूमी. त्याचे घरही येथेच आहे... 'साउंड ऑफ म्युझिक' हा प्रसिध्द सिनेमा इथेच तयार झाला... येथील लोक मुख्यत: जर्मन भाषा बोलतात.

'रिपब्लिक ऑफ ऑस्ट्रिया' १९४५मध्ये स्वतंत्र झाला व स्वत:ला स्वतंत्र देश म्हणून घेऊ लागला. या देशाचं क्षेत्रफळ साधारणत: ८४,००० स्क्वेअर कि.मी. असेल व लोकसंख्या ८२ मिलीयन. जर्मनी, इटली, पोलंड या देशांच्या सीमा याला लागून आहेत... जर्मन भाषेत 'Osterreich' असं याचं मूळ नाव.. त्यावरून ऑस्ट्रिया  हे नाव रूढ झालं. ऑस्ट्रिया हे तटस्थ राष्ट्र. व्हिएन्ना ही याची राजधानी. युरो करन्सीनेच इथला व्यवहार चालतो. जानेवारी १९९५पासून हा देश युरोपियन युनियनला जाऊन मिळाला.

येथे बर्फ खूप पडतो. त्यामुळे बर्फावरील खेळांच्या स्पर्धा होतात. टुरिझममध्ये हा देश पुढे आहे. येथील नदीच्या किनारी मिठाच्या खाणी सापडल्या तेव्हा रॉक सॉल्ट हेच मुख्य उत्पन्नाचं कारण होतं.

प्रसिध्द हॉलिवूड फिल्म ॲक्टर Arnold Schwarzenegger  याचा जन्म इथलाच. जीवशास्त्रातलं नोबेल प्राईझ मिळवणारा Konrad Lorenz  याच देशाचा. आपल्या लिखाणाने इ. स. १९२०- १९३०च्या दरम्यान जगात

प्रसिध्द पावलेला लेखक Stefan Zweigही इथलाच... केवळ भौगोलिकच नव्हे तर बौध्दिक स्तरावरही केवढी उंची गाठू शकलाय हा देश, हे पाहून आश्चर्य वाटतं.

साल्सबर्गला पोचल्यावर प्रथम आम्हाला 'मिराबेल गार्डन' दाखवलं. येथेच मिराबेल पॅलेस आहे. हा पॅलेस प्रिन्स Archbishop Wolf Dietrich Raitenau याच्याकरिता बांधला गेला होता. या पॅलेसच्या पुढेच मिराबेल बाग आहे, जी हॉर्टीकल्चरल बागेचा उत्कृष्ट नमुना आहे... मुख्य म्हणजे या बागेतच 'साउंड ऑफ म्युझिक' या सिनेमातलं बरंचस शूटींग करण्यात आलं होतं... सॅलझॅक नदीचं पात्र मंद झुळझुळ पाण्यानी वाहत होतं... या नदीच्या एका पुलावरून जाताना पुलाच्या बाजूच्या लोखंडी जाळीला खूप कुलुपे लावलेली दिसली. नवीन लग्न झालेली जोडपी येऊन ती कुलुपे लावून किल्ली पाण्यात टाकून देतात असं सांगितलं, त्यामुळे त्यांचं लग्न टिकतं म्हणे ! त्यामुळे हा पूल 'लव्ह लॉक्ड ब्रिज' म्हणून प्रसिध्द आहे. आपल्याकडे झाडाला गंडे किंवा चिंध्या बांधतात त्यातलाच हा प्रकार म्हणायचा.

'Getreide Gasse' हा जुन्या साल्सबर्गमधला बाजारी रस्ता. या रस्त्याने गेलो. येथील हाऊस G9 हे मोझार्टचं जन्मघर जेथे तो वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत राहिला. 'Linzer Gasse' हाही 'Getreide Gasse'सारखाच रोमन काळापासून प्रसिध्द रस्ता..'ResidenzQ' स्क्वेअर हा या शहरातला प्रसिध्द चौक. इथेच 'Residenz Fountain' आहे, जे संपूर्ण संगमरवराचं बनवलेलं आहे. या स्क्वेअरला लागूनच साल्सबर्ग कॅथेड्रल आहे, जे बरोक स्टाईलमध्ये बांधलेलं आहे.

इन्सबर्गला जाताना आम्ही इन नदीवरच्या पुलावरून गेलो... वाटेत वॅटन्स या गावी 'स्वारोवस्की क्रिस्टल म्युझियम' बघायला थांबलो. 'Daniel Swarovski' (डॅनिअल स्वारोवस्की) हा बोहेमियाचा कारागीर होता. त्याच्या


स्वारोवस्की म्युझियमचे प्रवेशद्वार

नावाचाच स्वारोवस्की ब्रँड तयार झाला... ६४ किलो वजनाचा मोठा क्रिस्टल येथे पाहायला मिळतो. नऊ मोठ्या रूम्स आहेत. त्यात आरसे बसवलेत. प्रकाशकिरणं परावर्तित करणारी पारदर्शक काच. तिच्यापासून बनवलेल्या कलाकृती बघून आपण अचंबित होतो... त्या झगमगत्या दुनियेतून फेरफटका कधी संपतो, ते कळतसुध्दा नाही.. म्युझियम बघून झाल्यावर तेथील शॉपमध्ये स्वारोवस्की ब्रँडचे दागिने व वस्तू विक्रीला होत्या. त्या अर्थातच खूप किमती होत्या.

इन्सबर्ग या ऑस्ट्रियामधील शहरातून फिरताना इन्स नदीची आल्प्स पर्वतांच्या पार्श्वभूमीसह विविध सुंदर रूपं पाहिली.. 'Maria Theresien Strasse' हा शहराचा जुना मध्यवर्ती भाग ..त्यामधून फिरलो...रस्त्यावर छत्र्यांखाली खुर्च्या टाकून कॉफी पीत लोक बसलेले दिसले...कॉफीच्या घोटाबरोबर मित्रांशी हितगूज करण्यातील मजा ही जगाच्या पाठीवर सगळीकडे सारखीच; मग तुमच्या त्वचेचा रंग कोणता का असेना !..

येथील प्रसिध्द ‘गोल्डन रूफ’ म्हणजेच 'Goldenes Dachi' पाहायला गेलो. हा मॅक्सिमिलीयन पॅलेस होता. मॅक्सिमिलीयन पहिला याच्या लग्नाच्या वेळी बांधलेला. त्याची पत्नी व तो या बाल्कनीतून स्क्वेअरमध्ये चाललेले समारंभ, कार्यक्रम बघू शकत असत. इ. स. १५००मध्ये याचे काम पुरे झाले.. याला २,७३८ कौले बसवली आहेत. ती आजही जशीच्या तशी सोन्यासारखी चकाकतात.

आमच्याबरोबर संगीतात डॉक्टरेट मिळवलेल्या गोडसेताई होत्या. पाश्चिमात्य संगीत हाही त्यांचा एक अभ्यासाचा विषय होता.. त्यामुळे त्यांना मोझार्टबद्दल बरीच माहिती होती. त्यामुळे त्याचा पुतळा बघण्यामध्ये, त्याची भूमी बघण्यात त्यांना विशेष रस होता.

प्रवासातला प्रत्येक दिवस सोन्यासारखा लखलखत असे...तो डोळ्यांपुढून जाऊच नये असे वाटे..

...पण घटका घटका पुढे सरकत राहतात. विश्रांतीसाठी थांबलो, हॉटेल ‘अल्पाईन पार्क इन इन्सबर्ग’ येथे.

***

# व्हेनिस

शाळेत असताना व्हेनिसला कालव्यांचं शहर म्हणतात, हे माहीत झालं होतं...आणि मज्जा वाटली होती, कसं असेल ना हे शहर ! बोटीतून शाळेला जायचं, बोटीतूनच कुणाच्या घरी जायचं, यायचं...त्याच कल्पनेतल्या व्हेनिसला आपण आता प्रत्यक्ष भेट देणार

बस धावत होती. जाताना 'वेरूनो' गाव लागले. येथे थांबलो नाही. पण हे गाव रोमिओ-ज्युलिएटमुळे प्रसिध्द झालं असं आमच्या टूर मॅनेजरने सांगितलं...बस 'पडोवा' (Padova) या बंदरापर्यंत जाईल व तेथून 'Adriatic' समुद्रातून व्हेनिस आयलँड्सला आपण पोचू.

तिरोल प्रदेशातून बस धावत होती... डोंगराळ प्रदेश .. त्याचंही एक वेगळंच सौंदर्य... ही सृष्टी ज्याने निर्माण केली, तो किती अजब कारागीर असला पाहिजे. डोंगरासारखे डोंगर, पण तेही किती प्रकारचे. पण आपल्या हिमालयाला खरोखरच तोड नाही.

इटली, Michelangelo मायकेंल ॲन्जेलोच्या नजरेतून झालीय असं मार्क ट्वेन या लेखकाने म्हटलंय. मायकेल ॲन्जेलो हा इटलीचा मूर्तिकार, चित्रकार, कवी, स्थापत्यविशारद. रेनिसान्स ( Renaissance ) कलेची चळवळ इटलीमधूनच सुरू झाली. अनेक विचारवंत, कलावंत यांची जन्मभूमी म्हणजे इटली.. लिओनार्डो द विंची इथलाच. रेडिओ ट्रान्समिशनचा शोध लावणारा Marconiही इथलाच.

जगाला ओपेराची भेट इटलीनेच दिलीय. पियानो, व्हायोलीन इटलीमध्येच तयार केली गेली.. फेरारी कार इटलीचीच.. असं म्हणतात की तुम्ही सतत २० वर्षे जरी इटलीत राहिलात, तरी ती बघून होत नाही !

पडोवापासून Vaporetto वॉटर बसने आम्ही व्हेनिस आयलंडला पोचलो... खूप गर्दी होती.. काही ठिकाणी विक्रीसाठी पथाऱ्या मांडलेल्या होत्या. इटालियन भाषेत व्हेनिसला 'व्हेनेशिया' असं म्हणतात. रोमन साम्राज्याच्या राजधानीचे हे शहर. व्हेनिस हे इटलीतील शहर ११७ लहान बेटांचं मिळून झालेलं आहे, जे पुलांनी एकमेकांना जोडलेले आहे... हॉलिवुडमधील अनेक सिनेमांतील प्रसंगांचे चित्रण येथे झालेले आहे. 'क्लिओपात्रा' या प्रसिध्द सिनेमाचं चित्रणही येथे झालं होतं... व्हेनिसला लागूनच Mestre सिटी आहे...नवव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत व्हेनिस शहर डेव्हलप होत होतं असं सांगितलं ...१७७ कालवे व ४०९ पुलांनी ही बेटं एकमेकांना जोडली गेली आहेत... 'ग्रँड कॅनॉल' एखाद्या विस्तीर्ण नदीसारखा आहे. व्हेनिस आता थोडं थोडं पाण्यात खचत चाललंय.. बरेचसे टॉवर्स एका बाजूला आत चाललेत..

व्हेनिस बघताना मी माझा चष्मा बदलून इतिहासाचं चित्र रंगवणारा चष्मा घातला, तेव्हा हे कालव्यांचं शहर कसं बनवलं असेल या कल्पनेनं अचंबित व्हायला झालं.. नेपोलियन बोनापार्टने १७९७मध्ये व्हेनिस जिंकून घेतलं होतं... येथील 'सेंट मार्क्स स्क्वेअर हे जगातील सर्वात सुंदर स्क्वेअर आहे, असं म्हटलं जातं. सेंट मार्क्स हे तत्ववेत्ते व पोप होते. व्हेनिस सतत युध्दे जिंकत आलं आहे. नेपोलियन व्हेनिसमध्ये आला आणि व्हेनिस हे त्याने ड्रॉईंगरूम बनवलं.

व्हेनिसच्या प्रसिध्द कालव्यांमधून फिरण्यासाठी आम्ही गोंडोला राईड घेतली.. इटालियन भाषेत तो कुठलेतरी गाणे म्हणतोय.. आपण गोंडोलात बसून कालव्यातून फिरतोय.. काय अर्थ असेल या गाण्याचा... भूगोलाच्या तासाला शिकलेल्या व्हेनिसपासून चालू आहे प्रवास... वल्ही मारत... चष्म्याच्या काचा ओल्या झाल्यात.. पाणी आतून उडतंय की बाहेरून आत ?... बाजूच्या इमारती खूप जुन्या झाल्या होत्या.. खचत चालल्या होत्या.. तरीही खिडक्यांतून फुलझाडे लावलेली दिसत होती... कॅनॉलमधल्या पाण्याची दुर्गंधी सुटली होती.. त्याबद्दल प्रवासी नाकावर रुमाल धरत होते.. आणि तरीही ...तरीही भूतकाळातल्या या नगरीचे चित्र रंगवताना मला हे काहीही जाणवत नव्हते! एखाद्या स्त्रीसारखी नगरीही वृध्द होते.. तिचेही अवयव ढासळतात... म्हणून काय.

या रोमन एम्पायरच्या राजधानीकरीता वेगवेगळ्या देशांतून युध्दात लुटून आणलेलं संगमरवर वापरण्यात आलेले होतं. येथे पंख असलेल्या सिंहाच्या मूर्ती पाहिल्या..अधिक शक्ती (power) यावी म्हणून करण्यात आलेलं ते एक प्रतीक आहे.. ५०० वर्षांपूर्वी बनवलेले सोन्याचे घड्याळ येथे बसवण्यात आलेय. सेंट मार्क्स यांचे निधन 'Alexander provience' मध्ये झाले होते. त्यांच्या अस्थी तेथे ठेवलेल्या आहेत.

इटलीचे नाव महत्त्वाच्या रोमन संस्कृतीशी जोडलेले आहे. जवळजवळ ३०१,३३८ स्क्वेअर.कि.मी. क्षेत्रफळ व साठ मिलीयन लोकसंख्या असेल. मुख्य: इटालियन भाषा बोलली जाते. फॅशन, लेदरच्या वस्तू, परफ्युम्स, टुरिझम या अनेक गोष्टींकरिता इटली प्रसिध्द पावलेले आहे. तसेच स्मगलर्स, गँगवार यांच्यापासून सावध राहण्यासाठीही !

सिटी टूरमध्ये 'ब्रिज ऑफ साय' ( Bridge of Sighs ) दाखवला. पांढऱ्या लाईमस्टोनपासून इ.स.१६००मध्ये हा ब्रीज बांधला गेला आहे. त्याला खिडक्या व सळया बसवण्यात आल्या आहेत. कैदी या खिडक्यांमधून सुंदर व्हेनिस नगरीचे अखेरचे दर्शन घेताना निःश्वास सोडीत. 'डोग्ज पॅलेस' (Doge's palace ) हे डोग ऑफ व्हेनिसचे ( नगरप्रमुख ) राहण्याचे ठिकाण होते. आता म्युझियम झाले आहे. त्याचे बांधकाम 'व्हेनेशियन गोथीक' स्टाईलचे आहे. सेंट मार्क्स स्क्वेअर येथे सेंट मार्क्स बॅसिलिका हे रोमन कॅथॉलिक चर्च व बेल टॉवर आहे. त्याची उंची ९८.६ मीटर आहे. सेंट मार्क्स स्क्वेअरच्या एका कोपऱ्यात हे बेल टॉवर असून त्यात पाच घंटा बसवण्यात आल्या आहेत. चर्चचे बांधकाम रंगीत असून जवळजवळ ९०० वर्षांपूर्वी एकेक तुकडे बसवून ते सजवले आहे. टॉवरवर मोठे घड्याळ व प्रचंड घंटा आहे. या बेलने जुन्या काळी वेगवेगळे संदेश दिले जात.

पारदर्शक काचेचं व तिच्या नजाकतीचं काही वेगळच सौंदर्य असतं, ते तसं वर्णन करून नाही सांगता येत. काच वितळवून त्यापासून त्या कशा बनवतात, याचं प्रात्यक्षिक आम्हाला मोरॅनो येथील ग्लास ब्लोईंग फॅक्टरीत दाखवलं. काच वितळवून त्याचा फुगा करून अत्यंत कौशल्याने त्यापासून कलात्मक वस्तू कशा बनवतात, ते दाखवलं. ९०० वर्षांपासून म्हणे येथे या बनवल्या जातात. फॅक्टरीच्या बाहेरील दुकानात त्या बघून आपण अवाक होतो...छे! त्यांना वस्तू म्हणणं चुकीचंच. ती एकेक कलाकृती होती.

पडोवा ( Padova ) येथे आम्ही मुक्काम केला..

***

# फ्लॉरेन्स

'फ्लॉरेन्स' ही इटलीची राजधानी होती. जी रोमन एम्पायरच्या काळात सर्वांत श्रीमंत नगरी समजली जायची. फ्लॉरेन्समध्ये संपन्न लोक राहत असत. आजही ती इटलीच्या टस्कनी प्रांताची राजधानी आहे. हे शहर इटलीतील फॅशनचे व कलेचे मुख्य केंद्र समजले जाते. मायकेल अँजेलो याच्या नजरेतून फ्लॉरेन्स सिटी डिझाईन झाली ..'Piazzale Michelangelo Point' या स्क्वेअरला आम्ही पोचलो, तेव्हा पाऊस सुरू झाला होता. युरोपच्या प्रवासात रेनकोट नेहमी जवळ ठेवावाच लागतो, कारण पावसाचा काही नेम नसतो. येथेच डेव्हिडचा नग्न पुतळा आहे.. डेव्हिड या गुलामाने कलोसियममध्ये सिंहासोबत शर्यत जिंकली होती... उंचावरील या टेकडीवरून डेव्हिडचा पुतळा फ्लोरेन्स सिटीकडे पाहतोय.. माणूस जसा आहे तसा दाखवण्याचा प्रयत्न या शिल्पातून केलेला दिसतो... खाली फ्लोरेन्स सिटीचे दर्शन घडते.. जुन्या नगरीतील कॅथेड्रलचा डोम दिसतो...'Santa Maria del' या चर्चचा डोम बांधायला १२९६मध्ये सुरुवात झाली व तो १४३६मध्ये बांधून पूर्ण झाला. गोथिक स्टाईलने बांधलेला हा भव्य घुमट आहे. वेगवेगळ्या रंगांचे संगमरवर यासाठी वापरलेले आहे... इतिहासाची साक्षीदार आर्नो नदी वाहताना दिसते...नवीन चर्चचा भाग Arnolfo-di-Cambio ने बांधला होता.

तर हिटलरच्या नजरेतून वाचलेली सुंदर सिटी, म्हणजे फ्लॉरेन्स.एका बाजूने डोंगरांनी वेढली गेलीय व दुसऱ्या बाजूने नदीच्या सुंदर वळणाने.

**पिसा**

पिसा गाव व्यापाराकरिता प्रसिध्द होतं... तेव्हा जिनोव्हा स्टेट वेगळे प्रॉव्हिन्स होते. पिसा व जिनोव्हामध्ये १२८४मध्ये युध्द झाले, त्यात जिनोव्हा जिंकले व पिसा पडले. या पराजयातून पिसा कधीच सावरले नाही. एकच गोष्ट म्हणजे पिसाचा कलता मनोरा, ज्यामुळे पिसानो हे गाव प्रसिध्द झाले.. मनोरा कुणी बांधला, याबाबत निश्चित माहिती नाही... तीन टप्प्यांमध्ये जवळजवळ १९९ वर्षे मनोऱ्याचे काम चालू होते. तळमजल्याचे काम Bonanno Pisano (बोनानो पिसानो) याने ११७३मध्ये सुरू केले. त्याने ग्राउंड फ्लोअरकरिता पांढरा संगमरवर वापरला. जवळजवळ तिसरा मजला बांधताना तो तिरका झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर तो जवळजवळ ९९ वर्षे बंद होता. १२७२मध्ये Giovannidi Simone (गिवानी दी सामॉन) याने बांधकामास पुन्हा सुरूवात केली. टोमासो पिसानो (Tommaso Pisano) याने १३५० ते १३७२ या काळात वरचे मजले बांधून टॉवरचे काम पूर्ण केले. त्याने 'Romanesque style' चा वापर केला.. सातवा मजला १३१९मध्ये पूर्ण झाला. १३७२मध्ये बांधून झाल्यावर ठरले की, मनोरा जसा आहे तसाच ठेवावा  लागेल. १३७२मध्ये बेल बसवण्यात आली.. मनोऱ्याची उंची ५५.८६ मीटर एवढी आहे. मनोऱ्याच्या बांधकामाकरिता करारा (Carrara) मार्बल वापरण्यात आले. १४५०० टन मार्बल याकरिता वापरण्यात आले आहे. आत २९४ पायऱ्या आहेत. या बेल टॉवरमध्ये ७ बेल्स बसवलेल्या आहेत.

Benito Mussolini (मुसोलिनी) याने पिसाच्या मनोऱ्याला  सुस्थिर करण्याचा प्रयत्न केला. पायाजवळ भोके पाडून त्यात सिमेंट भरले... दुसऱ्या महायुध्दात अमेरिकन सैन्याने टेहेळणीकरिता मनोऱ्याचा वापर केला...बाराव्या शतकापासून आजतागायत मनोरा उभा आहे. प्रसिध्द शास्त्रज्ञ गॅलिलिओ हाच पिसाचा मनोरा चढून गेला होता आणि त्याने पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला.

सात आश्चर्यांपैकी एक अद्‌भुत आश्चर्य, म्हणजे पिसाचा कलता मनोरा. एकेका वास्तूचेसुध्दा नशीब असावे ना ! राहिलेले मजले बांधून मनोऱ्याचे काम पुरे केले, पण तो तसाच कलता राहिला आणि जगातले एक आश्चर्य बनला ! मनोऱ्याजवळच 'स्क्वे अर ऑफ मिरॅकल्स' आहे.. बाजूला चर्च आहे.. बॅपटिस्ट्री

आहे..

बसमधून उतरून थोडेच चालत गेल्यावर पिसाचा मनोरा पाहिला आणि अक्षरश: दिङ्मूढ झाले. कालच बांधकाम पुरे झाल्यासारखा तो नावीन्यशाली दिसत होता... वाटले, कुठल्याही कलाकाराने सौंदर्याने, भव्यतेने विनयशील असावे, हेच तर तो झुकून सांगत नाहीये का !....किती वेळा मनोऱ्याभोवती फेऱ्या घातल्या....क्षण अन् क्षण मोलाचा होता, मनोऱ्याचा कण अन् कण नजरेत साठवून ठेवण्याकरिता...दिपून गेले डोळे ! आभाळाच्या पार्श्वभूमीवर ठळकपणे माणसाच्या कौशल्याची, कलाकृतीच्या अमरत्वाची, ग्वाही देत हा उभा आहे...

..आजूबाजूचा परिसरही स्वच्छ, सुंदर होता..जमिनीवर हिरवेगार गालिचे पसरलेले होते..बाजूचं चर्च आज बंद होतं .

बाहेर आल्यानंतर अनेक दुकाने मांडलेली होती... ती विशेषत: बांगलादेशीय लोकांची होती... तसे खरेदी काहीच करायचे नव्हते. फ्रीजवर लावायचे पिसाच्या मनोऱ्याचे मॅग्नेट घेतले... आठवणी ठेवून ठेवून कशा ठेवणार? कायकाय नि कशात बांधून घेणार ?

रोम सिटीच्या जवळचं डोंगरांमध्ये वसलेले गाव ‘पेरूजिया’ येथे हॉल्ट केला, 'Arte' ‘अर्ते’ हॉटेलमध्ये.

***

# इटली-रोम

रोमचे हवामान अगदी आपल्यासारखे आहे. म्हणजे उष्ण हवामान असल्यामुळे विशेष गरम कपडे घालावे लागत नाहीत.

बसमधून जाताना आम्हाला माहिती देण्यासाठी एक लोकल गाईड केली होती. ती आम्हाला रोमचा इतिहास आणि इतर माहिती देत होती. परंतु तिचे इटालियन इंग्लिश फारच लक्षपूर्वक ऐकावे लागत होते !

रोमचा उच्चार ती 'रोम्हा' असा काहीसा करी...२५०० वर्षांच्या आधीपासूनचा इतिहास पाहिलेली 'टायबर' 'Tiber river' वाहताना दिसत होती...रोमन फोरम (Roman Forum) ही सर्वात जुनी बाजारपेठ, सर्कस मॅक्सिमस (Circus Maximus) हे जुने स्टेडियम जे आता पब्लिक पार्क आहे. Piazza Venezia इ. इतिहासातील वास्तू पाहताना रोमन काळाचा इतिहास या शहराने जपला आहे हे जाणवते.. आम्हाला बसने 'कोलोसियम'जवळ सोडले व फिरून यायला एक वेळ ठरवून दिली.. कोलोसियम चित्रात वगैरे पाहिलेले होते पण प्रत्यक्ष पाहताना त्याचा अफाट अजस्त्रपणा डोळ्यांना पार फरफटत नेतो !...त्याचा इतिहास तर अंगावर काटे आणतो. कोलोसियम (Colosseum) हे एक जगातले आश्चर्यच आहे... रोमन एम्पायरमधील लोकांना शौक होता की कैद्यांना शिक्षा म्हणून हिंस्त्र प्राण्याबरोबर युध्द लावायचे. प्राणी त्यांचे तुकडे तुकडे करीत.. खाऊन टाकीत.. रक्तांचे पाट वाहत.. आणि हे क्रौर्य बघायला 'Falvian Amphitheater'

बांधले गेले. Flavian हे एक घराणे होते ज्यांनी त्यांच्या करमणुकीकरिता स्टेडियम बांधले ! तेच हे कोलोसियम ! 'वेस्पासियन' 'Vespasian' या रोमन राजाने इ.स. ७२मध्ये कोलोसियम बांधायला सुरुवात केली व त्याचा वंशज 'Titus' याने इ.स.८०मध्ये प्रेक्षागृहाचे काम पूर्ण केले. कोलोसियमच्या खाली तुरुंग होता. तेथे गुलाम व गुन्हेगारांना डांबून ठेवीत व प्रेक्षकांसमोर भुकेल्या सिंहासमोर सोडीत. अंदाजे ६०,००० लोक बसू शकतील एवढी ही जागा आहे.. कोलोसियम आहे या अवस्थेतही अक्राळविक्राळ दिसते.. आज त्याचा काही भाग पडलेला दिसतो... पुनरबांधणीचे काम चालू होते... असं सांगतात की कोलोसियम पडलं, त्या दिवशी रोमन एम्पायर पडलं आणि त्याच वेळेस मोठा भूकंप झाला.. खूप पडझड झाली

कोलोसियमच्या जवळचे आवारही खूप मोठे होते... वेगवेगळ्या कोनांतून, उंचावरून पाहिले.. फोटो काढले. तरी हे सारे कशासाठी बांधले.. हा विचार अंगावर काटे उभे करत होता...कोलोसियमच्या आत पूर्वी रक्षक असत. आता ते काढून टाकलेत... या ऐतिहासिक वास्तूच्या बाजूच्या रस्त्यांवरून वाहतूक चालू होती !..सायकलींवरून लोक फिरत होते..घोड्यांवरून पोलीस रपेट करीत होते ! एक जग इतिहासातलं, एक जग आत्ताचं !

कोलोसियमच्या जवळच विजयी कमान आहे. 'आर्च ऑफ कॉन्सटन्टाइन 'Arch of Constantine' . ही सर्वांत मोठी रोमन विजयी कमान इ.स.३१५मध्ये बांधलेली आहे. त्यावरील बारकावे, मूर्तिकाम आजही जसेच्या तसे आहे...

इटलीचे क्षेत्रफळ ३ लाख १ हजार ३३८ स्क्वेअर कि.मी. आहे. लोकसंख्या साधारण ७ मिलीयन असेल. लोक इटालियन भाषा बोलतात. आइसक्रीम व चॉकलेटसाठीही इटली प्रसिध्द आहे. शेक्सपिअर, शॉ आदींना रोममुळे स्फूर्ती मिळाली.

'All roads lead to Rome...' असं म्हणतात.

रोमन एम्पायरच्या राजधानीचे शहर म्हणजे 'रोम'. ख्रिश्चन धर्माची पंढरी म्हणजे रोम. अख्या युरोपची कॅपिटल जर ठरवायची झाली तर रोम ठरवावी असं म्हटलं जातं... रोमच्या स्थापनेबद्दल अनेक कथा-दंतकथा आहेत... असं म्हणतात की, रोमुल्स आणि रेम्युज (Romulus and Remus) या दोघा भावांनी रोम नगरी स्थापन केली...जोपर्यंत पृथ्वी अस्तित्वात आहे, तोपर्यंत रोमन कल्चर तसंच राहील असा या लोकांचा विश्वास आहे.

..१८७१मध्ये रोम ही इटलीची राजधानी घोषित करण्यात आली... 'La Sapienza युनिव्हर्सिटी' १३०३मध्ये चालू झाली आणि आजही ती उभी आहे. जी युरोपमधील सर्वांत जुनी, मोठी व उत्तम दर्जाची युनिव्हर्सिटी ठरली आहे. सात टेकड्यांवर रोम शहर वसलेले आहे.

'When in Rome do as Romans do'. असं म्हणतात...आम्ही तर फक्त दोनच दिवस रोममध्ये होतो !

***

# व्हॅटिकन सिटी

रोम शहरातलाच एक भाग म्हणता येईल, पण जो एक स्वतंत्र देश आहे आणि तो म्हणजे 'व्हॅटिकन सिटी'. या देशाला त्याचे स्वतंत्र पोस्टखाते, पोलीस यंत्रणा, बँक, चलन वगैरे आहे. जगातल्या रोमन कॅथलिकांची राजधानी म्हणजे रोम. ख्रिश्चनांची खूप चर्चेस आहेत. पोपच्या पायघोळ पेहेरावाचे डिझाईन मायकेल अँजेलोने बनवले होते, असं सांगतात. पोपचे संरक्षक गार्ड्स स्वित्झर्लंडमधले असतात. पूर्वी यांनी पोपसाठी जीवदान देऊन रक्षण केले होते. लॅटीनमध्ये व्हेटरन म्हणजे भविष्य सांगणारे. येथे त्यांची वस्ती फार आहे. यावरून 'व्हॅटिकन' हा शब्द आला, असे सांगतात.

सोळाव्या शतकात बांधलेली 'सेंट पिटर बॅसिलिका' हे मुळात व्हॅटिकन सिटीतील चर्च आहे, जेथे सेंट पिटर यांना चिरविश्रांती देण्यात आली होती.या वास्तूचा घुमट भव्य आहे.संत पिटर चर्चला 'पियाझ्झा दि सान पियत्रो' असेही म्हणतात. मध्यभागी इजिप्तहून आणलेला स्तंभ असून त्यावर इटालियन भाषेत मजकूर कोरलेला आहे. चर्चच्या भिंतींवर बायबलमधील कथा चित्रित केल्या आहेत. बर्निनी या कलाकाराने संत पिटरचे आसन घडवलेले आहे.

व्हॅटिकन म्युझियम बघायला आम्ही आत गेलो. आमच्याबरोबर तेथील एक लोकल गाईड होती. प्रचंड गर्दी होती. अर्थातच आमच्या किमती चीजवस्तू सांभाळण्याची सूचना दिली होती. या संग्रहालयाची सुरुवात सोळाव्या शतकात झाली. एकूण ५४ दालने आहेत. येथील मूर्तिकला व चित्रकला अवर्णनीय

आहे... गर्दीबरोबर व गाईड माहिती देत होती, ते ऐकत भराभर पुढे सरकावे लागत होते. खरेतर एकेका चित्राकडे तासन्‌तास पाहत राहावे असे वाटत होते...लिओनार्डो द विंची, मायकेल एंजेलो, राफाएल यांच्या कलाकृती बघायला मिळतात... सिस्टाईन चॅपेल (Sistine Chapel) ही पोपच्या निवडीची जागा आहे. येथे मायकेल एंजेलोने रंगवलेली चित्रे छतावरदेखील बघायला मिळतात. ही १५०८ ते १५१२ या अवधीत रंगवलेली आहेत. इतक्या उंचावर आडवे होऊन ही चित्रे कशी काढली असतील, याचे अप्रूप वाटते. चर्चचा मुख्य भाग पाहून तर डोळेच दिपून जातात. चर्चमध्ये आत उजव्या बाजूला इ. स.१५००मधील मायकेल अँजेलोचे जगप्रसिध्द शिल्प 'पिएता' पाहिले. प्रभू येशूचं कलेवर क्रूसावरून उतरवून माता मेरीच्या स्वाधीन केलेले हे शिल्प केवळ अवर्णनीय. तसेच अजगराच्या विळख्यात सापडलेल्या तिघाजणांचा पुतळा पाहिला..मायकेल अँजेलो मोझेसचा पुतळा झाल्यावर म्हणे इतका खूष झाला, की त्या पुतळ्यावर छिन्नी मारून म्हणाला की,''मोझेस, बोल!''...कलाकाराचं कलाकृतीत जीव ओतणं म्हणजे काय हे यावरून आपल्याला समजतं .

'ट्रेव्ही फाउंटन' बघायला गेलो आणि नजरच हलेना.. तीन रस्त्यांच्या संगमावर हे कारंजे बांधलेले आहे, म्हणून त्रिवेणी निर्झर. अक्षरश: बघतच राहावेसे वाटत होते.. हे १७३५मध्ये बांधलेलं. पण अगदी कालपरवाच बांधल्यासारखे नवीन दिसत होते.. पोप क्लेमेंट बारावे यांच्या आदेशानुसार निकोलो साल्वियाने ग्रीक पुराणकथेवर आधारित ही भव्य शिल्पाकृती साकार केली आहे. समुद्रदेवता रथातून वर येताना दाखवली आहे. मध्यभागी नेपच्यून या वरुण देवतेचे कारंजे आहे. आपल्याला पुन्हा पुन्हा ऐतिहासिक वास्तू जतन करण्याच्या या लोकांच्या वृत्तीपुढे मान तुकवाविशी वाटते ! ..या कारंज्यातील पाणी शुध्द व आरोग्यदायी आहे. ट्रेव्ही फाउंटनमध्ये नाणे टाकले की म्हणे तुमच्या मनातील इच्छा पुरी होते. तुम्ही पुन्हा रोमला परत येता. सर्वांनाच आपली इच्छा पुरी व्हावी असे वाटत असते, त्यामुळे कारंज्याच्या पाण्यात बरीच नाणी पडलेली दिसत होती !...

खरं तर रोम शहर पायी चालत चालत बघावं.. वाटतं, इतिहास येथे थबकलेला आहे.. या ट्रेव्ही फाउंटनला आम्हाला सोडून आमचा टूर मॅनेजर व्हाईट पासपोर्ट आणायला रोमच्या पासपोर्ट ऑफीसमध्ये गेला होता. त्यांचे काम करून ते आम्हाला येथे येऊन भेटले.. कारंज्याच्या बाजूच्या गल्लीतून थोडेसे

चालत गेलो.

प्रसिध्द जर्मन कवी गटे वयाच्या ३७ व्या वर्षी इटलीला आला होता...एकीकडे जुनेपुराणे कलोसियम तर दुसरीकडे 'फाओ'ची आधुनिक कार्यालये, असा संमिश्र अनुभव या शहरातून फिरताना येतो.

त्यानंतर आम्ही गेलो 'टाइम इलेव्हेटर राईड' पाहायला. या शोमध्ये रोमचा इतिहास चित्रफितीतून आपल्याला दाखवला जातो. इतिहासाच्या पोटात शिरण्याचा हा अंशत: प्रयत्न, पण तो पाहून आपण पुरते हादरून जातो. चिडिचूप होऊनच बाहेर पडतो, ते 'हॉटेल पार्क रोमा कॅसिआ' (Hotel Park Roma Cassia) येईपर्यंत...

***

युरोपातील देशांची ही तशी धावती भेट झाली. ही पर्यटनस्थळे पहाताना, तिथला इतिहास ऐकताना, वाटत रहातं, कुठलीतरी अनाम शक्ती या जगाचं नियंत्रण करते आहे. मानवनिर्मित अचंबित करणारी कलाकृती असो वा निसर्गातील चमत्कार त्यामागील नियंत्रण करणाऱ्या शक्तीचा विचार करताना आपण नकळत अंतर्मुख होतो.

इतिहास ऐकताना वाटतं, या लढाया, हे रक्तपात कशासाठी ?...माणसाचं माणसाशी सौहार्दाचं नातंच खरं तर असायला हवं.

...प्रवासात इतकी वेगवेगळी माणसं भेटतात. खरं तर जीवनाच्या पुढच्या वाटेवर आपण त्यांना पुन्हा कधीच भेटणार नसतो. म्हणूनही असेल कदाचित ते त्यांचे अनुभव अतिशय मोकळेपणानं सांगतात... कधी कधी तर इतके खडतर अनुभव आलेले असतात त्यांना. ते ऐकून आपले डोळे खाडकन् उघडतात.वाटतं, या उघडलेल्या डोळ्यांना सजगतेचे खांब लावून त्यांचे तंबू उभे करावेत म्हणजे या जगाचा खेळ डोळसपणे पहाता येईल.

साध्या साध्या गोष्टी.. जेवणखाण... भूक-तहान.... यांचं महत्त्व कळतं ते प्रवासातच.. घरी आयत्याच मिळणाऱ्या गोष्टींची किंमत कळते... आपल्या माणसांची, घराची किंमत.

घरी परततो आपण !!

***

# मनीषा दीक्षित



२५ जुलै १९५४

बी.एस.सी. मायक्रोबायोलजी

**प्रकाशित पुस्तके**

कवितासंग्रह

* ‘रेतीवरल्या रेघा’
* ‘हे घड्याळ वाळूचे’
* ‘बर्फाचे दिवस आणि कविता’
* ‘स्वया’

**पुरस्कार**

* महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ‘राजकवी यशवंत’ पुरस्कार
* मराठवाडा साहित्य परिषदेचा ‘कुसुमताई देशमुख’ पुरस्कार
* ‘सोनइन्दर’ प्रतिष्ठान पुरस्कार व इतर

**इतर**

* कौन्सिल जनरल ऑफ जपान ट्रॉफी इन इकेबाना
* प्राईझ फ्रॉम ए.ओ.टी.एस.ॲल्युमनाय सोसायटी इन मेमरी ऑफ लेट मिसेस यामामोटो
* ‘पुष्करणी’ या संस्थेची माजी अध्यक्षा
* अमेरिका व पुणे येथील पुष्पप्रदर्शनातून रचना सादर



बोडलियन लायब्ररी



टॉवर ऑफ ब्रिज



सुंदर पँगबोर्न



कार्डिफ कॅसलजवळील
क्लॉक टॉवर



शेक्सपीअरचे जन्मघर



अॅने हॅथवेचे कॉटेज



ऑक्सफर्ड मधील
रॅडक्लीफ ही
गोलघुमटासारखी
इमारत



वाय या खेड्यातील निसर्ग




सरक्लस मॉन्युमेंट



टाऊन हॉल



ट्युलिपची बाग



ऱ्हाईन फॉल



कपेलब्रुक ब्रिज



डोंगराच्या आतील पाण्याचे धबधबे




वडूज

कुक्कू क्लॉक





गोल्डन रूफ



आर्च ऑफ कॉन्सन्टाईन



सेंट मार्क्स बॅसिलिका



पिसाचा कलता मनोरा



कलोसियम



छतावरील पेंटिंग



ब्रिज ऑफ साय



त्रिवेणी संगम



इन नदी

**जग सुंदर आहेच.**

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात.

केशवसुत म्हणतात

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**
**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमाजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य "**जाणवू**" लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

ईसाहित्य प्रकाशन करायला एकही पैसा खर्च नाही.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा


esahity@gmail.com

www.esahity.com

9987737237 (WhatsApp)

युरोपचे हे प्रवासवर्णन वेगळ्या धाटणीचे आहे. लेखिकेने भेट दिलेल्या प्रदेशांचे कलात्मक दर्शन, प्रवास करताना उमटलेल्या विचारतरंगांवरून तिने वाचकांना घडवले आहे. स्थळाचा महिमा व वैशिष्ट्ये यांचे वर्णन यथार्थ झाल्यामुळे ती जिवंत झाली आहेत व त्यामुळे या प्रवासवर्णनालाही जिवंतपणा लाभला आहे.

जे प्रवास करू इच्छितात त्यांना हे पुस्तक लाभदायी आहेच, तसेच जे प्रवास करू शकत नाहीत त्या वाचकांनाही शब्दांच्या माध्यमातून मन:प्रवास करता येऊ शकेल. हे प्रवासवर्णन वाचण्याच्या माध्यमातून दृष्टीकोन व्यापक व्हायला मदत होऊ शकेल. वाचकाचा परीघही निश्चित विस्तारेल व समृध्द होईल असे आश्वासन हे पुस्तक देते.